ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख ९ ऑक्टोबर, १९५७ | अंक ४१

## विविध माहिती

**ब्रिटिश मुलें अधिक हुषार झालीं**—ब्रिटनमधील एक मानसशास्त्रज्ञ डॉ. फोर्ड थॉम्सन ह्यांनीं ५,००० ब्रिटिश मुलांच्या बौद्धिक कुवतीची चांचणी घेतली असतां ती वयाच्या मानानें फार हुषार असल्याचें आढळून आलें. हीं मुलें १९४५ नंतर जन्म पावलेलीं होतीं. अणुस्फोटामुळें जीं किरणोत्सर्गी द्रव्यें वातावरणांत मिसळतात त्यांच्यामुळें ही घटना घडली असावी, असें डॉ. थॉम्सन ह्यांचें म्हणणें आहे. ते पदार्थविज्ञानशास्त्र, मानसशास्त्र व वैद्यकशास्त्र ह्यांचे पदवीधर आहेत.

**सीलोनमधील भारतीय कंपन्या**—सीलोनच्या सरकारनें भारताच्या नागरिकांना परत पाठविण्याच्या योजनेचा विस्तार वाढविल्यामुळें सीलोनमधील अर्ध्याअधिक भारतीय मालकीच्या कंपन्यांना आपला धंदा बंद करावा लागेल, अशी भीति व्यक्त करण्यांत आली आहे. ज्या कंपन्यांचें भांडवल २५,००० रुपये असेल त्याच तीन महिन्यांपूर्वी योजनेच्या कक्षेत होत्या. आतां ५०,००० रुपये भांडवलाच्या कंपन्यांनाहि योजना लागूं करण्यांत आली आहे.

**केरळमधील काथ्याचा धंदा**—केरळमधील काथ्याच्या धंद्याला आर्थिक साह्य देण्याचा विचार चालूं आहे असें लोकसभेंत सांगण्यांत आलें. गेल्या कांहीं महिन्यांत काथ्याच्या दोरांची किंमत घसरल्यामुळें उत्पादक हवालदील झाले होते. मध्यवर्ती सरकारनें १० लक्ष रुपये किंमतीपर्यंत काथ्याचा दोर विकत घेऊन सांठवून ठेवण्याची व्यवस्था केली आहे. बाजार सुधारल्यावर तो विकण्यांत येईल.

**जर्मनींत भांडवलाचा तुटवडा**—खुद्द पश्चिम जर्मनींतच भांडवलाचा तुटवडा भासत असल्यामुळें परदेशांत भांडवल गुंतविणें जर्मनीला शक्यच नाहीं, असा इषारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकींत बोलतांना जर्मन प्रवक्त्यानें दिला आहे.

**नवीन रशियन विमान**—रशिआनें प्रवासी वहातुकीसाठी बनविलेल्या एका नव्या विमानाची चांचणी घेतली. विमान १०० प्रवाशांना घेऊन ताशीं ४०० मैल वेगानें जाऊं शकेल. सुमारें ३,००० मैलांचा प्रवास पुन्हां तेल न घेतां करण्याची त्याची शक्ति आहे. प्रवासाचा आकार रेल्वेभाड्यापेक्षा फारसा अधिक नाहीं.

**बंदरांतील गर्दी कमी करण्यासाठी सल्ला**—भारतामधील बंदरांत बोटींची गर्दी होऊन त्यावरील माल चढविण्या-उतरण्याच्या कामास दिरंगाई होते. गर्दी कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यास ब्रिटनच्या सरकारनें तीन तज्ज्ञ पाठविण्याचें कबूल केलें आहे. कोलंबो योजनेप्रमाणें करण्यांत येणाऱ्या आर्थिक मदतीला अनुसरून तज्ज्ञ पाठविण्यांत येत आहेत. ते सप्टेंबरअखेर भारतांत येतील.

**बस-वहातुकींत तोटा**—अहमदाबादमधील म्युनिसिपल बस-वहातुकीच्या दरांची पुनर्घटना करण्यांत येणार आहे. दशांश पद्धतीचीं नाणीं वापरांत आल्यापासून वहातुकीच्या उत्पन्नांत रोज ७०० रुपयांची तूट येत आहे. पहिले दर चालूं ठेवल्यास दरसाल २॥ लाख रुपयांनीं उत्पन्न घटेल असा अंदाज करण्यांत आला आहे. वहातुकीचें वार्षिक उत्पन्न सालीना ८२ लाख रुपयांच्या आसपास आहे.

**ब्रह्मदेशाकडून ओंडक्यांची खरेदी**—रेल्वेच्या रुळाखालीं घालण्यांत येणाऱ्या लांकडाच्या जाड फळ्या भारतानें ब्रह्मदेशाकडून विकत घेण्याचें ठरविलें आहे. सुमारें ५ लाख फळ्यांची खरेदी करण्यांत येणार असून त्यासाठी १ कोटी रुपये द्यावे लागतील. गेल्या ५० वर्षांत भारतानें लांकडी फळ्या आयात केल्या नाहींत. त्याऐवजीं दुप्पट किंमतीचे पोलादी स्लीपर्स आयात करण्यांत येत असत.

**प्लॅस्टिकच्या वस्तूंचें उत्पादन**—भारतामधील प्लॅस्टिकच्या कारखान्यांनीं १९५६ सालांत ४ कोटी रुपये किंमतीच्या मालाचें उत्पादन केलें. १९३६ सालीं भारतांत प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणारे फक्त पांच कारखाने होते. आतां त्यांची संख्या १२० झाली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस उत्पादन १० पटीनें वाढेल.

**बहादूरशहाच्या मुलाची तरवार**—१८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांतील एक नेता, दिल्लीचा बहादूरशहा, ह्याच्या मुलाची तरवार भारताला परत करण्यांत आली आहे. युद्धानंतर दिल्ली ब्रिटिशांनीं पुन्हां काबीज केल्यावर जो ब्रिटिश लष्करी गव्हर्नर नेमण्यांत आला, त्याच्या नातवानें ही तरवार परत दिली आहे.

**‘अर्था’चा पुढील अंक**

प्रतिवर्षीप्रमाणें, ‘अर्था’चा येता अंक बंद राहून त्यापुढील अंक

★ दिवाळी अंक ★

म्हणून ऐन दिवाळींत दि. २३ ऑक्टोबर रोजीं प्रसिद्ध होईल.

**जपानसाठी अणुभट्ट्यांची खरेदी**—जपानसाठी उभारावयाच्या अणुशक्तीच्या भट्टया ब्रिटिश तांत्रिक पद्धतीच्या असाव्यात कीं अमेरिकन पद्धतीच्या असाव्यात ह्याबद्दल खूप वाद माजला होता. अखेर दोन्ही पद्धतींची एक एक भट्टी ब्रिटन व अमेरिकेकडून विकत घ्यावी असा निर्णय घेण्यांत आला. दोन्ही भट्ट्यांची मिळून किंमत सुमारें ३ कोटी पौंड होईल.

**चीनमधील भारतीय प्रदर्शन**—भारतांत तयार झालेल्या हस्तकौशल्याच्या वस्तूंचें प्रदर्शन पेकिंग येथें भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शन तीन आठवडे चालणार आहे. प्रदर्शनासाठी रशिआच्या मालाच्या प्रदर्शनाची इमारत वापरण्यांत येत आहे. मात्र ह्या इमारतीच्या दर्शनी भागांत भारताला शोभेल अशा प्रकारचें रूपांतर करून घेण्यांत आलें आहे.

**रवींद्रनाथ टागोर ह्यांची चित्रकला**—पश्चिम बंगाल सरकारनें बंगाली साहित्यिक कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांनीं रंगविलेलीं ८० तैलचित्रें विकत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या चित्रांचा संग्रह त्यांच्या चिरंजिवांनीं एका खाजगी व्यक्तीच्या ताब्यांत दिला होता. चित्रांसाठी २६ हजार रुपये द्यावे लागतील व तीं सरकारची मालमत्ता होईल.

**मोटारसायकलवरून प्रवास**—दिल्लीमधील दोन नागरिक मोटारसायकलवरून भारताचा प्रवास करण्यास निघाले आहेत. त्यांनीं आतांपर्यंत ३ हजार मैल प्रवास करून उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, मुंबई व आंध्र ह्या राज्यांतून भ्रमंती केली आहे. कन्याकुमारीला जाऊन दिवाळीच्या सुमारास ते दिल्लीला परततील. सर्व मिळून त्यांचा सुमारें ८ हजार मैलांचा प्रवास होईल.

**आस्वान धरणाला जपानची मदत**—इजिप्तमधील आस्वान येथें बांधण्यांत यावयाच्या मोठ्या धरणाला ब्रिटन व अमेरिकेकडून मदत मिळाली नाहीं व नंतर इजिप्तनें सुएझचा कालवा आपल्या ताब्यांत घेतला. आतां जपानमधील उद्योगपती, पार्लमेंटचे सभासद व सरकारी अधिकारी ह्यांनीं एक कौन्सिल स्थापन करून धरणासाठी मदत देण्याची तयारी दाखविली आहे.

**चीन–सीलोन व्यापारी करार**—सीलोन व चीन ह्यांच्या दरम्यान ५ वर्षें मुदतीचा व्यापारी करार करण्यांत आला आहे. करारांत ठरल्याप्रमाणें सीलोन चीनला दरसाल निदान ३० हजार टन रबर पुरवील आणि निदान २ लाख टन तांदूळ चीनपासून विकत घेईल. त्याशिवाय, सीलोनमधील रबराच्या मळ्यांची पुन्हां लागवड करण्यासाठी चीननें सीलोनला दरसाल १ कोटी ५० लाख रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

**जपानकडून कापडाची यंत्रसामुग्री**—जपानमधील कापडगिरणीची यंत्रसामुग्री मिळविण्यासंबंधीं भारत सरकार जपानी प्रतिनिधींशीं वाटाघाटी करीत आहे. भारताच्या कापडाच्या गिरण्यांना कापडाची निर्यात वाढविण्यासाठी स्वयंचलित मागांची तांतडीची गरज आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १८,००० स्वयंचलित माग बसविण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**जागतिक औद्योगिक परिषद्**—सॅनफॅन्सिस्को येथें ऑक्टोबरच्या १४ तारखेपासून १८ तारखेपर्यंत आंतरराष्ट्रीय औद्योगिक विकास परिषद् भरविण्यांत येणार आहे. परिषदेला निरनिराळ्या ७२ देशांतील उद्योगधंद्यांतील ५०० पुढारी आमंत्रणावरून उपस्थित राहणार आहेत. कम्युनिस्ट देशांतील प्रतिनिधी मात्र नाहींत. जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. यूजीन ब्लॅक हे परिषदेंत महत्त्वाचें भाषण करणार आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

...वाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


किर्लोस्कर
इलेक्ट्रिक पंपिंग सेट
यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. ९ ऑक्टोबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्याची अधिक आयात होणार

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या यशाच्या मार्गांत दोन प्रमुख अडचणी आहेत. योजनेंत भारी उद्योगधंद्यांच्या स्थापनेवर भर देण्यांत आलेला आहे. भारी उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री परदेशांतूनच मागवावी लागत आहे. ह्या आयातीसाठी विदेशी चलनाची जरूरी असून तें पाहिजे तितकें उपलब्ध नाहीं. विदेशी चलनाची तूट भरून काढण्यासाठीं भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ब्रिटन-अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले आहेत. त्यांच्या वाटाघाटींची फलनिष्पत्ति समजावयास अद्याप अवकाश आहे. योजनेमधील दुसरी प्रमुख अडचण म्हणजे अन्नधान्याच्या टंचाईची. भारतासारख्या विस्तीर्ण शेतीप्रधान देशांत वस्तूंच्या किंमतीची इमारत मुख्यत: धान्याच्या किंमतीवर अवलंबून असते. म्हणूनच अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करण्याची अतिशय जरूर आहे. तथापि, शेतीचा व्यवसाय हा पावसासारख्या नैसर्गिक घटनांवर अवलंबून असल्यानें अन्नधान्याच्या किंमती सामान्य लोकांच्या खरेदीशक्तीच्या आवाक्याबाहेर जाऊं न देण्यासाठी आयात केलेल्या धान्याचा सांठा करून ठेवणें आवश्यक असतें. ही बाब लक्षांत घेऊन भारत सरकारनें धान्याची अधिक आयात करण्याचें ठरविलें आहे. धान्याचे सांठे करण्याच्या धोरणास अनुसरून चालू वर्षअखेर ऑस्ट्रेलिआकडून सुमारें ३,३०,००० टन गहूं आयात करण्यांत येणार आहे. देशांतील सध्यांच्या साठ्यांत त्यामुळें महत्त्वाची भर पडणार आहे. सध्यां देशांत ७ लाख टन धान्याचा सांठा आहे. परदेशांतून आयात करण्यांत येणारें धान्य लक्षांत घेतां १९५८ अखेर भारतांत १० लाख टन धान्याचा सांठा होईल. त्याशिवाय अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी अमेरिकेकडून आणखी कर्जाऊ गहूं व तांदूळ मिळविण्याची खटपट करणार आहेतच. भारतानें पूर्वी घेतलेल्या धान्याइतकेंच आणखी धान्य मिळविण्यांत येणार आहे, असें समजतें.

धान्य कर्जाऊ मिळविण्याच्या पहिल्या करारांत सुमारें ३० लाख टन गहूं आणि २ लाख टन तांदूळ मिळविण्याची सोय झाली होती. ह्या करारांत ठरल्याप्रमाणें आतांपर्यंत २३ लाख टन गहूं भारताला पाठविण्यांत आला आहे आणि पुढील वर्षाच्या आरंभापर्यंत बाकीचा गहूं पाठविण्यांत येईल असा अंदाज आहे. तांदूळ मात्र सर्वच्या सर्व पाठविण्यांत आला आहे. अमेरिकेशिवाय तांदुळाच्या आयातीविषयीं भारतानें ब्रह्मदेशाशींहि करार केलेला आहे. कराराप्रमाणें भारतानें पांच वर्षांच्या कालावधींत २० लाख टन तांदूळ आयात करावयाचा आहे. १९५६ सालीं त्याप्रमाणें ३ लाख टन तांदूळ आयात करण्यांत आला. चालू वर्षाच्या अखेरपर्यंत आणखी ५ लाख टन तांदूळ आयात करण्यांत येईल असा अंदाज आहे. १९५८ सालीं ५ लाख टनांची आयात करण्यांत येईल आणि त्यानंतर दरसाल ३ लाख टनांची आयात केली जाईल. चालू वर्षाच्या ऑगस्ट अखेरपर्यंत ६,३३,००० टन तांदूळ आणि १७,७०,००० टन गहूं आयात झाला असावा. तांदुळापैकीं बहुतेक सांठा ब्रह्मदेशाकडून आला. कांहीं थोडा तांदूळ व्हिएटनामकडूनहि मिळाला. गहूं बहुतेक सर्व अमेरिकेकडून आला. अन्नधान्याचा सांठा करून पंचवार्षिक योजनेचें यश निश्चित करण्याचा हा प्रयत्न आहे. कारण, धान्याच्या किंमती भडकल्या तर योजनेच्या पायालाच हादरा बसेल असें तज्ज्ञांचें मत आहे.

## रासायनिक खतांच्या महत्त्वाची जाणीव

भारताचे अन्नमंत्री श्री. जैन ह्यांनीं हैदराबाद येथें खत-व्यापाऱ्यांच्या अखिल भारतीय संघटनेपुढें खतांच्या उपयोगाविषयीं व तद्विषयक सरकारी धोरणाविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, भारत सरकारला सध्यां विदेशी हुंडणावळीच्या तुटवड्याला तोंड द्यावें लागत आहे. तरीसुद्धां रासायनिक खतांचें महत्त्व जाणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमधील खतांच्या उत्पादनाचीं उद्दिष्टें सरकारनें पुन्हां नव्यानें ठरविलीं आहेत. शेतीच्या विकासांत खताचा वापर ही पहिली पायरी आहे. सध्यां भारतांत खताची टंचाई आहे. आयात अधिक करावी म्हटलें तर हुंडणावळीची अडचण आहे. गेल्या वर्षी सुमारें १३·४ लाख टन खताला मागणी आली होती. आयातीच्या मार्गानें १० लाख टन खत देशांत आलें. तरीपण ३३ टक्के गरज भागवितां आली नाहींच. रासायनिक खतें आणि शेतावरच तयार करण्यांत आलेलीं खतें ह्यांच्या गुणावगुणाबद्दल सध्यां वाद चालू आहे. पण भारतासारख्या विस्तीर्ण देशांत दोन्ही प्रकारच्या खतांना भरपूर वाव आहे.

## "किर्लोस्कर" दिवाळी अंक

"किर्लोस्कर" मासिकानें आपला दिवाळी अंक १ ऑक्टोबर रोजीं प्रसिद्ध केला असून तो दसऱ्यापासून दिवाळीपर्यंत वाचकांना मनोरंजक व संतोषदायक साहित्य पुरवीत रहाणार आहे. १६० पृष्ठांचा हा अंक मुख्यत: रंजक साहित्यानें नटलेला आहे. मासिकाचे कार्यकारी संपादक, श्री. मुकुंदराव किर्लोस्कर, ह्यांचें अमेरिकेचें चित्तवेधक प्रवासवर्णन हें ह्या अंकाचें एक आकर्षण आहे; खासदार नानासाहेब गोरे ह्यांनीं दिल्लीचें घडविलेलें धावतें दर्शन मनोरंजकच नव्हे तर विचारप्रवर्तकहि आहे. प्रा. शेजवलकरांच्या "बेकारीची समस्या" ह्या लेखांतील विवेचन उद्बोधक आहे.

## कै. रावसाहेब गो. ल. गजेंद्रगडकर

दि बेळगांव बँक लि. चे एक संस्थापक, स्थापनेपासून डायरेक्टर व कांहीं काळ चेअरमन, रावसाहेब गोपाळ लक्ष्मण गजेंद्रगडकर हे वयाच्या ८७ व्या वर्षी मंगळवार दि. १ आक्टोबर रोजीं मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दु:ख होतें. ते प्रेमळ, निगर्वी व कनवाळू होते; त्याचप्रमाणें सचोटी, काटकसर व प्रामाणिकपणा ह्याबद्दलहि ते सर्वांच्या आदरास पात्र झाले होते. त्यांच्या सद्गुणांमुळें व वक्तशीरपणामुळें अखेरपर्यंत त्यांची प्रकृति उत्तम होती. त्यांच्या निधनानें जुन्या वळणाचा एक आदर्श गृहस्थ आपल्यांतून गेला आहे. बँकेच्या डायरेक्टरांनाहि कळकळीच्या, निस्वार्थी व अनुभवी सल्लागारास मुकावें लागलें आहे.

## बँक-व्यावसायिकांना मार्गदर्शन

### परंपरा व जबाबदाऱ्या ओळखून कर्तव्यें पार पाडण्याची व आकर्षणें टाळण्याची आवश्यकता

**महाराष्ट्र बँकेच्या ट्रेनिंग क्लासमध्यें बँकेचे मॅनेजर श्री. जोग ह्यांचें प्रास्ताविक भाषण**

महाराष्ट्र बँकेनें सुरू केलेल्या ट्रेनिंग क्लासचा प्रारंभ बँकेचे मॅनेजर, श्री. चिं. वि. जोग ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानें दि. २५ ऑगस्ट रोजीं झाला. बँकेनें विस्ताराचें धोरण आंखलें असून, तें यशस्वी करण्यासाठी ऑफिसर्स व एजंट्स ह्या जागीं लायक आणि व्यवहारकुशल नोकरांची आवश्यकता कालांतरानें निर्माण होईल. असे लायक लोक नोकरवर्गांतून निर्माण करण्यासाठी बँकेनें वेळींच ट्रेनिंगची योजना आंखून अंमलांत आणली आहे.

श्री. जोग ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम महाराष्ट्र बँकेच्या स्थापनेचा इतिहास निवेदन करून, बँकेची परंपरा समजावून सांगितली. पहिल्या महायुद्धानंतर, १९३० च्या आसपास मंदीचा काळ होता. महाराष्ट्रांत व्यापारी बँका जवळ जवळ नव्हत्याच; कांहीं सहकारी बँका फक्त होत्या. महाराष्ट्रीय एकमेव बँक होती, तीहि बंद पडल्यामुळें व्यापारी बँकांवरील जनतेचा विश्वास उडाला होता. इतर मोठ्या व्यापारी बँकांनीं पुण्यांत शाखा उघडल्या, तरी बहुसंख्य मध्यमवर्गीयांच्या गरजा त्या भागवूं शकत नव्हत्या; कारण ह्या गरजांकडे सहानुभूतीनें पहाण्याची त्यांना गरजच नव्हती. व्यापार व कारखानदारी ह्यांत पडणाऱ्या तरुण महाराष्ट्रीयांना प्रोत्साहन व मदत ह्यांची आवश्यकता होती. ह्या व्यवसायांत पडणाऱ्यांना भांडवलाचा पाठिंबा नव्हता आणि सहकारी बँका त्यांच्या विशिष्ट घटनेमुळें व कार्यपद्धतींमुळें फारशा उपयोगीं पडणें शक्य नव्हतें.

ह्या परिस्थितीचा विचार करून त्यावर उपाय म्हणून एक महाराष्ट्रीय व्यापारी बँक काढावी, असा ठराव पुणें येथें १९३४ मध्यें भरविलेल्या व्यापारी परिषदेनें केला. त्याचा पुरस्कार श्री. वा. पुं. वर्दे ह्यांनीं वृत्तपत्रांत लेख लिहून केला. कै. प्रो. काळे ह्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अर्थशास्त्रज्ञानेंहि बँकेच्या स्थापनेच्या प्रयत्नांत उत्साहानें प्रत्यक्ष भाग घेतला; ते बँकेचे एक संस्थापक व पहिले अध्यक्ष होते. श्री. आ. रा. भट व श्री. गो. द. आपटे ह्यांनीं पूर्वतयारीची सर्व व्यवस्था केली. बँकेची स्थापना झाली, तेव्हां ७०,००० रु. भांडवल खपलेलें होतें. लोकांना बँकेचे भाग खरीदण्यास प्रवृत्त करण्यासाठी पुष्कळच नेटानें प्रयत्न करावे लागले.

बँकेचें पहिल्यापासूनचेंच धोरण सचोटीच्या लोकांना प्रोत्साहन देऊन त्यांना धंद्यांत उभें रहाण्यास व स्पर्धेस तोंड देण्यास समर्थ करण्याचें होतें. केवळ भागदारांपुरतेंच पाहून, मोठा नफा मिळविण्याचें बँकेचें कधींच धोरण नव्हतें व नाहीं. बँकेनें नफा हा मिळविलाच पाहिजे. भागदारांना योग्य डिव्हिडंड मिळालेंच पाहिजे. पण, तें करण्यापूर्वी बँकेची सर्वांगीण मजबुती वाढविणें अगत्याचें असतें; गंगाजळींत भर टाकीत जावें लागतें. बँकेच्या भागदारांप्रमाणें तिचे ठेवीदारहि मध्ययवर्गीयच आहेत; प्रत्येकाची ठेव लहान असली तरी ठेवीदारांची संख्या मोठी आहे; त्यामुळें ठेवींची रक्कम सालोसाल वाढत जात आहे. ज्यांना महाराष्ट्रीयांच्या उन्नती बद्दल आत्मीयता वाटते, असेच लोक बँकेकडे आकृष्ट होत आहेत; त्यांच्याच साहाय्यानें बँकेची प्रगति शक्य झाली आहे. बँकेच्या ठेवींत आजवर एकाहि वर्षीं घट झालेली नाहीं. जुन्या ठेवीदारांच्या ठेवी कायम राहिल्या व वाढल्या, नवे ठेवीदार आले, म्हणजे बँकेचें हिंदी बँकिंगमधील स्थान आणखी वर जाईल.

अशा परंपरेच्या आणि जबाबदारी पत्करलेल्या बँकेंत काम करणाऱ्यांनीं आपल्या कर्तव्याची जाणीव राखणें आवश्यकच आहे. ह्यासंबंधींतील तपशीलाचा श्री. जोग ह्यांनीं उल्लेख करून, दैनंदिन कारभारांत घ्यावयाच्या दक्षतेचें विवरण केलें. श्रम आणि अभ्यासू वृत्ति ह्यांस सचोटी आणि विश्वासार्हता ह्यांची जोड बँकिंगच्या व्यवसायांत विशेषच आवश्यक असते, हें त्यांनीं पटवून दिलें. "तात्कालिक, वैयक्तिक फायद्याच्या आकर्षणास बळी पडणारा आपल्या स्वतःचा व्यावसायिक घात कायमचा करून घेत असतो" असा श्री. जोग ह्यांनीं समारोप केला. आपल्या भाषणांतील मुद्दे विशद करण्यासाठी आपले वैयक्तिक अनुभव त्यांनीं निवेदन केले, त्यामुळें त्यांचें भाषण फारच परिणामकारक झालें.

---

## पुणें शहर म्यु. कॉ. स. को. बँकेचे नवे पदाधिकारी

बँकेची वार्षिक साधारण सभा दि. २२-९-५७ रोजीं होऊन त्यामध्यें पुढील सभासद बिनविरोध निवडून आले.

**१. सल्लागार मंडळ** :-( १ ) मा. सिताराम घोंडिबा आवनावे ( अध्यक्ष ) ( २ ) मा. पुंडलिक नारायण स्वार ( उपाध्यक्ष ) ( ३ ) मा. विश्वंभर दत्तात्रय नवले. ( ४ ) मा. रामकृष्ण दत्तात्रय भट. ( ५ ) मा. सत्यबोध तिपया स्वामी.

**२. कार्यकारी मंडळ** :—( १ ) नामदेव धोंडिबा भोकरे ( कार्याध्यक्ष ) ( २ ) मा. पांडुरंग घोंडिबा सोनवणे ( उप-कार्याध्यक्ष ) मा. राठ तात्याबा कांबळे. ( ४ ) मा. कृष्णा गोपाळ कुंभार ( ५ ) मा. दत्तात्रय नाना कुंभार ( ६ ) मा. वसंत रामकृष्ण कोतवाल. ( ७ ) मा. मधुकर मारुती सोळे ( ८ ) मा. कृष्णराव दगडोबा घारमळकर ( ९ ) मा. दिगंबर महादेव जाधव. ( १० ) मा. आत्माराम बळवंत टण्णू, ( ११ ) मा. भीमराव विष्णू पाटील.

**३. लोकल ऑडिटर** :—( १ ) मा. गोपाळ दत्तात्रय आपटे. सी. ए.

---

## कॉसमॉस बँकेचे नवे पदाधिकारी

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें या बँकेची वार्षिक निवडणूक दि. २९ सप्टेंबर १९५७ रोजीं होऊन खालीलप्रमाणें पदाधिकारी १९५७-५८ सालाकरतां निवडून आलें आहेत.

**सल्लागार मंडळ**—( १ ) श्री. शं. ल. ओगले, अध्यक्ष ( २ ) श्री. य. बा. देहाडराय, उपाध्यक्ष ( ३ ) श्री. चिं. वा. भट ( ४ ) श्री. वि. त्रिं. टिळक ( ५ ) श्री. पां. रा. देव.

**कार्यकारी मंडळ**—( १ ) श्री. वा. म. लेले, कार्याध्यक्ष ( २ ) श्री. वा. रा. होनप, उप-कार्याध्यक्ष ( ३ ) श्री. र. पां. भोंडे ( ४ ) श्री न. का. घारपुरे ( ५ ) श्री. गं. मो. भणगे ( ६ ) श्री. वि. ल. हर्डीकर ( ७ ) श्री. शं. वि. दिवाकर ( ८ ) श्री. वा. कृ. परांजपे ( ९ ) श्री. का. वा. सुभेदार ( १० ) श्री. रा. द. भट ( ११ ) श्री. दि. वा. कुलकर्णी.

**स्थानिक आयव्यय निरीक्षक**—( १ ) श्री. रा. कृ. देशपांडे व ( २ ) श्री. व. का. साठे.

## श्री महालक्ष्मी को–ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

चेअरमन : दामोदर श्रीपाद मुनीश्वर, बी. ए., बी. टी.
मॅनेजर : नारायण गोविंद मुनीश्वर

गुदस्त सालअखेर बँकेचे २९०२ सभासद होते. सालअखेर ३०३४ सभासद आहेत. गुदस्त सालअखेर बँकेचे 'ब' वर्गाचे २५१ सभासद होते. सालअखेर 'ब' वर्गाचे २६१ सभासद आहेत. गेल्या सालअखेर बँकेचे रु. १,२७,५७० चें शेअर भांडवल होतें. या सालीं नवीन १५०७ शेअर्स विकले व ३ शेअर्सची रक्कम परत दिल्यानें सालअखेर रु. १,३५,०९० चें शेअर भांडवल झालें आहे. गुदस्त सालअखेर बँकेकडे चालू, सेव्हिंग्ज, मुदतबंद व रिकरिंग डिपॉझिट ठेवी मिळून ३२८३ खात्यांवर रु. १३,८२,२०६ ची ठेव होती. या सालीं वरील सर्व ठेवींच्या एकूण ३५१७ खात्यांवर रु. १४,०९,९६५–९९ ची ठेव आहे. त्यापैकी सभासदांची रु. ७,२०,९२३–४१ ची व बिगर सभासदांची रु. ६,८९,०४२-५८ ची ठेव आहे. गेल्या वर्षी सभासदांकडे रु. ३,६९,९९० चें सामान्य कर्ज येणें होतें. सालअखेर सभासदांकडे रु. ३,६८,४८६ चें कर्ज येणें आहे. थकबाकीचें एकूण कर्ज येणे रकमेशीं प्रमाण शें. २० टक्के पडतें. गुदस्त सालीं हें प्रमाण शें. १५.७ होतें.

गुदस्त सालीं बँकेस निव्वळ नफा रु. ११५६३–८–३ झाला होता. चालू सालीं निव्वळ नफा रु. १४,३४८–६६ झाला आहे. अहवालाचे सालीं बिगर सभासदांच्या ठेवींमध्यें गतवर्षापेक्षा बरीच वाढ झाली असून त्या जवळ जवळ सभासद ठेवीदारांच्या इतक्या होत आल्या आहेत. याचा अर्थ, करवीरमधील जनतेचा या बँकेवरील विश्वास दिवसेंदिवस वाढत आहे, हें उघड आहे. अहवालाच्या सालचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे, विशिष्ट जमातींकरतांच असलेली ही बँक या सालीं सर्वांना खुली करण्यांत येऊन इतर जमातींचे बरेच नवीन सभासद करून घेण्यांत आले आहेत व बँकेच्या धोरणास अनुसरून त्यांना कर्जे देखील देण्यांत आलीं आहेत.

## पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

चेअरमन : रघुनाथ वामन जोशी, एम्. ए., एलएल. बी.
मॅनेजर : भ. ग. सावणे.

या वर्षी कर्जवाटप झालें नाहीं व नवीन मागणीहि आली नाहीं. वर्षाचे आरंभीं सभासदांकडून येणें ३१,०४२ रु. होतें व चालू वर्षाचा हप्ता १३,२२८ रु. वसुलीस पात्र झाला. याप्रमाणें एकूण येणें ४५,२७० रु. पैकी १२,८६८ रु. वसूल येऊन थकबाकी ३१,४०२ रु. राहिली २५,२२५ रु. येणें व्याजापैकी १२,९१८ रु. वसूल झालें. त्याची थकबाकी १२,३०७ रु. आहे. प्रांतिक बँकेची थकबाकी १५,६०० रु. राहिली आहे. शेतमालाच्या किंमती चढ असल्यानें वसुली बरी झाली व ३,६२९ रु. नफा राहिला. त्याचा विनियोग साचलेला ११,७४७ रु. चा तोटा कमी करण्यासाठीं करण्यांत आला. सालोसाल काम कमी होत असल्यानें खर्चाची तोंडमिळवणी करणें दुरापास्त होत आहे.

**पश्चिम जर्मनीकडे कर्ज मागणार**—भारताच्या प्रतिनिधींचें एक मंडळ सध्यां पश्चिम जर्मनीच्या दौऱ्यावर आहे. मंडळाचे पुढारी श्री. भारत राम म्हणाले कीं, पश्चिम जर्मनीकडून भारत दीर्घ मुदतीचें कर्ज मागण्याचा संभव आहे. भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यासंबंधी पश्चिम जर्मनीच्या अर्थमंत्र्यांशीं चर्चा करणार आहेत.

## पुना बँकर्स क्रिकेट ढालीचा वितरण समारंभ

### श्री. प्रवीणचंद्र गांधी ह्यांची देणगी

पुना बँकर्स ट्रॉफी समितीच्या विद्यमानें झालेल्या पुण्यांतील आंतर–बँक क्रिकेट सामन्यांच्या ट्रॉफीचा वितरणसमारंभ दि. २९ रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी, (मॅ. डायरेक्टर, देना बँक) ह्यांचे हस्तें मोठ्या थाटानें झाला बँक ऑफ महाराष्ट्राच्या संघाला चालू वर्षाची ट्रॉफी मिळाली व सेंट्रल बँक ऑफ इंडिआला रनर–अपची ट्रॉफी मिळाली. ह्याच वेळीं टेबल टेनिस व बॅडमिंटन आंतर–बँक सामन्यांतील यशस्वी खेळाडूंनाहि पारितोषिकें देण्यांत आलीं.

ह्या प्रसंगीं भाषण करतांना श्री. प्रवीणचंद्र गांधी यांनीं पूना बँकर्स असोसिएशनच्या कार्याचा गौरव केला:—"गेलीं दहा वर्षे मी ह्या असोसिएशनचें कार्य जवळून पाहात आहे. बँकर्समध्यें सहकार्य घडवून आणून, मैत्रीच्या पातळीवर त्यांना आणण्यांत असोसिएशननें घेतलेला पुढाकार विशेष महत्त्वाचा आहे; भारतांत इतर कोठेंहि असा उपक्रम आढळला नाहीं." असोसिएशननें भरविलेल्या परिषदा, प्रदर्शनें, प्रकाशित केलेलीं उपयुक्त पुस्तकें, इत्यादींचा त्यांनीं गौरवपूर्वक उल्लेख केला. क्रिकेटच्या सामन्यांची, बँक नोकरांचे दृष्टीनें असलेली उपयुक्तताहि त्यांनीं वर्णन केली व ह्या प्रसंगानिमित्त असोसिएशनला उत्तेजनार्थ २०० रुपयांची देणगी जाहीर केली.

**सुताची सहकारी गिरणी**—बिहार राज्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या एका सुताच्या गिरणीला भारत सरकारनें मान्यता दिली आहे. गिरणीच्या भांडवलांत गुंतविण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारला ८ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. राज्य सरकारनें स्वतः ७·६८ लाख रुपये गुंतविण्याचें ठरविलें आहे. गिरणींत सुताच्या १२,००० चात्या बसविण्यांत येणार आहेत.

**चीनला पोलादाचा पुरवठा**—जपानमधील पोलादाच्या कारखानदारांनीं चीनला ३६,००० टन पोलाद पुरविण्याचा करार केला आहे. दोन्ही देशांच्या दरम्यान पोलादाच्या पुरवठ्यासंबंधी झालेला हा करार सर्वांत मोठा आहे. पोलादाची किंमत २·८ कोटी येन होईल. सर्व पुरवठा नोव्हेंबर, १९५७ ते मार्च, १९५८ पर्यंतच्या कालांत पुरा करावयाचा आहे.

**विदर्भांतील कापडाच्या गिरण्या**—नागपूर टेक्स्टाईल मिल्स असोसिएशननें विदर्भामधील कापडाच्या गिरण्यांच्या बिकट परिस्थितीविषयीं भारत सरकारकडे एक निवेदन पाठविलें आहे. कापडावरील अबकारी कर व विक्रीकर ह्या बाबतींत गिरण्यांना सवलती देण्यांत याव्यात, अशी मागणी निवेदनांत आग्रहानें करण्यांत आली आहे.

**युगोस्लाव्हिआचा पूर्व जर्मनीशीं व्यापार**—युगोस्लाव्हिआनें पूर्व जर्मनीच्या सरकारला मान्यता दिलेली नाहीं. आतांपर्यंत उभयता देशांत व्यापारी संबंधहि नव्हते. परंतु आतां युगोस्लाव्हिआनें आपलें धोरण बदललें असून पूर्वजर्मन सरकारशीं ऐनजिनशी व्यापारी करार करण्याचीं बोलणीं करण्याचें ठरविलें आहे. १९५८ मध्यें वाटाघाटी चालू होतील.

**कर्जबाजारी शेतकऱ्यांचें हित**—केरळमधील कर्जबाजारी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठीं राज्य सरकार एक वटहुकूम काढणार आहे, असें समजतें. मूळ कर्जाची फेड, व्याजाची रक्कम व गहाण पडलेल्या शेतजमिनींची धनकोकडून होणारी विक्री ह्या बाबतींत शेतकऱ्यांना सवलती देण्याचा सरकारचा विचार आहे. ह्यासंबंधीचें बिल मागाहून मांडण्यांत येणार आहे.

## प. खा. गव्हर्नमेंट सर्व्हन्टस् को-ऑ. बँक लि. धुळें

(चेअरमन : देवराव नामदेव पाटील)

(सेक्रेटरी : रा. वा. रत्नपारखे)

गेल्या वर्षी सभासदांची संख्या १६९५ होती. अहवालाचे वर्षीं नवीन सभासद २२४ झाले व ७१ सभासदांनीं राजीनामे दिले. सालअखेर सभासदांची संख्या १८४८ आहे. गेल्या वर्षी भागांचें भांडवल रु. ६०७२५ होतें. अहवालाचे वर्षअखेरीस सदर भांडवल रु. ६५९९५ आहे. गतवर्षी एकूण वर्गणी जमा रु. ५,४५,०२५-११ होती. अहवालाचे वर्षी रु. १२३६२९.६५ जमा होऊन रु. ३२४१५.३५ परत देण्यांत आली वर्षअखेरीस वर्गणी रु. ६३६२३९.९९ जमा आहे. गतवर्षी दिलेली एकूण रक्कम रु. २,७५९४२-८ होती. अहवालाचे वर्षी रु. वसूल २,३४४०५.०० होऊन रु. ३,४८२२७.५० कर्ज देणेंत आलें. वर्षअखेर येणें रु. ३८९७६५ आहे. से. बँक खात्यांत वाढ होत आहे. गत वर्षी रक्कम रु. २,२८०३१-११-३ जमा होती. अहवालाचे वर्षी रक्कम रु. २९७९८२.०१ जमा होऊन रु. २९५२०३.५४ काढून घेण्यांत आले. वर्षअखेर रु. २३१८१०.१७ जमा आहे.

चालू खात्यांत गत वर्षी रक्कम रु. १८९७-३-९ जमा होती. अहवालाचे वर्षी रु. ११८६९८.२५ जमा होऊन रु. १०८७८८.८१ काढून घेण्यांत आले. वर्षअखेर रु. ११८०६.७७ जमा आहेत. अहवालाचे वर्षी रु. ७५६९,१४ नफा झाला.

एकूण मासिक होणारी जमा रक्कम व कर्ज वगैरे द्वारा होणारा उठाव यांतून दरमहा शिल्लक [ Surplus ] राहाणाऱ्या रकमेचा विनिमय सरकारी अगर इतर निमसरकारी कर्जरोखे यांत इन्व्हेस्टमेंट करण्यापेक्षा बँकेचे सभासद व जिल्ह्यांतील इतरत्र जनता यांचे गरजा भागविणेचें दृष्टीनें विचार होऊन [ नियमाला अनुसरून ] गेले जानेवारीमध्यें भरलेल्या विशेष साधारण सभेनें योग्य ती नियम दुरुस्ती करून बँकेतर्फे सहकारी स्टेशनरी स्टोअर्स व बुकडेपो काढावे असें ठरविलें. सदर स्टेशनरी स्टोअर्स व बुकडेपोचें उद्घाटन ता. २१-४-५७ रोजीं झालें. हल्लीं सदर डेपो आग्रा रोड / धुळें येथें बाजारपेठेंत ठेवणेंत आला आहे. दैनंदिन बाजारभावांत होणारा बदल व त्या योगें मध्यमवर्गीयांची होणारी ओढाताण लक्षांत घेतां आपल्या सरकारनें स्वस्त धान्याचीं दुकानें उघडण्याचा ( विशेषतः सदर दुकानें सहकारी संस्थामार्फतच उघडलीं जावींत असा ) निर्णय जाहीर केल्यानें एका धुळें शहरांत तीन दुकानें चालविणेस परवानगी मागितली व संस्थेचा सुव्यवस्थित कारभार पाहून सदर परवानगीहि मिळाली. याप्रमाणें परवानगी हातांत पडतांच १ दुकान मोगलाई / धुळें येथें ता. २९।५।५७ रोजीं, २ रे दुकान देवपूर / धुळें येथें ता. १५।६।५७ रोजीं व ३ रें दुकान जुनें धुळें येथें ता. २८।६।५७ रोजीं उघडण्यांत येऊन प्रत्यक्ष व्यवहारास प्रारंभ झालेला आहे. या जिल्ह्यांत शिंदखेडें, दोंडायचें, नंदुरबार येथें वरीलप्रमाणें बँकेस दुकान उघडणेस परवानगी मिळावी म्हणून पत्रव्यवहार चालूं आहे. पगारदार नोकरांच्या सहकारी संस्थां ( मुंबई राज्य ) पैकीं नमुनेदार संस्थेंत आपला असलेला नंबर कायम टिकवणेचे दृष्टीनें सर्वांनीं अंतःकरणपूर्वक सहकार्य करून या वरील योजना यशस्वी कराव्यात, अशी बोर्डाची खात्री आहे.


दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ७,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | रु. | २,००,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना : १९११

मुख्य कचेरी : ९, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

| | | |
|---|---|---|
| टेलिफोन नं. २५५४७४-७५ | चेअरमन- श्री. रमणलाल जी. सरैय्या | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता-फार्मर बँक |

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ४४,११,५०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | ११,००,००० |
| | रु. | ७१,११,५०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५९,२८,१०० |
| ठेवी | रु. | १०,७१,३३,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १७,६३,७३,००० |

११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

## धी मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, लि. मुंबई १.

बँकेची सर्वसाधारणपणें परिस्थिति येणेंप्रमाणें आहे.

| | १९५५-५६ | १९५६-५७ |
|---|---|---|
| वर्षअखेर भांडवल | ९१,५७० | ९१,५२० |
| वर्षअखेर रिझर्व्ह फंड | ५०,२९८ | ५१,४८६ |
| साल अखेर सभासद | ९४४ | ९३५ |
| कर्ज मंजुरी | २,५०,१५० रु. | २,२५,२४५ रु. |
| थकलेलें कर्ज | ९७,१४९ रु. | १,०४,०१५ रु. |

बहुसंख्य सभासदवर्ग हा क्रॉफर्ड मार्केटमधील फळ व्यापारांत असून त्यांना या आर्थिक टंचाईची झळ इतर क्षेत्रांपेक्षा अधिकच लागलेली आहे. डायरेक्टर-बोर्डाचे सभासद, सभासदांना प्रत्यक्ष, भेटून सभासदांना आपापल्या जबाबदारीची जाणीव देत आहेत व वसुलीचें कामहि चालू आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ३,१६६ रु. नफा झाला.

बँकेनें सरकारी व बिनसरकारी रोख्यांत रु. ३,८९,४३८ इतकी रक्कम गुंतविलेली आहे. गुंतविलेल्या रकमेपैकी कांहीं रोख्यांच्या तारणावर बॉबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनें एक लाख पन्नास हजार रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट मंजूर केला आहे. बँकेच्या कचेरींत १० नोकर कामावर आहेत. शिवाय, डायरेक्टरबोर्डापैकी श्री. उ. भा. तांबे व म. बा. बेंडे हे ऑफिसचें काम पहात असतात.

---

## पुणें म्युनि. कॉर्पो. सर्व्हंटस् को. अर्बन बँक लि. पुणें २.

कार्याध्यक्ष : विश्वंभर दत्तात्रय नवले

कार्यवाह : नारायण कृष्ण कुलकर्णी, जी. डी. कॉम.

दि. ३०-६-५७ अखेर बँकेची सभासदसंख्या २४१९ आहे. यामध्यें निरनिराळ्या प्रमुख खात्यांच्या सभासदांची संख्या पुढीलप्रमाणें आहे. (१) पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन १३६४ (२) पुणें म्युनिसिपल स्कूल बोर्ड ६६३ (३) पुणें म्युनिसिपल ट्रॅन्स्पोर्ट ३९२.

गेल्या वर्षी एकूण सभासदसंख्या २१८९ होती.

बँकेच्या व्यवहारांत प्रगति होत असून नफ्यांतहि बरीच वाढ झाल्याचें दिसून येईल. १९५६-५७ सालाच्या अपेक्षित नफ्याची रक्कम रु. १५,५५६ होती. त्यामध्यें रु. ६३७४ ची वाढ झाल्याचें दिसून येईल. ही वाढ होण्याचें मुख्य कारण म्हणजे अपेक्षेपेक्षा कर्जांत जास्त रक्कम गुंतली गेली व त्यामुळें उत्पन्नांत रु. ६,०७५ ची वाढ झाली. कर्जांत जास्त प्रमाणांत रक्कम गुंतत असल्यानें पुढील वर्षींहि उत्पन्नांत बरीच वाढ होण्याची शक्यता आहे. एकूण खेळत्या भांडवलामध्यें रु. २,३८,३६७ नीं वाढ झालेली आहे.

एकूण थकबाकीचें प्रमाण कर्जांत गुंतलेल्या रकमेशीं शेंकडा ०·६ आहे. गतवर्षी हें प्रमाण शेंकडा ०·५ होतें. लवाद व फिर्यादी प्रकरणांची संख्या फक्त ९ असून त्यामध्यें गुंतलेली रक्कम रु. १,५७५ आहे. गतवर्षीपेक्षा ही रक्कम रु. ४३ नें कमी आहे.

## दि पूना अर्बन को. बँक लि., पुणें

या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २९-९-५७ रोजीं होऊन खालील पदाधिकारी बिनविरोध निवडून आले:—

### सल्लागार मंडळ

(१) मा. व. ब. इनामदार, अध्यक्ष (२) मा. गो. ल. थत्ते, सभासद (३) मा. कि. ल. बारणे (४) मा. ना. अ. सुकाळे (५) मा. य. गो. मोकाशी.

### व्यवस्थापक मंडळ

(१) मा. र. पां. भोंडे, बी. ए., एलएल. बी., वकील कार्याध्यक्ष (२) मा. त्र्यं. ना. पोळ, उपकार्याध्यक्ष (३) मा. न. भा. कुलकर्णी, सभासद (४) मा. दि. वि. इनामदार (५) मा. म. भा. शेळके (६) मा. डॉ. दे. त्र्यं. विसाळ, एल. सी. पी. एस. (७) मा. ल. ध. डुंबरे (८) मा. व. ल. गोसावी (९) मा. मा. म. पवार.

### स्थानिक हिशेब-तपासनीस

(१) मे. रा. कृ. देशपांडे, बी. ए., बी. कॉम., बी. टी.

---

## दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर

ह्या बँकेची वार्षिक साधारण सभा ता. २९-९-१९५७ रोजीं बँकेचे सभागृहामध्यें झाली. चालू वर्षी अध्यक्षांचे जागेची व डायरेक्टर बोर्डांतील तीन जागांची निवडणूक झाली. श्री. वामन कृष्णाजी उत्पात बी. ए., एलएल. बी., वकील हे अध्यक्ष म्हणून बहुमतानें निवडून आले व डायरेक्टर बोर्डाच्या तीन जागांसाठी श्री. प्रभाकर दामोदर पुरंदरे, श्री. गोविंद बाळकृष्ण परिचारक व श्री. बाबूराव बळवंत बोरगांवकर हे बहुमतानें निवडून आले. वार्षिक साधारण सभेंत अहवाल, ताळेबंद, नफ्याची वांटणी, लोकल व स्टॅटयुटरी ऑडीटरची नेमणूक वगैरे ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आले. भागीदारांना १० रु. चे शेअरला नये पैसे ६२ या प्रमाणें डिव्हिडंडची वांटणी मंजूर करणेंत आली. त्याच दिवशीं रात्रौ ९ वाजतां व्यवस्थापक कमेटीचे (मॅनेजिंग कमेटीचे) सभेंत नगरशेठ श्री. औदुंबर हरबाजी कवठेकर यांची सन १९५७-५८ सालाकरितां चेअरमन म्हणून पुन्हां निवड करण्यांत आली.

अहवालाचे सालीं बँकेचें शेअर भांडवल, रिझर्व्ह फंड, इतर फंडस व खेळतें भांडवल व एकूण व्यवहार यांमध्यें बरीच वाढ झाली असून ही बँक सतत गेलीं १३ वर्षे "अ" वर्गांत आहे.

---

## सोलापूर डि. सें. को. बँकेचे चेअरमन श्री. गणपतराव साठे यांची पुन्हां बिनविरोध निवड

रिपन हॉलमध्यें सोलापूर डि. सें. को. ऑ. बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची बैठक होऊन हल्लींचे चेअरमन श्री. गणपतराव साठे, एम. एल. सी. यांचीच पुढील वर्षासाठी चेअरमन म्हणून व श्री. मच्छिंद्र लक्ष्मण पाटील यांची व्हा. चेअरमन म्हणून एकमतानें निवड झाली. श्री. साठे हे चालू वर्षी सतत नवव्या वेळीं चेअरमनपदी बिनविरोध निवडून आले आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## अन्योन्य सहाय्यकारी मंडळी लिमिटेड, बडोदें

अध्यक्ष :—स. अ. सुधाळकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजर :—नरहर केशव कोराणे

वर्षअखेर भागदारांची संख्या ६,९२४ असून त्यांचे भाग ५७,४५० आहेत, गतवर्षी भागदार ६,९२१ असून त्यांचे भाग ५७,४४५ होते. वर्षअखेर ३ भागदार व ५ भाग वाढले आहेत. मंडळीचें भांडवल रु. ३७, ३८, २२२ = १५ चे झालें आहे. त्यापैकी भागांचें भांडवल २,८७,२५० रु. असून ठेवींचें भांडवल ३४,५०,९७२ रु. आहे. वेगवेगळ्या निधींत मिळून ४,९०,३४४ रु. आहेत. भागदारांकडे १९,२६,४५२ रु. कर्ज येणें आहे. मुदत चुकलेल्या कर्जाची रक्कम रु. २,२८,१६७ आहे. वर्षअखेर ८१ हुकूमनामे शिल्लक असून त्यांची बाकी रु. १,२६,७२० आहे. निवेदनाचे वर्षी मंडळीस नफा रु. ५२,२०५ झाला. निवेदनाचे वर्षी मंडळाच्या एकंदर सभा ६७ झाल्या व ५८३ ठराव करण्यांत आले.

## दि इस्लामपूर अर्बन को. बँक, लिमिटेड इस्लामपूर

चेअरमन : गोपाळ लक्ष्मण फडणीस, बी. ए., एलएल्. बी.
सेक्रेटरी : के. डी. बोरकर

चालू सालीं मेंबरसंख्या नवीन आठ सभासद दाखल झाल्यामुळें २५५ झाली आहे. शेअर भांडवलहि रुपयें २५,७३० वरून रु. २५,९७५ वर गेलें आहे. ठेवींतहि समाधानकारक वाढ झाली असून त्या रु. १,०८,५४३ वरून रु. १,२७,३६७ इतक्या झाल्या आहेत. खेळत्या भांडवलांतहि झालेली प्रगति उत्साहजनक आहे. मागील सालापेक्षा रिपोर्टांचे सालीं खेळत्या भांडवलांत रु. ३०,००० ची वाढ होऊन तें आतां दोन लाखांपर्यंत वाढलें आहे. रिपोर्टांचे सालीं एकूण येणें कर्जें रु. १,१२,८२९ चीं असून त्यांपैकी थकलेली बाकी रु. २९,७१६ आहे. रिपोर्टांचे सालीं बँकेनें सोन्याचे जिन्नसाचे तारणावर कर्जाऊ रकमा देण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. सालअखेर यावर रु. ६७८६ दिले गेले आहेत. रिपोर्टांचे सालीं बँकेनें मुंबई सरकारचें ४% दराचें रु. ५००० चे कर्जरोखे विकत घेतलें असून आतांपर्यंत गुंतवण केलेली रक्कम एकूण रु. ३०,००० झाली आहे. बँकेस २,००२ रु. नफा झाला आहे.


उद्यम मासिकाचा

**सुगंध विशेषांक**

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर प्रसिद्ध होईल.

'सुगंध विशेषांकां'त नैसर्गिक तसेच कृत्रिम सुगंध व ते तयार करण्याची विस्तृत सचित्र माहिती देण्यांत येईल.

आजच 'उद्यम'ची वार्षिक वर्गणी रु. ६ पाठवून वर्गणीदार झाल्यास दिवाळीचा

'सुगंध विशेषांक'

व इतर अंक वर्षभर आपणांला मिळतील.

'उद्यम' मासिक, धर्मपेठ, नागपूर १.

कण आणि क्षण व पुढे पाऊल

ह्या लोकप्रिय व सर्वमान्य पुस्तकांचे लेखक

श्री. वा. काळे

( संपादक, "अर्थ", पुणें ४ )

ह्यांचें नवें पुस्तक

**तुमचें स्थान कोणतें ?**

हें येत्या दिवाळीचे आधीं प्रसिद्ध होईल.

पृ. सं. सुमारें १२०. ★ किंमत २ रुपये.

कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांची मनमोकळी चर्चा ह्या पुस्तकांत वाचण्यास मिळेल. इष्टमित्रांना श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांच्या देणगीनें आपली रसिकता व्यक्त करा !

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ☆ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०५०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३३,१३५ |
| खेळतें भांडवल ... ... | रु. ६२,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपया
(वा. वर्गणी ६ रु.)

Reg. No. B. 3434-Licence No. 53
Licensed to post without prepayment

# अर्थ

## दिवाळी अंक

१९५७

"भारतीय पंचवार्षिक योजनेचें यश ही
जागतिक शांततेची हमी आहे."

होय. आणि म्हणूनच
साऱ्या जगाचे डोळे आपल्या दुसऱ्या योजनेकडे लागलेले आहेत.
शेती–उत्पादनांतील संकल्पित वाढ हा योजनेचा कणा आहे.
हा कणा मजबूत राखणें आपल्यापैकी प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

शेती–उत्पादनासाठी आवश्यक भांडवलाची वाढती गरज
पुरविण्याचा आटोकाट प्रयत्न आम्ही करीत आहोंत. अधिक
बचत करा, आणि आपली वाढती बचत सहकारी बँकेंत गुंतवा.

पुणें जिल्ह्यांतील

सहकारी चळवळीचें केन्द्रस्थान

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक

लिमिटेड

| भाग भांडवल | ठेवी | खेळतें भांडवल |
|---|---|---|
| रु. १५,६२,१७० | रु. १,१४,३६,६११ | रु. २,४७,५६,१८७ |

का. ग. अळतेकर
कार्यकारी संचालक.

पो. बॉक्स नं. ५११. ★ टेलिफोन नं. २४८३ ★ तारेचा पत्ता : " CENCOBANK ".

ही दीपावलि आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो !

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

—: भांडवल :—

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल (भागापोटीं भरलेल्या आगाऊ रकमांसह) | | | रु. २०,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | ... | रु. १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | ... | रु. ८ कोटींचे वर |

## सेव्हिंग्ज, स्पेशल सेव्हिंग्ज व मुदत ठेवी यांवर वाढविलेल्या व्याजाच्या दराचा फायदा घ्यावा.

स्पेशल सेव्हिंग्ज : द. द. अडीच टक्के

—: संचालक मंडळ :—

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे — श्री. मा. वी. शहा
श्री. फ. दो. पदमजी — श्री. भा. म. गुते
श्री. म. बा. जांभेकर — श्री. म. स. पारखे

: बँकेच्या शाखा :

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, भिवंडी, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर (फलटण गल्ली व मुरारजी पेठ), श्रीरामपूर व ठाणें.

★ हेड ऑफिस, डेक्कन जिमखाना (पुणें), सोलापूर (फलटण गल्ली), नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, पनवेल व किर्लोस्करवाडी येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची सोय असून तिचा जनतेनें फायदा घ्यावा.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

## श्री. वा. काळे ह्यांचें नवें पुस्तक




### लाख मोलाच्या मांडवलाचा कळसा

आपल्यापैकी बहुतेकांचें जीवन, म्हणजे दारिद्र्याशीं हरघडी सामना ! असें असूनहि, तें जीवन केवळ सुसह्यच नव्हे तर उजळ व समृद्ध करणें कित्येकांना साधतें, हें आपण पाहतों. त्यासाठी उपयोगी पडणाऱ्या 'लाख मोलाच्या मांडवला'चा कळसा वास्तविक आपल्याहि खाकेस असतो. पण, परिस्थितीबरोबरच्या दैनंदिन झगड्यांत त्याचा विसर पडला, म्हणजे मग काय, "अडाणी कुणबी, दुप्पट राबे" अशी आपली स्थिति होते.

सामाजिक व कौटुंबिक गुंतागुंतीमध्ये आपण नेमकी कोणती भूमिका वेळोवेळ पत्करली पाहिजे, ह्याचें धोरण राखणें रोजच्या धकाधकीच्या मामल्यांत अवघड होऊन बसतें. बुद्धिबळाच्या डावांत मात करावयाची, तर पहिल्या खेळीपासून थेट अखेरपर्यंत खेळाडूला योजनाबद्ध अवधान ठेवावें लागतें. व्यापक जीवनांतहि हाच नियम लागू आहे.

ह्यासंबंधी, वेगवेगळ्या प्रसंगांच्या आधारें येथे केलेली मनमोकळी, प्रकट चर्चा वाचकांना त्यांच्याच मनांतील विचारांशीं व उपपत्तींशीं सुसंगत वाटेल.

पृ. सं. : १२० किंमत : १ रु.

### पुस्तकांतील विषय

★ तुमचें स्थान कोणतें ? ★ मधुमालतीची शानदार कमान
★ लाख मोलाचें मांडवल
★ सुशिक्षित स्त्रियांचे समृद्ध संसार
★ मुलां-मुलींचे परस्पर-संमतीने विवाह
★ पतीच्या कायद्यांत पत्नीच्या दुरुस्त्या
★ मैत्रीच्या मळ्याची मशागत
★ म्हातारा झाडूवाला आणि त्याचा अखुड खराटा
★ खोट्या प्रतिष्ठेचे बळी
★ लष्करी अधिकाऱ्याची सहचारिणी ★ मधुचंद्र
★ दांडीवरलें धुणें ★ अपकारक शालीनता
★ चहा-फराळाचे प्रसंगांची गोडी ★ आपण सहल काढूं या.
★ आधुनिक ग्रामदेवता ★ गैरसमज
★ रेडिओ आणि पुस्तकें ★ थांबण्याची कला

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

स्थापना—१९२७

शाखा

१ जत  २ मिरज  ३ तासगांव
४ शिराळा  ५ विटा  ६ आटपाडी
७ इस्लामपूर  ८ मार्केट यार्ड सांगली.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १० लाख |
| वसूल भांडवल | रु. | ४,३४,४७० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४१,३४७ |
| ठेवी | रु. | ४२,८३,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ६३,५४,००० |

★ सहकारी संस्थांना शेतीचे व्यवहारासाठी कर्जें दिलीं जातात.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★ संस्थेची स्वतःची भव्य इमारत लौकरच पूर्ण होईल.

श्री. पी. बी. टाकवेकर, मॅनेजर.  श्री. गुलाबराव आर. पाटील, चेअरमन.

## दि इसलामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.

स्थापना १९१६ ]  [ रजिष्टर नं. ५४०४

मुख्य कचेरी – उरण इसलामपूर, जि. द. सातारा.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. ३५,९०० |


बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एम्. डी. पवार, (चेअरमन)
श्री. ए. बी. रोटे, (व्हा. चेअरमन)
श्री. के. एम्. पोटे, (सभासद)
श्री. एस. ए. वाकळे, ,,
श्री. एस. बी. कल्ले ,,
श्री. डी. टी. रानमाळे ,,
श्री. एस. ए. इषूरी ,,

बँकिंगचे सर्व व्यवहार किफायतशीरपणें केले जातात.

ही दीपावलि आमचे भागिदारांस व हितचिंतकांस सुखावह जावो.

डी. डी. लाटकर,
मॅनेजर.



# इमानी

हॉरिझाँटल फोर स्ट्रोक कोल्ड स्टार्ट स्लो व मेडियम स्पीडचीं क्रूड-ऑईल इंजिन्स, ५, ७।८, ९, १० व १३ हॉर्सपॉवरचीं व ५ हॉर्सपॉवरचे पंपिंग सेटस्.

इमानी इंजिनें सरकारनें तगाईवर घेण्यासाठी मंजूर केलेलीं आहेत.

उत्पादक :— कुल्को इंजिनिअरिंग वर्क्स लि.,
इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर.

# अर्थ

**दिवाळी अंक**

२३ ऑक्टोबर, १९५७





स्थापना : १९३५

*संस्थापक :*

प्रो. वामन गोविंद काळे

*संपादक :*

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

## संपादकीय

"अर्था" चा २३ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक आम्ही सादर करीत आहों. "अर्था" नें महाराष्ट्रीय व्यापार व उद्योग ह्यांच्या वृद्धीसाठी आवश्यक तें वाङ्‌मय पुरविण्याचें कार्य १९३५ पासून अखंड चालविलें आहे. "अर्था"चे एक चहाते, श्री. चिं. द्वा. देशमुख (*रिझर्व्ह बँकेचे निवृत्त गव्हर्नर व भारत सरकारचे माजी अर्थमंत्रि*) ह्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्यांच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणें त्याला विशेष कठीण असतें. त्या समजून घेण्यांत त्यांना साहाय्य देणें हें आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचें कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. "अर्थ" ही कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहे, असें मी स्वानुभवावरून, दृढ विश्वासानें सांगूं शकतों. योग्य तें लोकसाहाय्य मिळून "अर्था" ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणानें चालो."

असें साहाय्य देणारे मित्र व संस्था ह्यांच्या पाठिंब्यामुळेंच, "अर्था"ला ही कामगिरी यथाशक्ति बजविता येत आहे; त्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहों.

**ही दिवाळी व नवें वर्ष "अर्था"च्या वाचकांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीचें जावो !**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ हिंदी बँकिंगची स्वातंत्र्योत्तर प्रगति आणि तिची पुढील दिशा ... | ७ | ९ पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद ... | २७ |
| २ ग्रामीण विभागांत व्यापारी बँकांना क्षेत्र ... | ११ | १० शत्रुपक्षावर कागदी शस्त्रास्त्रांचा प्रभावी भडिमार ... | २९ |
| ३ भाग वर्ग करण्यास नकार देण्याचा डायरेक्टरांचा अधिकार ... | १४ | ११ टाटा कंपनीचा रोमांचकारी इतिहास ... | ३१ |
| ४ बँकिंग क्षेत्रांतील 'दर–युद्ध' परिस्थिति ... | १५ | १२ जर्मनीची औद्योगिक ज्योत तेवत ठेवणारें 'क्रुप' घराणें ... | ३५ |
| ५ हिंदी कंपन्यांची प्रगति ... | १८ | १३ सहकारी संस्थांची कर्जवसुली ... | ३९ |
| ६ कंपन्यांमधील मनुष्य–संपर्कांचें वाढतें महत्त्व ... | १९ | १४ विलमार्केट योजनेखाली रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जें ... | ४३ |
| ७ इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ... | २२ | १५ लँडमॉर्गेज बँकांच्या कार्यक्षेत्रावर अतिक्रमण ... | ४४ |
| ८ सहकारी संस्थांची कार्यक्षमता ... | २३ | १६ एका शंभराच्या नोटेची सत्यकथा ... | ४६ |


## "अर्था"चा पुढील अंक

नेहमींप्रमाणें दिवाळीनिमित्त "अर्था"चे दोन अंक बंद राहतील व त्यानंतरचा अंक

**१३ नोव्हेंबर, १९५७ रोजीं प्रसिद्ध होईल.**

दि
नाशिक डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना ता. २६ जानेवारी, १९५५
मुख्य कचेरी : १९०३ मेन रोड, नाशिक.
फोन नं. १४९
नाशिक जिल्ह्यांत ११ शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ९.६० | लाख |
| ठेवी | रु. | ६० | लाख |
| खेळतें भांडवल | रु. | १ | कोट |

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात आणि बँकिंगचें काम केलें जातें.

स. ज. बूच, मॅनेजर.
एस्. जी. पुराणिक, चेअरमन.



सारस्वत को-ऑपरेटिव्ह
बँक लिमिटेड

स्थापना १९१८ ] सारस्वत बँक गृह गिरगांव, मुंबई ४ [ टेलिफोन ४७०९४

विविध बचत योजना

(१) सिल्व्हर ज्युबिली सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् (३, ५ व १० वर्षांची) व्याज द. द. ३½ ते ४½ टक्के
(२) जनता बचत योजना व्याज द. द. २॥ टक्के
(३) रिकरिंग डिपॉझिटस् (१४ व ४५ महिन्यांची) व्याज द. द. ३॥ ते ४ टक्के
(४) होम सेव्हिंग्ज सेफ व्याज द. द. २॥ टक्के
(५) विशिष्ट बचत योजना व्याज द. द. २॥ टक्के
(६) राष्ट्रीय बचत योजना व्याज द. द. ३॥ ते ४ टक्के
(७) मुदतीच्या ठेवी (१ ते १० वर्षेपर्यंत) व्याज द. द. ३ ते ४॥ टक्के

शाखा :—फोर्ट, दादर, माहिम, वरळी, पुणें, बेळगांव

महिला शाखा :—सारस्वत बँक गृह
गिरगांव, मुंबई ४.



दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि.

फोन नं. २१७ ] सोलापूर [ पोस्ट बॉक्स नं. ३२

हेड ऑफिस :—सोलापूर.

शाखा :—(१) पंढरपूर (२) कुर्डुवाडी (३) करमाळा (४) मंगळवेढा (५) अक्कलकोट (६) अकलूज (७) नातेंपुतें (८) सिद्धार्थ, सोलापूर.

पे ऑफिसेस :—(१) मोहोळ (२) सांगोला (३) मोडलिंब (४) माढा.

अडत शॉप्स—(१) अकलूज (२) नातेंपुतें.

सोलापूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केंद्रस्थान असलेली व सतत २९ वर्षे प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल : | रु. | ८,०५,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् : | रु. | १०,९४,००० |
| सर्व प्रकारच्या ठेवी : | रु. | ९८,७२,३४० |
| एकूण खेळतें भांडवल :- | रु. | १,२२,९७,००० |

ठेवीदारांच्या विनंतीवरून ता. १-१०-५७ पासून व्याजाचे दर वाढवून खालीलप्रमाणें ठेवणेंत आले आहेत

सेव्हिंग्ज ठेव .... .... द. सा. द. शें. २ टक्के
स्पेशल सेव्हिंग्ज ठेव द. सा. द. शें. २॥ टक्के

— मुदत ठेवी —

सहा महिने ते तेवीस महिने ...द. सा. द. शें. ३ टक्के
चोवीस महिने ते पस्तीस महिने...द. सा. द. शें. ३। टक्के
छत्तीस महिने व अधिक ...द. सा. द. शें. ३॥ टक्के

मोठ्या रकमेच्या ठेवी ठेवणाऱ्यांनीं बँकेच्या ऑफिसमध्यें मॅनेजर यांना समक्ष भेटावें.

ह्या बँकेंत पैसा ठेवणें म्हणजे जिल्ह्यांतील विकास-योजना व पर्यायानें पंचवार्षिक योजना यशस्वी करणेस हातभार लावण्यासारखें होय.

हेड ऑफिस व शाखा ऑफिसमधून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सोलापूर येथील हेड ऑफिसांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करणेंत आली आहे.

के. के. परवत, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर
गणपतराव घोंडिबा साठे, एम्. एल. सी., चेअरमन.

# हिंदी बँकिंगची स्वातंत्र्योत्तर प्रगति आणि तिची पुढील दिशा

( प्रवीणचंद्र व्ही. गांधी, मॅनेजिंग डायरेक्टर, देवकरण नानजी बँकिंग कं. लि., मुंबई )

आपल्या देशाला १९४७ सालीं स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतामधील बँकिंगच्या धंद्यानें योग्य दिशेनें बरीच प्रगति केली आहे. देशाच्या विकासांत बँकिंग महत्त्वाचें कार्य करीत आहे. १९५१ मध्यें पंचवार्षिक कार्यक्रमांना प्रारंभ झाल्यापासून बँकांनीं खाजगी विभागाला व सार्वजनिक विभागालाहि लक्षांत भरण्यासारखी मदत केली आहे. चालू शतकाच्या प्रारंभीं ह्या क्षेत्रांत परदेशी बँकांची एक प्रकारची मक्तेदारीच होती. परंतु ह्या शतकाच्या पहिल्या दशकांत ज्यावेळीं स्वदेशीची चळवळ सुरू झाली, त्यावेळीं भारतांत ठिकठिकाणीं हिंदी बँकांची स्थापना करण्यांत आली. तथापि, बँकिंगच्या धंदाला खरी चालना मिळाली ती दुसऱ्या महायुद्धाच्या व त्यानंतरच्या काळांत. चलन-वृद्धि, बँकिंगच्या सवलतींच्या फायद्याची लोकांना झालेली जाणीव आणि भारताच्या उद्योगधंद्यांचा होत असलेला विस्तार ह्या कारणांमुळें बँकिंगचा धंदा चांगला फोफावला. देशाची फाळणी झाल्यावर आर्थिक जीवनांत विस्कळितपणा आला आणि भारतामधील बँकांवर विपरीत परिणाम झाला. बऱ्याच शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड बँकांना आपले दरवाजे बंद करावे लागले. तथापि, चांगल्या व पहिल्या प्रतीच्या बँका ह्या दिव्यांतून अधिकच बळकट होऊन बाहेर पडल्या. देशांतील उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्यामध्यें पडत असलेला फरक लक्षांत घेऊन बँकिंगच्या धंद्याचें नियमन करण्यासाठी १९४९ सालीं बँकिंग कंपनीज ॲक्ट मंजूर करण्यांत आला. त्यामुळें बँका, बँकिंग, ठेवीदार आणि सामान्य जनता, ह्या सर्वांचेंच हित झालें असून बँकिंगच्या धंद्यांत अधिक उच्च ध्येयें आणि सचोटीची सेवा ह्यांची जोपासना झाली आहे. ह्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचें कार्य मुख्यतः रिझर्व्ह बँकेकडे सोपाविण्यांत आलें.

## रिझर्व्ह बँकेचें नेतृत्व

देशाच्या बँकिंगच्या व्यवहारांत स्थैर्य उत्पन्न करण्याचें व तो योग्य दिशेनें चालविण्यास मदत करण्याचें कार्य रिझर्व्ह बँक करीत आहे. बँकिंगच्या धंद्यावर परिणामकारक नियंत्रण ठेवून व्यवहारांत चांगली कार्यपद्धति घालून देण्याचें काम तिनें केलें. त्याचप्रमाणें, पतीवर चालणाऱ्या व्यवहारांसाठी अधिक व्यापक व लवचिक अशा सवलती उपलब्ध केल्या. सौदेबाजीसाठी कर्ज देण्यास पायबंद घालून, बिल मार्केट स्कीम सुरू करून आणि इतर सवलती देऊन रिझर्व्ह बँक देशाच्या बँकिंगच्या धंद्यांत उपयुक्त व विधायक कार्य करीत आहे. इंपिरिअल बँक ऑफ इंडिआचें राष्ट्रीयीकरण झाल्यामुळें आणि स्टेट बँक ऑफ इंडिआची स्थापना झाल्यामुळें बँकिंगची संवय ग्रामीण भागांत पसरण्यास फार जोराची चालना मिळाली आहे. स्टेट बँकेचा देशांत ४०० शाखा उघडण्याचा मनोदय आहे. त्यांपैकीं १०० उघडण्यांतहि आल्या आहेत. हा सर्व कार्यक्रम पुरा झाला म्हणजे देशांतील कानेकोपरे बँकिंगच्या कक्षेंत येतील आणि बँकिंगचा चांगलाच विस्तार होईल. व्यापाराच्या व उद्योग-धंद्यांच्या सध्यांच्या गरजा लक्षांत घेऊन त्यांना पोषक होईल अशा रीतीनें, कर्जे देण्याच्या धोरणांत स्टेट बँक बदल करणार आहे असें समजतें. स्टेट बँकेजवळ असणारा पैसा देशाच्या उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कामीं लावता यावा म्हणून कर्जासंबंधींच्या धोरणाला नवी दिशा देण्यांत येत आहे.

## स्टेट बँकेचें धोरण कसें असावें ?

सर्वसामान्य लोकांना व छोट्या शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दरानें कर्जे देऊन मदत करण्याचा हक्क स्टेट बँकेला आहे हें खरें; पण त्याचबरोबर व्यापारी बँकांशीं अयोग्य स्पर्धा करणें, विशेषतः मोठ्या औद्योगिक योजनांना लागणाऱ्या कर्जावर त्यांच्यापेक्षा कमी व्याजाचे दर सांगणें, ह्या गोष्टी स्टेट बँक करणार नाहीं अशी आशा मी करतों. कारण स्टेट बँकेजवळ असा पैसा असतो कीं, त्यावर तिला व्याज फारच थोडें अगर मुळींच द्यावें लागत नाहीं. अर्थातच, व्यापारी बँकांपेक्षा कमी व्याजाचा दर सांगणें त्या बँकेलाच फक्त परवडण्यासारखें असतें. बँकिंगच्या साधनसंपत्तीचा विकास करण्याच्या ह्या मोठ्या कामांत स्टेट बँकेनें मार्गदर्शनाचें व नियमनाचें कार्य करावें असा माझा आग्रह आहे. ह्या क्षेत्रांत तिनें व्यापारी बँकांशीं स्पर्धा करूं नये. व्यापारी बँकांनीं प्रगति करावी अशी अपेक्षा असेल तर स्टेट बँकेनें असेंच धोरण ठेवणें इष्ट आहे. गेल्या दहा वर्षांत देशाचें आर्थिक पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूनें सरकारनें पंचवार्षिक कार्यक्रम सुरू केले आहेत. राष्ट्राची आर्थिक उभारणी करण्यासाठी हा जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे, त्याला बँकांनीं भरभक्कम मदत केली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. सार्वजनिक मालकीचा विभाग घेतला, तर सरकारी रोख्यांत पैसे गुंतवून बँकांनीं त्याला साह्य केलें आहे. १९५१ सालीं ही गुंतवणूक ३०३ कोटी रुपयांची होती. १९५६ सालीं ३८२ कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आली. त्याशिवाय इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मार्गांनींहि मदत करण्यांत आली. पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीच्या विभागाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलेलें आहे. ह्याहि विभागाला व्यापारी बँकांकडून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मदत करण्यांत येत आहे. १९५१ सालीं व्यापारी बँकांनीं व्यापार व उद्योगधंदे ह्यांना ४४७ कोटी रुपयांचीं कर्जे दिलीं होतीं. १९५६ सालीं बँकांनीं ६१२ कोटी रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. १९५१ सालीं बँकांजवळील ठेवी ८६० कोटी रुपयांच्या होत्या. १९५६ सालीं त्या १,०४३ कोटी रुपयांच्या झाल्या. त्याचप्रमाणें, इंडिअन शेड्यूल्ड बँकांच्या परदेशी हुंडणावळीच्या धंद्यांतहि प्रशंसनीय प्रगति झाली. ह्यावरून असें दिसतें कीं, पंचवार्षिक कार्यक्रमाच्या गतीचा परिणाम देशांतील बँकिंगवर निश्चितपणें झाला आहे. खाजगी विभागाला अधिक मदत देण्याच्या उद्देशानें रिफायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत येत आहे. मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांना मध्यम मुदतीचीं कर्जे कॉर्पोरेशन देणार आहे. ह्या योजनेंत १५ व्यापारी बँका सहभागी होत आहेत. अमेरिकेंतील बँकांनीं उद्योगधंद्यांच्या बदलत्या गरजा भागविण्यासाठी जशी

नव्या प्रकारचीं कर्जे देण्यास सुरवात केली तसेंच भारतामधील बँका करतील. आर्थिक कार्यक्रमांना सुरुवात झाल्यापासून औद्योगिक बँकिंगवर अधिक जोर देण्यांत येऊं लागला आहे. त्यामुळें बँकिंगच्या भवितव्याच्या दृष्टीनें फक्त देशांतील स्थित्यंतरांचाच विचार करून भागणार नाहीं. इंग्लंड व अमेरिकेंतील बँकिंगची पद्धत त्या देशांतील उद्योगप्रधान अर्थ-व्यवस्थेच्या गरजांशीं व परिस्थितीशीं निगडित झालेली आहे. ह्या देशांतील बँकिंगच्या पद्धतींत झपाट्यानें पडत जाणाऱ्या फरकांकडेहि लक्ष ठेवावें लागेल. आर्थिक प्रगतीचें चाक पतीवरील कर्जाच्या आसाभोंवतीं फिरत राहणार आहे. विशेषतः औद्योगिक कर्जांना फार महत्त्व येणार आहे. हा आस तयार करण्याचें काम बँकिंगलाच करावें लागेल. औद्योगिक अर्थ-व्यवस्थेला अनुरूप अशा आधुनिक बँकिंगचा विस्तार व संघटना करण्याची संधि सध्यां आलेली आहे. सध्यांच्या बँकिंगच्या पद्धतीला हें आव्हानच आहे. आजच्या व उद्याच्या गरजा भागविण्याच्या कसोटीला ती उतरते कीं नाहीं, हें ठरण्याची वेळ आली आहे.

## रीटेल बँकिंग, साऊंड बँकिंग व वाइझ बँकिंग

गेल्या पंचवीस वर्षांत अमेरिकेंतील बँकिंगच्या पद्धतींत खूप फरक पडला आहे. गिऱ्हाइकांशीं व लोकांशीं अधिक सौजन्यानें वागण्याचें व समाजाची अधिक सेवा करण्याचें धोरण अमेरिकन बँकांनीं स्वीकारलें आहे. बँकवाला म्हटला कीं तो गंभीर चेहऱ्याचा असलाच पाहिजे असें ठरून गेलें होतें. कर्ज देणाऱ्या अधिकाऱ्यानें एखाद्या विक्रेत्यासारखा गिऱ्हाइकाचा अनुनय करणें हें धोक्याचें व अनिष्ट समजलें जात असे. आतां ही दृष्टि बदलली आहे. उद्योगधंद्यांना अधिक मदत कशी करतां येईल, ह्यासंबंधी नवे नवे मार्ग शोधून काढून बँका देशाच्या औद्योगिक विकासांत अधिक क्रियाशील व उपयुक्त अशा तऱ्हेनें वागत आहेत. बँकवाले विक्रेत्याच्या कसबाबद्दल अधिक जागरूक झाले आहेत. कर्जे घेणाऱ्यांबद्दल, मग तो लहान असो अगर मोठा असो, त्यांनीं आपली भूमिका बदलली आहे. निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील तांत्रिक तपशिलाचें पूर्ण ज्ञान मिळवून कर्जे देण्याच्या बाबतींत त्या नवीन पद्धती अंमलांत आणूं लागल्या आहेत.

गिऱ्हाइकांच्या वाढत्या मागण्या भागविण्यासाठीं नवीन युक्त्या त्यांनीं शोधून काढल्या आहेत. 'रीटेल बँकिंग'ची पद्धत त्यांनीं सुरू केली असून मोठ्या रकमांचीं थोडीं खातीं असण्यापेक्षां छोट्या रकमांचीं खूप खातीं असणें हिताचें आहे हें त्यांनीं ओळखलें आहे. चेझ मॅनहॅटन बँकेचे मि. रॉकफेलर ह्यांनीं सांगितलेली ही माहिती अमेरिकेच्या पार्श्वभूमीवरील असली तरी ती भारताला अधिक प्रमाणांत लागू आहे. कारण, भारत हा देश अतिशय अविकसित असून शेती, उद्योग, व्यापार, वहातूक, समाजहित, इत्यादि अनेक बाबतींत येथें खूप विस्तार करण्याची जरुरी आहे. आपल्या देशांत सुद्धां 'साउंड बँकिंग', 'वाइज बँकिंग' ह्या बँकिंगच्या गुणांची जरुरी प्रतिपादन करण्यांत आलेली आहे. ठेवीदारांचे हितसंबंध, भागीदारांचे हितसंबंध आणि सामान्यपणें संस्थेचे हितसंबंध ह्यांची जपणूक करणें ह्याचा 'साउंड बँकिंग' मध्यें समावेश होतो, तर बँकांच्या व्यक्तिगत हिताकडे दुर्लक्ष न करतां सर्व देशाच्या आर्थिक हितसंबंधांच्या दृष्टीनें बँकिंगचा उपयोग करणें ह्याला 'वाइज बँकिंग' असें म्हणतात.

## बँकांकडून अपेक्षित कामगिरी

आज बँकिंग हा धंदा देशाचा व समाजाचा एक अविभाज्य भाग झालेला आहे. रेल्वे, टेलिग्राफ, टेलिफोन, इत्यादींशिवाय ज्याप्रमाणें आपलें चालावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें सुनियंत्रित व योग्य मार्गानें चालणाऱ्या बँकिंगशिवाय आपलें चालणार नाहीं. प्रत्येक सुधारलेल्या देशाची भरभराट बऱ्याच अंशीं बँकिंगवर अवलंबून असते; बँकिंगच्या मदतीशिवाय शेती, उद्योगधंदे, व्यापार ह्यांना आपलें योग्य स्थान मिळवितां येणार नाहीं. राष्ट्राच्या हिताला मदत करणें हें बँकिंगचें ध्येय आहे. (१) देशाचा आर्थिक विकास, (२) औद्योगिक भारताची उभारणी, (३) बचतीला उत्तेजन देऊन लोकांच्या राहणीचें मान वाढविणें आणि (४) देशाला व समाजाला उपयुक्त असें काम करून त्यांची सेवा करणें, ह्या चार मार्गांनीं बँकिंगला आपलें कार्य करतां येईल. बचतीला उत्तेजन देऊन, ठेवी आकर्षित करून आणि हातीं आलेल्या पैशाची उत्पादक रीतीनें गुंतवणूक करून पंचवार्षिक कार्यक्रमांना यशस्वी करण्यांत बँकांना महत्त्वाची कामगिरी करतां येईल. पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी विभागाला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें असून त्या विभागाला लागणाऱ्या पैशांपैकी बराच मोठा भाग व्यापारी बँकांकडून मिळेल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. त्यांना ही कामगिरी समाधानकारक रीत्या पार पाडतां यावी म्हणून पहिल्या प्रथम बँकिंगची अधिक बळकटी करणें व त्याची लोकप्रियता वाढविणें ह्यांची जरूर आहे. असें झालें तर बँकांजवळील त्यांचें प्रमुख साधन जो पैसा, त्याच्यांत वाढ होणें शक्य होईल.

## बँकिंगचा प्रचार

आज अशी परिस्थिति आहे कीं, देशांत वापरांत असलेल्या एकूण चलनाच्या मानानें बँकांजवळील ठेवींतील वाढ फार सावकाश होत आहे. ह्याबाबत असा अंदाज करण्यांत येत आहे कीं, नव्यानें प्रसृत झालेल्या चलनापैकी बराच मोठा भाग अशा लोकांच्या हातीं जात आहे कीं, ज्या लोकांना बँकांचा उपयोग करण्याची अगर बचत करण्याची संवयच नाहीं. म्हणून वाढलेल्या क्रयशक्तीपैकी अधिक मोठा भाग बँकांच्या मार्फत खेळविला जाईल अशा तऱ्हेचे सर्व उपाय योजणें जरूर आहे. आपल्या एकूण चलनाच्या तीन चतुर्थांश चलनाइतक्याच ठेवी शेड्यूल्ड बँकांच्याजवळ आहेत. इंग्लंडमधील बँकांजवळील ठेवी तेथील एकूण चलनाच्या तिपटींपेक्षांहि अधिक आहेत. ह्यावरून भारतामधील बँकांची साधनसंपत्ति वाढविण्यास अजून पुष्कळ वाव आहे हें दिसून येतें. पैसा रिकामा न ठेवतां बँकांच्या मार्फत देशाच्या औद्योगिक व इतर प्रकारच्या कामासाठीं उपयोगांत आणला जावा, अशी शिकवण चतुराईच्या प्रचारानें लोकांना, विशेषतः ग्रामीण भागांतील लोकांना, दिली गेली पाहिजे. त्यांना ह्या बाबतींत शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. उलटपक्षीं, बँकांनींहि आपली दृष्टि अधिक उदार करावी, परंपरागत निष्कारण साचेबंद व्यवहाराच्या पद्धती सोडून याव्या आणि त्यांच्याऐवजीं अधिक विधायक व लवचिक पद्धतींचा स्वीकार करावा. लोकांशीं व्यवहार करण्याच्या पद्धती अधिक सोप्या कराव्या. जरूर तर स्थानिक भाषा वापराव्या; म्हणजे लोकांना व्यवहारांचा उमज पडणें सोपें होईल आणि बँकांतून खातीं उघडून रोखी ऐवजीं चेक्सच्या साह्यानें व्यवहार करण्याचें आकर्षण वाढेल.

## ठेवींचा विमा

भारतामधील बँकिंगच्या भावी प्रगतींत रिझर्व्ह बँकेला परिणामकारक कार्य करतां येणें शक्य आहे. परवाना देण्यांत आलेल्या कोणत्याहि बँकेला आपले दरवाजे बंद करण्याची पाळी येणार नाहीं अशी दक्षता घेऊन रिझर्व्ह बँकेला शेड्यूल्ड बँकांवरील विश्वासांत वाढ करतां येईल. कारण, ह्या बँका तिच्या नियंत्रणा-खालीं असतात. बँकांवर पैसे काढण्यासाठी एकदम गर्दी करण्यांत येणार नाहीं ह्याविषयींहि उपाय योजण्यांत आले पाहिजेत. कारण, एखादी बँक बसली, तर व्यवहारांत चांगल्या बँकेवरील विश्वासहि उडून जातो. म्हणून मध्यवर्ती बँकेनें जरूर पडल्यास आपल्या मोठ्या वार्षिक उत्पन्नापैकी कांहीं भागाची, जोखीम पत्करूनहि, परवानेदार बँकांच्या स्थैर्याची निश्चिति करणें अगत्याचें आहे. अमेरिकेंत ठेवींचा विमा उतरण्याची योजना चालू आहे. तींत जरूर ते फेरफार करून सरकारनें ती रिझर्व्ह बँकेच्या मार्फत अंमलात आणावी. परवानेदार बँकांतील १०,००० रुपयापर्यंतच्या सर्व ठेवींचा योजनेंत समावेश करण्यांत यावा आणि विम्याच्या हप्त्याच्या रकमेपैकी निम्मी रक्कम रिझर्व्ह बँकेनें द्यावी. अशा योजनेचा अमेरिकेंतील अनुभव फार समाधानकारक आहे.


## शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँकांची सांगड


सध्यां ४०० बिगर–शेड्यूल्ड बँका आहेत एकीकरण अगर विस्तार ह्यांपैकी एखाद्या मार्गानें ह्या सर्वच बँकांचें थोड्या वर्षांच्या अवधींत शेड्यूल्ड बँकांत रूपांतर करणें शक्य होणार नाहीं. त्यापैकी कित्येक उपयुक्त काम करीत असतील आणि योग्य रीतीनें चालविल्या जात असतील. भारतासारख्या देशांत गिऱ्हाइकांशीं वैयक्तिक संबंध प्रस्थापित करणें फार महत्त्वाचें असतें. तेव्हां विशेषतः लहानसहान ठिकाणीं अशा बँका उपयुक्त कार्य करीत आहेत ह्यांत शंका नाहीं. तथापि, बँकिंगच्या सर्वसामान्य हिताच्या दृष्टीनें अशा बँकांना सर्वस्वीं स्वतःवरच अवलंबून राहण्यास स्वातंत्र्य देऊं नये. त्या जोंपर्यंत शेड्यूल्ड बँका झाल्या नाहींत, तोंपर्यंत कोठल्या तरी शेड्यूल्ड बँकेशीं त्यांची परिणामकारक रीतीनें सांगड घालण्यांत आली पाहिजे. सरासरीनें एका शेड्यूल्ड बँकेशीं अशा पांच बँकांचे संबंध जोडण्यांत आले तर सर्व बिगर-शेड्यूल्ड बँकांची व्यवस्था होऊं शकेल. शेड्यूल्ड बँकांनीं जोडल्या गेलेल्या बिगर–शेड्यूल्ड बँकांचें स्वतंत्र स्थान अजिबात नष्ट न करतां त्यांच्यावर नियंत्रण ठेवावें व सर्वसाधारण–पणें नजर ठेवावी. कालक्रमानें शेड्यूल्ड बँकांना बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या स्थैर्याविषयीं जबाबदार करण्यांत यावें आणि त्यांच्या भांडवलापैकी बराच भाग शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या मालकीचा करावा. प्रत्येक बिगर–शेड्यूल्ड बँकेनें ज्या शेड्यूल्ड बँकेशीं ती जोडली गेली असेल, त्या बँकेचें नांव आपल्या पत्र-व्यवहाराच्या कागदावर, कामकाजाच्या छापील फॉर्म्सवर व जाहिरातींतून लिहावें अगर प्रसिद्ध करावें. ज्या बिगर–शेड्यूल्ड बँकांना शेड्यूल्ड बँक होतां येणार नाहीं त्यांचे संबंधित शेड्यूल्ड बँकेशीं योग्य काळांत एकत्रीकरण करणें ह्या उपायांनीं शक्य होईल. त्यामुळें देशांतील बँकिंगच्या धंद्याची संघटनाहि अधिक मजबूत होईल.

## मजूर–विषयक निवाडे व इतर अडचणी

कांहीं मजूर–विषयक निवाड्यांनीं बँकिंगच्या विकासाला फार धक्का दिला आहे, बँकांच्या वाढीला व विस्ताराला पायबंद घातला आहे, त्यांची शक्ति व साधनें कमी केलीं आहेत आणि रोजगारी वाढविण्याऐवजीं ती कमी केली आहे. गेल्या कांहीं वर्षांतील बँकांचे वार्षिक अहवाल पाहिले तर त्यांच्यावरील कारभारविषयक खर्चाचा भार एकसारखा वाढत आहे असें दिसून येईल. बँकांना मजूरविषयक कायद्यांतून मुक्त करण्यांत यावें. निदान, वेतन व इतर प्रश्नें ठरवितांना बँकेची पैसे देण्याची पात्रता आणि नोकरांनीं केलेलें काम ह्यांचा तरी प्रामुख्यानें विचार करण्यांत यावा. व्यापारी बँकांनीं ग्रामीण भागांत शाखा उघडाव्या अशी विनंती रिझर्व्ह बँकेनें नुकतीच केली आहे. ग्रामीण भागांतील सुरक्षितता वाढवून, पैसे पाठविण्याच्या बाबतींत सवलती देऊन आणि मजूर–विषयक निवाड्यांपासून

किर्लोस्कर
एंजिनने किती
कामें होतात
ते पहा!





किर्लोस्कर एंजिनची जोड दररोजच्या वापरांत उपयुक्त अशी छोटी यंत्रें चालविण्यास अत्यंत फायदेशीर असते. सेन्ट्रिफ्युगल पंप, पिठाची चक्की, विजेसाठीं जनरेटर, उंसाचा चरक, राइस हलर व कॉंक्रीट मिक्सर वगैरे छोटी यंत्रें किर्लोस्कर एंजिनच्या साहाय्यानें दीर्घकालपर्यंत मनपसंत कामगिरी बजावतात. विशेष माहितीसाठीं विचारणा करा.

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् लिमिटेड, खडकी, पुणें ३

किर्लोस्कर ५ हॉर्स पॉवर डिझेल एंजिन

KOEL/M-4/57 TOM & BAY (Adv.) Ltd.

मुक्तता देऊन रिझर्व्ह बँकेनें ह्याबाबतींत व्यापारी बँकांना मदत करावी.

### अहितकारक स्पर्धा नको

ठेवींवरील व कर्जांवरील व्याजाचे दर, बिलसवरील कमिशन्स व डिस्कौंट, ह्या व इतर बाबतींत अहितकारक स्पर्धा टाळण्यांत यावी. रिझर्व्ह बँकेनें ह्यासंबंधीं प्रयत्न केल्यास स्पर्धा सहज टाळता येण्यासारखी आहे. निरनिराळ्या प्रकारच्या ठेवींवरील व्याजाच्या दरांवर मर्यादा घालून ठेवीवरील व्याजाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीनें कांहीं वर्षांपूर्वी बँकवाल्यांनीं आपसांत करार करण्याचा प्रयत्न केला होता. ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकनेंच पुढाकार घेतला होता. पण दुर्दैवानें हे प्रयत्न फसले आणि कोठलाच करार झाला नाहीं. तथापि, ह्या बाबतींत बँकांनीं कांहींतरी समजुतीचा मार्ग काढणें जरुरीचें आहे. अशा प्रकारचीं विधायक पावलें जर टाकण्यांत आलीं तर बँकांची मजबुती वाढेल; त्यांची साधनसंपत्ति वाढेल; आणि देशाच्या औद्योगिक विकासांत बँकांनीं जी कामगिरी करावी अशी अपेक्षा आहे, ती बऱ्याच प्रमाणांत त्यांना करतां येईल.

### ब्रिटिश बँक रेट व भारत

ब्रिटनमधील बँक रेट वाढविण्यांत आल्यामुळें भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होण्याचा संभव आहे? मी कांहीं अर्थशास्त्रज्ञ अगर द्रव्यविषय जादूगार नाहीं. तरीपण माझ्या मतानें काय घडण्याचा संभव आहे तें सांगतों. स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारत सरकारनें आणि रिझर्व्ह बँकेनें पुष्कळदां स्पष्ट केलें आहे, कीं भारतामधील आर्थिक व द्रव्यविषयक धोरणें भारतामधील आर्थिक परिस्थितीशीं जुळतीं ठेवण्यांत येतात. त्यांचा इंग्लंडमधील परिस्थितीशीं आतां संबंध ठेवण्यांत येत नाहीं. १९५१ सालीं बँक ऑफ इंग्लंडनें व रिझर्व्ह बँकेनें नोव्हेंबरमध्यें बँक रेटमध्यें एकाच वेळीं वाढ केली, हें खरें आहे. त्यानंतर बँक ऑफ इंग्लंडच्या दरांत पुष्कळ वेळां बदल करण्यांत आला. पण रिझर्व्ह बँकेनें मात्र दरांत एकदांच फरक केला. तेव्हां रिझर्व्ह बँकेचा सध्यांचा ४ टक्के दर केवळ बँक ऑफ इंग्लंडचा दर ७ टक्के करण्यांत आला म्हणून वाढविण्यांत येणार नाहीं. इंग्लंडमधील नाणेबाजारावर भारतामधील नाणेबाजार अवलंबून नसल्यानें, भारतामधील परिस्थितीमुळें दर वाढवावा लागला तरच तो वाढविण्यांत येईल. भारतामधील एक्सचेंज बँका हंगामांत लंडनमधील नाणेबाजारांतून पैसे घेतात. पण गेल्या कांहीं वर्षांचा अनुभव असा आहे कीं, इंग्लंडमधील बँक रेट रिझर्व्ह बँकेपेक्षा अधिक असल्यानें असा पैसा थोडा येतो. सध्यांच्या वाढलेल्या दरामुळें लंडनच्या नाणेबाजारांतील भारतांत येणारा पैसा आणखीच कमी होईल, अशी अपेक्षा आहे. ह्याचा एक परिणाम असा होण्याचा संभव आहे कीं, एक्सचेंज बँका आपल्याजवळील ठेवींवरील व्याजाच्या दरांत वाढ करण्याऐवजीं भारतांत कर्ज देण्याच्या बाबतींत हात आखडतां घेतील. म्हणजे, ब्रिटनमधील बँक रेट वाढल्यामुळें भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठासा परिणाम होईल असें नाहीं. पण ह्या परिणामावर बारीक लक्ष मात्र ठेवलें पाहिजे. कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, ब्रिटनकडून भांडवली माल आयात करून त्याची किंमत उशिरा देण्याची जी व्यवस्था भारत करूं पाहात आहे, तिच्यावर ब्रिटनच्या बँक रेटच्या वाढीचा परिणाम होऊन भांडवली मालाची किंमत वाढेल. आधीच करण्यांत आलेल्या करारांत व्याजाचा दर जर स्पष्ट निर्दिष्ट करण्यांत आलेला असेल तर वाढलेल्या बँक रेटचा वरील व्यवस्थेवर कांहीं परिणाम होणार नाहीं.

### उज्ज्वल भवितव्य

मला असें वाटतें कीं, भारतामधील बँकिंगचें भवितव्य उज्ज्वल आहे. बँकांकडून होणारी सेवा अधिक उपयुक्त करण्यासाठी खाजगी विभागांतील बँकांच्या स्थानाचा अधिक पूर्णत्वानें अभ्यास झाला पाहिजे. त्याचप्रमाणें बँकिंगची पद्धति व तिच्या कार्याच्या व्याप्तीचें स्वरूप ह्यांची अधिक बिनचूक छाननी झाली पाहिजे. कांहीं जणांचें म्हणणें असें आहे कीं, सध्यांच्या परिस्थितीशीं जुळेल अशा रीतीनें बँकिंगचें नियोजन करण्यांत यावें. बँकिंगचें नियोजन करतांना देशाच्या अर्थव्यवस्थेच्या असंघटित भागांत जिरणारा पैसा गोळा करण्याचा हेतु ठेवण्यांत यावा. त्यासाठी व्यापारी बँकांचा देशांत विस्तार करण्यांत यावा.




खास दिवाळीकरितां
अन्नाचें रहस्य
बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
व्ही. पी. बेडेकर आणि सन्स प्रायव्हेट लि.
दुकानें —गुलवाडी, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें. —

# ग्रामीण विभागांत व्यापारी बँकांना क्षेत्र

( गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी. )

आपलें बँकिंग देशांतून सर्व ठिकाणीं व्यवस्थितपणें पसरविलें न गेल्यामुळें होणारी कुचंबणा बँकांना गेल्या वर्षापासून चांगलीच जाणवूं लागली आहे. पंचवार्षिक योजनांनुसार होत चाललेल्या आर्थिक विकासाच्या वाढत्या गतीस तोलून धरूं शकणारी बँकिंगची योजनाबद्ध आंखणी अद्याप अंमलांत न आल्यामुळें आर्थिक क्षेत्रांत एक पोकळी निर्माण होऊन, विकासयोजनासाठीं ग्रामीण विभागांत सरकारकडून होत असलेल्या खर्चाच्या मोठ्या रकमा बचतीच्या स्वरूपांत बँकांकडे परत येत नसल्यामुळें, त्यांच्या ठेवींत अपेक्षित वाढ होणें कठीण पडत आहे. कर्जासाठी मात्र मागणी सारखी फुगत असून त्यामुळें बँकांच्या शक्तीवरील ताण वाढत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

### कर्जांची वाढती मागणी

अशा परिस्थितीचें नीट आकलन होण्यासाठी थोडी आंकडे-वारी पाहणें इष्ट होईल. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अवधींतील बँकांकडील कर्जे एकूण १८४ कोटींनीं वाढलीं होतीं, तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीच्या वर्षातील ही वाढ १३९ रु. कोटींपर्यंत गेली. या योजनेंतील खाजगी क्षेत्रांतील गुंतवणूक पहिल्या योजनेंतील गुंतवणुकीच्या मानानें दुपटीच्या घरांत होणेची असल्यानें बँकांकडून मिळणेच्या कर्जासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत मागणी होत जाणार यांत शंका नाहीं. त्यांतच या खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांच्या खेळत्या भांडवलासाठी नेहमींची अल्प मुदतीचीं कर्जे पुरवितांना अशा कंपन्यांच्या विकासासाठी व अद्यावतीकरणासाठीहि मध्यम मुदतीच्या कर्जांचीहि तरतूद करणें बँकांना भाग पडणार आहे. सध्यां निरनिराळ्या कंपन्यांकडून या कारणासाठी ३ ते ५ वर्षे मुदतीच्या ठेवी सहा टक्के दरानें स्वतंत्रपणें जनतेकडून मिळ-विण्याकरितां जाहिराती प्रसिद्ध होत आहेत, यावरूनच हें स्पष्ट दिसत आहे.

### चलनाचे प्रमाणांत ठेवींत वाढ नाहीं

अमेरिका व इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांत बँकिंगचा प्रसार इतका विस्तृत झालेला आहे कीं, प्रसारांतील चलनाच्या अनुक्रमें ५००% व ४००% ठेवी तेथल्या बँकांकडे दिसून येतात. आपल्या देशांतील हें प्रमाण ७५% पेक्षा जास्त नाहीं. १९५६ मधील याबाबतचे आंकडे लक्षांत घेतां प्रसारांतील चलन १५२५ कोटी रु. असतां ठेवी १०७० कोटी रु. चा होत्या; म्हणजे १९५५ च्या मानानें चलनांत १८५ कोटी रु. ची वाढ झाली तरी बँकांकडील ठेवींत फक्त १०१ कोटी रु. ची वाढ दिसून येते. याच काळांत बँकांकडील कर्जांत १४३ कोटींची जादा मागणी झालेली दिसते. अर्थात् ही ४२ कोटींची भरती बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून कर्जे घेऊन केली हें उघड आहे. अशा प्रकारें वाढत्या चलनांतून बँकांकडे प्रमाणशीर ठेवी न येण्याचें मुख्य कारण म्हणजे हा पैसा ज्या विभागांत खर्च होत आहे, तेथें बँकांनीं आपलें जाळें यापूर्वी पसरलें नसल्यानें तेथील जनता बँकिंगच्या संवयीपासून अलिप्त राहिली आहे. बँकांकडे होत जाणाऱ्या वाढत्या कर्ज-मागणीबरोबर त्यांच्या ठेवींतहि तित-कीच वाढ न होतां केवळ रिझर्व्ह बँक किंवा तत्सम संस्थांकडून घेतलेल्या कर्जांतून अशी मागणी पुरवीत राहणें, हें देशाच्या आर्थिक सुदृढतेचें लक्षण खास नव्हे.

### तूट सोसूनहि शाखा-विस्तार हवा

जनतेकडील वाढत्या उत्पन्नांतून झालेली बचत ठेवींच्या स्वरूपांत बँकांकडे येऊं लागून त्यांतून कर्जांचा पुरवठा अनायासें होऊं लागणें हेंच आर्थिक मजबुतीचें निदर्शक ठरेल आणि हें घडून येण्याचा एकमेव उपाय म्हणजे बँकांनीं आपला शाखा विस्तार अशा भागांत दूरवर योजनाबद्ध करून हा पैसा आपल्याकडे आकर्षण्यासाठी तेथील जनतेस बँकिंगची संवय लाविली पाहिजे. यापूर्वीचें आपलें बँकिंग मुख्यतः नफ्याच्या दृष्टीनेंच वाढीला लागलें; परंतु आतां बँकिंग मजबूत पायावर दृढ करण्यासाठी दूर दृष्टीनें वागण्याची वेळ आली असून त्याकरितां सुरवातीच्या काळांत थोडी झीज सोसण्याचीहि तयारी दाखविली पाहिजे. अशा स्वरूपाचे विचार केवळ प्रमुख बँकर्सनींच मांडलेले नसून खुद्द रिझर्व्ह बँकेकडून तिच्या गेल्या सालच्या अहवालांत 'Task before The Banking System' या प्रकरणांत नमूद करण्यांत आले आहेत. तेच येथें उद्धृत करणें योग्य होईल:—

"Apart from the changing character of the demand for Bank credit, the scale on which short term credit would be required for the implementation of the private investment targets of the Second Plan raises the fundamental question of the adequacy of Bank resources. The main line of approach toward the solutions of the problem faced by banks, should be in the direction of extensive branch expansion, which alone will enable them to augment their deposit resources through mobilisation of the cash resources in areas which have so far remained outside the orbit of the organized banking system and thus help to meet the credit needs of the economy without difficulty ······ The effort of the State Bank in this respect requires to be supplemented by an equally vigorous programme of branch expansion by other Commercial Banks, which can undertake much greater activity in this field······The losses are inevitable in the early years······As the extension of branch activity will ultimately lead to an increase in the profit potentiality of Banks, it is in their interests to draw up a short term programme of branch expansion and implement it." pp. 32.

### आतांपर्यंतच्या विस्ताराचा आढावा

व्यापारी बँकांनीं आपला शाखा-विस्तार विस्तृत प्रमाणांत करणें निकडीचें झालें असल्यानें आतापर्यंत झालेला हा विस्तार कितपत झाला आहे व त्याचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे याचा आढावा घेणें इष्ट ठरतें. या दृष्टीनें पुढील कोष्टकांत जरूर ते आंकडे देण्यांत आले आहेत.

| ठिकाणांची लोकसंख्या | अशीं एकूण ठिकाणें | बँक कचेऱ्या असलेलीं ठिकाणें | शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या स्टेट बँकेच्यासह | नॉन शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या | को-ऑपरेटिव्ह बँकांच्या कचेऱ्या | एकूण बँक कचेऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १० लाख व त्यावरील | ४ | ४ | ४२९ | ३१ | १०७ | ५४७ |
| १ लाख व ,, | ७६ | ७६ | ७३३ | १९२ | १९७ | ११२२ |
| ५० हजार व ,, | १११ | १०० | ४०६ | ११६ | १०९ | ६३१ |
| २५ हजार व ,, | ४०१ | २०२ | ४७९ | १२४ | १५३ | ७५६ |
| १० हजार व ,, | ८५६ | ५५२ | ६२५ | ३०२ | २९८ | १२२५ |
| ५ हजार व ,, | ३१०१ | ३८२ | १७५ | १८५ | २२५ | ५८५ |
| ५ हजारचे खालील लोकसंख्या निश्चित नसलेलीं इतर ठिकाणें | — | २२० | ७५ | ९४ | ९५ | २६४ |
| | — | २१६ | ४४ | ५७ | १४४ | २४५ |
| एकूण | ४५४९ | १७५२ | २९६६ | ११०१ | १३२८ | ५३९५ |

या कोष्टकावरून सकृद्दर्शनींच दिसून येईल कीं, बँकांच्या कचेऱ्यांची मोठ्या शहरांत बरीच गर्दी झाली असून कमी लोकसंख्येच्या ठिकाणीं बँकिंगची सोय दुर्मिळ आहे. पन्नास हजारवरीलसुद्धां कांहीं शहरांत बँकांच्या कचेऱ्या नाहींत व पांच हजारच्या खालच्या गांवांत कांहीं ठिकाणीं अशा कचेऱ्या आहेत. यावरून बँकांनीं आपला विस्तार ज्या ठिकाणीं व्यवहार मिळण्याची शक्यता आहे अशा लहान गांवांतूनहि केलेला आहे असें दिसून येतें. परंतु यांत एक गोष्ट मात्र आढळते कीं, नफा मिळण्याची आशा व त्यामुळें चढाओढीचें धोरण ठेवूनहि त्या त्या ठिकाणींच बँकांनीं आपल्या कचेऱ्या उघडल्या आहेत. योजनाबद्ध असा जर हा विस्तार झाला असतां तर सर्व बँकांची एक संघटना होऊन तिच्या मार्फत बँकिंगची सोय जास्तींत जास्त ठिकाणीं उपलब्ध होण्यासाठी एकाच ठिकाणीं अनेक कचेऱ्यांची जरूर आहे किंवा नाहीं, किंवा पूर्वींच तेथें असलेल्या कचेऱ्यांना पुरेसें काम आहे किंवा कसें, याचा विचार होऊनच या शाखा अस्तित्वांत आल्या असत्या. आज बँकांनीं आपला शाखा-विस्तार, व्यापाऱ्यांच्या दुकानाच्या धर्तीवर केला आहे असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं.

## आतां तरी विस्तार योजना आखून करा

अलीकडे व्यवस्थितपणें बँकांच्या कचेऱ्यांचा विस्तार होण्याचे हेतूनें रिझर्व्ह बँकेकडून शाखा उघडण्यास परवानगीची अट ठेवण्यांत आली आहे. तरी सुद्धां या निर्बंधानुसार उघडण्यांत आलेल्या शाखांची मांडणी फार समाधानकारक वाटत नाहीं. नव्या ठिकाणीं शाखा उघडण्यापेक्षा बँक कचेऱ्या असलेल्याच गांवीं जास्त शाखा उघडण्यास परवानगी मिळाली आहे, असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. रिझर्व्ह बँकेचा या बाबतींत कोणता निश्चित दृष्टिकोन आहे हें समजून येत नाहीं. बँकेची एका ठिकाणीं कचेरी उघडण्यास परवानगी एका बँकेस नाकारल्यावर दुसऱ्या बँकेस देण्यांत येते. अगदीं अलीकडे तीन हजारच्या खालीं लोकवस्ती असलेल्या एका गांवांत एक बँक चालू असतां दुसऱ्या एका बँकेस शाखा उघडण्यास परवानगी मिळालेली आहे. निदान अशी परवानगी देण्यापूर्वी ज्या बँकेची कचेरी तेथें चालू आहे त्या बँकेस त्या बाबतचा अभिप्राय विचारण्याची प्रथा ठेवल्यास बँकिंगच्या हिताच्या दृष्टीनें सोयीचें ठरेल. रिझर्व्ह बँकेनें स्वतःच आपल्या अहवालांत अविकसित भागांत बँकांचा विस्तार होणें जरूर आहे असें म्हणतांना, नवीन शाखा उघडण्याची परवानगी मागणाऱ्या बँकांना ज्या ठिकाणीं बँका नाहींत, त्या ठिकाणीं शाखा उघडण्याचा सल्ला देणें हेंच योग्य ठरेल. सध्यां पुष्कळ बँकांच्या बाबतींत त्यांच्या शाखा चढाओढीमुळें समाधानकारक स्थितींत नाहींत असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. विशेषतः मध्यम व लहान आकाराच्या बऱ्याच बँकांच्या बाबतींत ही सत्यस्थिति आहे. स्टेट बँकेकडून सुद्धां शाखा नवीनच ठिकाणीं, म्हणजे बँक कचेरी नसलेल्या ठिकाणीं उघडल्या जात आहेत असें म्हणतां येत नाहीं. परंतु स्टेट बँकांच्या कचेऱ्या उघडण्यांचा मुख्य हेतु सरकारी ट्रेझऱ्यांची व्यवस्था पाहून रकमांची ने-आण सौकर्यानें होऊन बँका व सोसायट्या यांना पैशाचा पुरवठा करण्याचाच असल्यानें अशा कचेऱ्यांची जरूरी आहे असें म्हणतां येईल. मात्र, रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें अहवालांत दिग्दर्शित केल्यानुसार स्टेट बँकेनें अशा ठिकाणीं इतर बँकांशीं चढाओढ न करतां त्यांना सवलती व साहाय्य देण्याचेंच धोरण कटाक्षानें पाळणें अगत्याचें ठरतें.

## श्री दत्त ह्यांच्या योजनेचा मसुदा

एवंच, आतांपर्यंत झालेला बँक कचेऱ्यांचा विस्तार योजना-विरहित असल्यानें यापुढें बँकांची शक्ति वाढविण्याचे हेतूनें जनतेंतील जादा क्रयशक्तीचा ओघ बचतीच्या रूपानें बँकांकडे लावण्यासाठीं योजनाबद्ध विस्ताराची आंखणी करणें जरूरीचें आहे. या दृष्टीनें कलकत्त्याचे श्री. बी. के. दत्त यांनीं एक सूचनात्मक योजनेचा मसुदा तयार करून इंडियन बँक्स असोसिएशनपुढें ठेवला आहे. परंतु त्याबाबत सदर असोसिएशन-कडून विशेष उत्साह किंवा त्यावर चर्चा करण्यासाठीं सर्व बँकांची परिषद् बोलाविण्याची आस्थाहि दाखविण्यांत आलेली नाहीं आणि सदर असोसिएशनची घटना व तिचें सदस्यत्व हें लक्षांत घेतां या बाबत कांहीं घडवून आणलें जाईल, असेंहि निश्चितपणें म्हणतां येत नाहीं. योग्य त्या अधिकाराशिवाय अशा संघटनांकडून तिच्या सदस्यांकरवीं अशा प्रकारची जबाबदारीची योजना पार पाडण्याचा उपक्रम न झाल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

## रिझर्व्ह बँकेनेंच योजना करावी

त्याऐवजीं, देशांतील बँकिंग मजबूत पायावर उभारण्यासाठीं अस्तित्वांत आलेल्या मध्यवर्ती व सत्ताधारी अशा रिझर्व्ह बँकेकडूनच या बाबतींत एक योजना तयार करून तिच्याशीं संलग्न असलेल्या बँकांना त्यानुसार देशांत सोय असेल त्या त्या ठिकाणीं शाखा उघडण्यास किंवा नव्या लहान बँका काढण्यास मुभा ठेवावी. सुरवातीस पांच हजार लोकसंख्येच्या गांवापुरतीच साधारणपणें ही योजना मर्यादित ठेवली गेल्यास अशी निदान २,५०० तरी ठिकाणें उपलब्ध होतील. याच्या जोडीस, ज्या ठिकाणीं विकास योजनांवरील खर्च चालू आहे अशीहि ठिकाणें किंवा नवीन उद्योग अस्तित्वांत येत आहेत अशा औद्योगिक वसाहती, वेअर हौसिंग बोर्डाचीं गुदामें बांधलीं जाणारीं गांवें व स्टेट बँकांच्या शाखांमुळें पैशाची ने-आण करण्याची सोय असलेली व्यापारी केंद्रें, अशींहि ठिकाणें घेतां येतील. स्टेट बँकेकडून शाखांची उभारणी जितकी लवकर पुरी होईल, त्याप्रमाणें इतर बँकांना सोयीचें होणार आहे. परंतु ग्रामीण विभागांत बँकांच्या शाखा उघडण्यास स्टेट बँकेपेक्षा किंवा बड्या बँकांपेक्षा मध्यम व लहान आकाराच्या बँकाच जास्त उपयोगी पडणार हें निश्चित.

## योजनेचें स्वरूप कसें असावें ?

रिझर्व्ह बँकेच्या डेव्हलपमेंट ऑफ बँकिंग या विभागाकडे सध्या स्टेट बँकेच्या शाखांची मांडणी करण्याचें काम आहेच. त्याच-बरोबर अशीहि योजना पार पाडण्याचें काम या विभागाकडे सोपविण्यांत यावें. ही योजना तयार करण्यासाठी रिझर्व्ह बँके-कडून तज्ज्ञांची एक कमिटी नेमण्यांत यावी व त्यांत बँकांचे प्रतिनिधी असावे. मुख्य प्रश्न सुरवातीच्या कांहीं काळांत येणाऱ्या नुकसानींचा असणार. यासाठी या अविकसित विभागां-तील शाखांचा किंवा नव्या बँकांचा नोकरवर्ग यांची वेतनश्रेणी कोणत्या वर्गाची असावी, विकासाकरितां होत असलेल्या खर्चा-साठी म्हणून करामध्यें सवलत किती काळपर्यंत ठेवण्यांत यावी, व शिवाय नुकसान सहन होण्यासाठी स्टेट बँकेच्या बाबतींत ज्याप्रमाणें डेव्हलपमेंट अँड इंटिग्रेशन फंड निर्माण करण्यांत आला आहे, त्याच धर्तीवर सर्व बँकांकडून त्यांच्या वार्षिक मिळकतीच्या एका विवक्षित प्रमाणांत रक्कम रिझर्व्ह बँकेकडे जमा होऊन त्यामध्यें सरकारतर्फे व रिझर्व्ह बँकेनें आपला हिस्सा जमा करावा. शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींच्या शेंकडा ७% रक्कम रिझर्व्ह बँक बिनव्याजी ठेवून घेत असते, तेव्हां त्याचें कांहीं व्याज म्हणून जरी रिझर्व्ह बँकेकडून या बँकांच्या विस्तार योजनेस रक्कम जमा होत गेली तरी बराच कार्यभाग होण्यासारखा आहे.

ग्रामीण विभागांत केवळ सहकारी सोसायटयांमार्फत कर्जपुरवठ्याची योजना पार न पाडतां कांहीं ठिकाणीं तरी कार्यक्षम अशा व्यापारी बँकांना वाव दिल्यास व त्यांना को-ऑपरेटिव्ह प्रमाणेंच सवलती कराच्या बाबतींत दिल्यास त्यांचेकडून सरकारच्या अशा योजना चांगल्याप्रकारें पार पाडल्या जातील. सहकारी सोसायट्यांचें स्वरूप कोणतें असावें याबद्दल पुनः मतभेद होत असल्याचें श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारी, व्हा. चेअरमन, प्लॅनिंग कमिशन यांच्या अलीकडील भाषणांवरून दिसून येतें. तसेंच सहकारी चळवळीची आतांपर्यंतची कार्यक्षमता पाहतां, यापुढेंहि मल्टिपर्पज अथवा विविधकारी सोसायट्यां-कडून कितपत कामगिरी होईल याची तज्ज्ञानाहि शंका वाटत आहे. त्यादृष्टीनें कांहीं व्यापारी बँकांना तेथें वाव दिल्यास तुलनात्मक दृष्ट्या फायद्याचें झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## सवलती, मदत, प्रोत्साहन, सहकार्य, ह्यांची आवश्यकता

तेव्हां थोडक्यांत, रिझर्व्ह बँकेनेंच हें विकास योजनेचें कार्य हातीं घेऊन ज्या बँका अशा ठिकाणीं शाखा उघडूं इच्छितात, त्यांना त्या सवलतींचा व मदतीचा फायदा मिळेल असें करून, सर्वांनाच प्रोत्साहन द्यावें. त्याचबरोबर ज्या बँकांच्या चालू शाखा इतर बँकांच्या स्पर्धेमुळें आंतबट्ट्याच्या होत आहेत, त्यांनाहि अशा ठिकाणीं ती शाखा नेण्याचा सल्ला द्यावा. त्यामुळें माहितगार नोकरवर्गाचा जो तुटवडा पडतो तोहि दूर होऊन सर्वांनाच आपली नुकसानी कमी करतां येईल. अशा महत्त्वाच्या बाबतींत निश्चित योजना एखाद्या व्यक्तीला सुचवितां येईल हें म्हणणें धाष्टर्याचें होईल. तेव्हां रिझर्व्ह बँकेनेंच या बाबतींत पुढाकार घेऊन बँकांच्या सहकार्यानें या प्रश्नास जरूर ती चालना द्यावी, एवढें आग्रहानें सांगणें हाच या लेखाचा उद्देश आहे. एवढें मात्र निश्चित कीं, लोकशाहीमध्यें सरकार व जनता या दोघांनीं मिळूनच कोणतीहि योजना केली तर ती यशस्वी होईल. पुणें येथें लवकरच बँकांची परिषद भरण्याचें घाटत आहे. त्यावेळीं या महत्त्वाच्या प्रश्नावर सरकारकडे प्रातिनिधिक स्वरूपाची अशी मागणी करण्यांत आल्यास तिचा सरकारकडून योग्य तो विचार होईल, असें मानण्यास संदेह वाटत नाहीं.

★ सतत २५ वर्षें अनंत यातना व अविश्रांत शारीरिक श्रम सोसावे लागले तरी,
★ प्रसिद्धी पराङ्मुख राहून सहकारी तत्त्वावर कष्ट, सचोटी व चिकाटीचें व्रत स्वीकारल्यामुळें,
★ ओसाड जमिनींतून नंदन वनें निर्माण होतात, तसेंच,
★ २५० टनापासून आज १ हजार टनापर्यंत ऊस गाळणारी अद्यावत् मशिनरी उभारून
★ रौप्यमहोत्सवाचे भाग्यशाली वर्षांत पदार्पण करतां येतें.
★ हे स्वकृतीनें सिद्ध करून दाखवून देणारी शेतकऱ्यांची व शेतकऱ्यांनीं स्वतःकडे कारभार ठेवलेली
★ भारतांतील एकमेव आदर्श संस्था
दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.,
माळीनगर.
★ स्थापना १९३२ ★ जि. सोलापूर ★ मुंबई ऑफिस, १९ अपोलो स्ट्रीट, फोर्ट
संचालक मंडळ :—(१) रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके चेअरमन (२) श्री. मारुतीराव खंडूजी पांढरे (३) श्री. भगवंतराव गेणुजी गिरमे (४) श्री. रघुनाथराव सोपानराव इनामिके (५) श्री. शंकरराव बाळकूजी इनामिके (६) श्री. शंकरराव भाऊराव राऊत (७) श्री. कृष्णकांत लक्ष्मण गिरमे (८) श्री. भगवंतराव मारुतीराव जाधव.
: मॅनेजिंग डायरेक्टर : श्री. हरीभाऊ बळवंतराव गिरमे
: मॅनेजर : श्री. जी. एस. कारभारी, एम्. ए., एलएल्. बी.

# भाग वर्ग करण्यास नकार देण्याचा डायरेक्टरांचा अधिकार

## कंपनीचें हित कोण ठरविणार ?

( नारायण विनायक भोंडे, बी. ए. एलएल. बी., वकील, पुणें )

"It is a first and elementary principle of Company Law that when powers are vested in a board of directors, they cannot be interfered with by the shareholders as such. If the shareholders are dissatisfied with what the directors do, their remedy is to remove them in the manner provided by articles."

— अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ति ऑड

कंपनीचे भाग एकाचे नांवावरून दुसऱ्याचे नांवें वर्ग करणें ही कंपनीचे कारभाराची एक मुख्य व महत्त्वाची बाब आहे. हा अधिकार नियंत्रक मंडळ स्वतः चालवितें; पोटसमितीकडे तो सुपूर्त केला जात नाहीं. कंपनीचे घटक अनिष्ट असूं नयेत व कंपनीचे हितास बाधक अशा व्यक्तींचा त्यांत शिरकाव होऊं नये म्हणून भाग-वर्ग नाकारण्याचा अनियंत्रित अधिकार बोर्डास आर्टिकल्स ऑफ असोसिएशनने देण्याची कायद्यानें मुभा आहे.

### 'बृहन्महाराष्ट्र' विरुद्ध अर्जाचा निकाल

पुणें येथील बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. यांतील २०४३ साधारण व ३५० प्रेफरन्स भाग आपण किंमत देऊन विकत घेतले असलेमुळें ते भाग आपले नांवावर वर्ग करणेचा अर्ज श्रीमती साकरबाई करमशी सोमया यांनी केला होता. तो नियंत्रक मंडळानें फेटाळला. त्यावर श्रीमती साकरबाईनें मध्यवर्ती सरकारकडे १९५६ चे नवीन कंपनी कायद्यानें सवड दिल्याप्रमाणें अपील केलें. त्यावर उभयपक्षाच्या तक्रारी ऐकून दिल्ली अधिकाऱ्यानें अपील रद्द करून, उलट कंपनीस ७५ रु. खर्च अपेलंटकडून देवविला. १९१३ चें कंपनी कायद्याचें कलम १५३ प्रमाणें नियंत्रण व व्यवस्था बदलावी असा अर्ज पुणें कोर्टाकडे आपण करविल्यामुळें असदूहेतूनें हे भाग आपल्या नांवावर वर्ग करण्याचें नाकारलें हें अयोग्य व बेकायदेशीर कृत्य होय असें अपेलंटचें म्हणणें होतें; तर सत्ता व नियंत्रण आपलेकडे घेण्यासाठी हा अर्ज होता, एका प्रतिस्पर्धी साखर कारखान्याचे व्यवस्थेशीं व कारभाराशीं अपेलंटचा निकट संबंध होता व बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचा कारभार मध्यमवर्गीयांचे प्रतिनिधींनें पाहावा, भांडवलवाल्याकडे हीं व्यवस्था जावयाची नाहीं असें कंपनीचें तत्त्व व धोरण असल्यामुळें आम्हांस एवढे भाग एकाचे नांवानें वर्ग करणें अनिष्ट वाटलें, असें कंपनीचें म्हणणें होतें. तें ग्राह्य मानून मध्यवर्ती सरकारनें नियंत्रकांचे निर्णयांत ढवळाढवळ करण्याचें नाकारलें. कंपनीचें हित कशांत आहे हें ठरविण्याचा व सारासार विचार करण्याचा अधिकार हा नियंत्रकांचा आहे; मात्र त्यांनीं अदावत, लहर, लाचलुचपत अथवा असद्हेतूंनीं प्रेरित होऊन असा निर्णय घेतला तर दिवाणी कोर्ट अगर वरिष्ठ सत्ता तो बदलूं शकेल. पण नियंत्रकांचे निर्णयापेक्षा वेगळा निकाल आपण दिला असतां, एवढ्याच मुद्यावर नियंत्रकांचा निकाल रद्द करण्याचा वरिष्ठ अधिकाऱ्यास, कोर्टास किंबहुना भाग धारण करणारांच्या सर्वसाधारण सभेस सुद्धां हक्क नाहीं.

### नाकारण्याचीं कारणें नको

त्याचप्रमाणें, कंपनीचे भाग वर्ग करण्याचें आपण कां नाकारतों याचीं कारणें देण्याचें बंधनाहि आर्टिकल्सनीं नियंत्रकांवर ठेवलें जात नाहीं व असे नियम अथवा आर्टिकल्स करण्याची मुभा कंपनीस आहे. वाईट हेतु, लांचलुचपत अगर लहर नसतांहि भाग वर्ग करण्याचें नाकारण्याचीं कारणें देण्याचे बंधनानें कंपनीचे कल्याणाकरितां मोकळा व अनिर्बंध सारासार विचार करण्याचे बाबतींत व्यत्यय येऊन कटुता निर्माण होते, असें कायदा व नियम करणाराचें धोरण आहे. नाकारण्याचीं कारणें दिलीं नसलीं तरी असद्हेतूचा संशय अगर अध्याहृतपणा घरूं नये असें न्यायमंडळाचे निर्णय आहेत. कंपनीचा भाग सुलभतया विकला जावा म्हणून भाग वर्ग करण्यास सौकर्यानें मान्यता मिळावी हें व्यापारी धोरण व अनिष्ट भागीदारांचा कंपनींत शिरकाव होऊं नये ही सावधगिरी, हीं दोनहि टोकें लक्षांत घेऊन नियंत्रक मंडळानें आपला सारासार विचार चालविला पाहिजे.

### (१) वर्ग आणि (२) वारसा व लिलांव ह्यांत फरक

वर्ग (ट्रॅन्स्फर) व वारसा (ट्रॅन्स्मिशन) यांत फरक आहे. पक्षकारांच्या स्वेच्छेनें वर्ग करण्याचें काम होतें, तर वारसाहक्क कायद्यानें आपोआप वारसास प्राप्त होतो. एकाद्या भागाचा कोर्टमार्फत लिलांव झाला तर भागांची विक्री भागीदार करीत नसून कोर्ट करतें. ती खरेदी स्वेच्छेचें वर्गीकरण नव्हें. तेव्हां लिलांव घेणार अगर वारसदार यांचे नांवावर भाग वर्ग होण्याचे बाबतींत नकार देण्याची सत्ता नियंत्रक मंडळास आर्टिकल्सनीं देण्यांत येत नाहीं.

चितळे बन्धू—
दुग्ध व्यवसायासाठी
प्रसिद्ध
डेक्कन जिमखाना पुणें ४

फो. नं. ४१४८४ [तार : माधवाश्रम, बॉम्बे
★ माधवाश्रम लि. ★
भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय
तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
● विवाह-कार्याची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
● कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.
★ माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४ ★

# बँकिंग-क्षेत्रांतील 'दरयुद्ध'-परिस्थिति

[ चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ. आय. बी. (लंडन) ]

गेल्या कांहीं दिवसांत भारतीय अर्थशास्त्राबद्दल सर्वसामान्यपणें वृत्तपत्रांत व समाजांत खूपच चर्चा चालल्याची दिसून येतें. दुसरी पंचवार्षिक योजना, स्टर्लिंग गंगाजळीची घसरगुंडी, बँकांचे ठेवींचे दर, वगैरे अनेक बाबींत ऊहापोह चालू असतांनाच रिझर्व्ह बँकेकडून बँकांना त्यांनीं आपलीं दिलेलीं कर्जे १०० कोटी रुपयांनीं कमी करावींत, कांहीं बँका साठेबाजांना मदत करून देशविघातक कार्य करीत आहेत तीं बंद व्हावींत, असा आदेश दिल्याचेंहि वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालं आणि त्याचा बोलबालाहि खूप करण्यांत आला, त्यामुळं सर्वसामान्य माणसाचेंहि लक्ष त्या बातमीनं वेधून घेतलं. हल्लीं बँकिंगमध्यें जे वेगवेगळे प्रवाह वाहत आहेत, त्यांतहि कर्जे व नाणेंबाजार यांच्याबद्दल सारखें मतदर्शन चालूं आहेच. पण या परिस्थितीबद्दल बोलतांना त्याला जबाबदार कोण? खरोखर बँकांचं त्यांत कांहीं चुकतं आहे कां? होणाऱ्या घटना अपरिहार्य आहेत कां? आणि यावर तोडगा काय? याबद्दल मात्र फारसा कुणी उत्साह दाखवीत नाहीं.

### थोडी पूर्वपीठिका

अर्थतज्ज्ञापासून तों सामान्य माणसापर्यंत, आज प्रत्येकाला हें माहीत आहे कीं, नाणेंबाजार गेले कित्येक दिवस, नव्हे महिने किंवा वर्षेंहि, फार तंग आहे. ज्याच्याजवळ दोन पैसे शिल्लक आहेत तो या बँकेंत काय दर आहे, त्या बँकेंत काय दर आहे, अशी प्रत्येक बँकेंतून चौकशी करीत त्यावर जास्तींत जास्त व्याज कसं मिळेल याचा सारखा विचार करीत असतो. त्याचबरोबर, वर निर्देशिल्याप्रमाणं बँकांच्या कर्जाचा आंकडाहि खूपच फुगल्याचं दिसतं. या गोष्टीचा कांहींतरी मेळ निश्चित आहे व त्यासाठी आपल्याला थोडी पूर्वपीठिका बघितली पाहिजे.

या सर्व घटनेचं मूळ दोन वर्षांपूर्वी १९५५ मध्यें इंग्लंडनं आपला बँकरेट वाढवला, तिथं आहे. १९३१ नंतर २४ वर्षांनीं ब्रिटननं हा दर ३½% वरून ४½ वर नेऊन ठेवला. भारताचा बँकरेट ३% असल्यानें दोन्ही दरांत फारसा फरक नव्हता. पण १९५६ सालीं ब्रिटनला हा दर ५ व ५½% वर न्यावा लागला तेव्हां हा फरक वाढला. साहजिकच एक्सचेंज बँकांच्या, ज्या भारतांत काम करतात त्यांच्या, कार्यपद्धतींत बदल झाला. इंग्लंडमध्यें वेळ पडली तर बँक ऑफ इंग्लंडकडून ५% किंवा ५½% दरानें कर्ज घेण्यापेक्षा इंग्लंडबाहेर ठेवींवरचाच दर वाढवला तर जास्त किफायतशीर अशा धोरणानं त्यांनीं ठेवी (विशेषतः अल्पमुदतीच्या) जास्त दरानं स्वीकारण्यांत सुरवात केली. कॉलमनीचा दर हळूहळू चढूं लागला आणि त्यांच्याबरोबरीनं स्पर्धेत राहण्यासाठी मोठ्या भारतीय बँकांना व त्यापाठोपाठ लहानांनाहि 'दर युद्धां'त (रेट वॉर) भाग घेणं अपरिहार्य झालं.

या बाबतींत भारतीय बँका जास्त अडचणींत सांपडल्या. कारण, भारतीय बँकांना भारतीय सरकारच्या कर्जरोख्यांत ३० ते ४० टक्के रक्कम गुंतवावी लागते. एक्सचेंज बँका याबाबत २४ सेक्शनच्या जरूरीपुरत्याच २०% पैसे कर्जरोख्यांत जेमतेम गुंतवतात व तेंहि ठेवींतून न गुंतवतां रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊनच, असें दिसतें. नपेक्षा त्यांचं कर्जाचं प्रमाण ठेवींच्या १०७% जातं ना. एक्सचेंज बँकांची सरकारी कर्जरोख्यांत गुंतवणूक अंदाजें ४१ कोटी रु. होती, तर रिझर्व्ह बँकेकडून त्यांनीं घेतलेलीं कर्जे २८ ते ३४ कोटींच्या दरम्यान होतीं. त्यांतहि बिलमार्केटचा फायदा त्यांना योग्य प्रकारें घेतां येतो, व त्यामुळें ठेवींचा पैसा जास्तींत जास्त कर्जासाठीं उपलब्ध करून घेतां येतो. १लाखाच्या ठेवींतून भारतीय बँकेला १,००० रोख रक्कम शिल्लक ठेवावी लागते. ३० ते ४० टक्क्यांपर्यंतम्हणजे ३० ते ४० हजार रु. सरकारी कर्जरोख्यांत गुंतवावे लागतात व उरलेले ६० ते ७० हजार रुपये कर्जे व अन्य बाबींत गुंतवता येतात. या १ लाख रुपयांमध्यें २०,००० रु. च्या चालू ठेवी, ४०,००० रु. ची सेव्हिंग ठेव व ४०,००० रु. च्या मुदतीच्या ठेवी धरल्या तर त्यावर अनुक्रमें १०० रु. १,००० रु. व १,६०० रु. म्हणजे एकूण २,७०० रु. व्याज द्यावें लागतें. सर्वसाधारण खर्च खूपच वाढल्यानें दैनंदिन खर्चासाठीं २% म्हणजे २,००० रु. नोकरवर्ग, स्टेशनरी, टपालखर्च, इत्यादींवर धरायला पाहिजे. शिवाय, बुडीत कर्जासाठी तरतूद, अल्प फायद्यांतूनहि टाकावी लागणारी गंगाजळी, प्राप्तीकर, वगैरे जरी हिशोबांत धरले नाहींत, तरी १,००,००० रु. वर बँकेला जेव्हां ५,००० रु. उत्पन्न मिळेल तेव्हां कुठं तिचीं दोन्हीं तोंडें बरोबर होतील. त्यांत ३० ते ४० टक्के जर सरकारी कर्जरोख्यांत गुंतवले तर १,२००।१,४०० रु. इतकेंच उत्पन्न येईल. मुळांतच प्राप्तीकर कापला जात असल्यानें प्रत्यक्ष हातांत ९०० ते १,००० रुपयेच येतात. म्हणजे ४,००० रु. इतकी रक्कम त्याला कर्जांतून काढावी लागेल.

### बँकांच्या कर्ज-खात्यांत वाढ

अर्थात्, ठेवींवर दर वाढवून दिल्यावर तितक्याच प्रमाणांत कर्जावरील व्याजाचे दरहि वाढविले कीं झालं, हा एक साधा व भ्रामक युक्तिवाद इथं पुढं केला जातो; पण त्याची प्रत्यक्षांतली शक्यता विचारांत घेतली जात नाहीं. कर्ज काढणारा व्यापारी वा कारखानदार गरजू आणि अडलेला असला तरी त्याला कर्ज किती किंमतीपर्यंत परवडेल यालाहि मर्यादा असते. दैनंदिन वाढते खर्च, मशिनरीची झीज किंवा मध्यस्थाचं कमिशन, प्राप्तीकर आणि हें सगळं ज्यासाठीं करायचं तो नफा हें विचारांत घेऊनच तोहि विवक्षित दरापर्यंतच कर्ज मिळालं तर काढेल किंवा तो फारच अडलेला असेल तर अव्वाच्या सव्वा दर कबूल करेल व कर्ज घेईल. पण त्या भारी दरानं कर्ज देणाऱ्या सावकाराला मात्र तो धंदा बुडाल्यानं व्याजासह मुद्दलहि गमावण्याचीच पाळी येईल. तेव्हां सोन्याचं अंडं देते म्हणून मूळ कोंबडीच कापावयाच्या कल्पनेपासून बँकांना अलिप्तच राहिलें पाहिजे. साहजिकच ठेवींवरील दरांवर बंधन नाहीं पण कर्जावरील दरावर मात्र मर्यादा पडल्यानं बँकांना नाइलाजानं कर्जरोख्यांतील गुंतवणूक कमी करून तोंडमिळवणी करतां येण्याइतपत तरी कर्जासाठीं रक्कम वापरणं अपरिहार्यच होऊन बसतं. तेव्हां कर्जाची रक्कम वाढल्यानं नाणेंबाजार तंग झाला नसून, नाणेंबाजार तंग झाल्यानेंच बँकांकडील कर्जखात्याचं प्रमाण अनपेक्षित वाढलं आहे. उलटपक्षीं, एक्सचेंज बँकांशीं तुलना करतां भारतीय बँकांचं प्रमाण पुष्कळच चांगलं आहे. एक्सचेंज बँकांचा कर्जाचा आंकडा तर ठेवींच्या पेक्षाहि जास्त आहे. त्यांचं हें प्रमाण

जास्तींत जास्त १०७% पर्यंत गेलं होतं. भारतीय बँकांचं हें प्रमाण सरासरीनं ७०% इथपर्यंतच आहे.

## ठेवींसाठीं थंडें युद्ध : ठेवीदारांची बाजारपेठ

बरें, या ठेवीवर तुम्ही जास्त दर देऊं नका, हा युक्तीवादहि तसाह भ्रामक आहे. कारण, अ बँकेनें जर एकाद्या ठेवीवर विवक्षित व्याज तत्त्वपालनासाठी द्यायचें नाहीं म्हणून ठरवलें तर तो ठेवीदार ब बँकेकडे जातो व बँकेला स्पर्धेत भाग घेणं आवश्यक नि अपरिहार्य असल्यानं तिला तो दर द्यावाच लागतो. तिनं जर तो दर दिला नाहीं तर तिला आपलं अस्तित्व टिकवणं अशक्य होईल. कारण तो ठेवीदार क बँकेकडं जाऊं शकतो. पूर्वी बँक म्हटली कीं तिची पूर्वपीठिका, धोरण, प्रतिष्ठा, हीं सर्व ठेवीदारांच्या दृष्टीनं बघणं आवश्यक होतं. पण हल्लीं पाव, अर्धा टक्का व्याजाच्या मोहानं ठेवीदारांनीं तींहि दुर्लक्षिलीं आहेत. खरं म्हणजे आपल्या ठेवीवर जर एक आणा व्याज वाढवून मिळालं तर आपल्या वैयक्तिक उत्पन्नांत खरोखरच म्हणण्याजोगी नेत्रदीपक भर पडणार आहे कां? आज जरी आपण ठेवीदार असलों, तरी उद्यां कर्जदार कशावरून होणार नाहीं व त्यावेळेला व्याजाचा भारी दर आपल्याला परवडेल कां? याचा त्यानं विचार करण्याची वेळ आज आली आहे. अल्प मुदतीच्या ठेवींचं लोण आज शहरांतच काय, पण लहान लहान ठिकाणींहि पोंचल्याचं दिसून येत आहे. १०,००० रु. च्या ठेवींवर जर ४ आणे इतकं व्याज वाढवून मिळालं तर वर्षाला फक्त २५ रु. वाढतात. दहा हजार रुपयांची ठेव ठेवूं शकणाऱ्या व्यक्तीला महिना दोन रुपये ही कांहीं नेत्रदीपक वाढ नव्हे. पण या किरकोळ गोष्टींचा विचार न करतां सध्यांच्या थंड्या युद्धांत ठेवीदारांनींहि भाग घ्यावा व अनिष्ट स्पर्धेला उत्तेजन द्यावं ही गोष्ट खेदाची आहे व भारतीय बँकिंगच्या दृष्टीनं व पर्यायानं सर्वांच्याच दृष्टीनं मारक आहे.

## दर-मर्यादा ठरविण्यांतील अडचणी

यावर तिसरा असा युक्तिवाद केला जातो कीं, बँकांनीं एकत्रित येऊन जर दरमर्यादा ठरवून घेतली तर हा प्रश्न सुलभ रीतीनें सुटेल. भारतीय बँकांची असोसिएशन या दृष्टीनें गेलीं दोन-तीन वर्षें प्रयत्न करीत आहे. पण त्यांत सर्व बँका जोंपर्यंत सामील होत नाहींत तोंपर्यंत तें केवळ अशक्य आहे. शिवाय परदेशी बँकांना अशीं बंधनें घालून घेण्यांत स्वारस्य वाटणार नाहीं. आतां तर ब्रिटननं आपला बँकरेट ७ टक्क्यांपर्यंत नेला आहे. भारतीय बँकरेट मात्र ४% च असल्यानें दोन्ही बँकरेट-मधली तफावत खूपच वाढल्यानें एक्सचेंज बँकांना आपला ठेवीवरील दर अजूनहि वाढवणं सहज परवडेल. जुलैमध्यें मुंबईला अल्प मुदतीच्या ठेवींचा दर जास्तींत जास्त ४ रु. ७ आणे इतका होता व सीझन सुरू झाल्यानंतर जर तो ५ किंवा ५½ पर्यंत गेला तर त्यांत नवलविशेष कांहींच नाहीं. त्यांतच ज्यांच्याजवळ थोडे-फार पैसे शिल्लक आहेत, त्यांच्याप्रमाणेंच पैसे शिल्लक असणाऱ्या मोठमोठ्या कॉर्पोरेशन्ससारख्या संस्थांनींहि या स्पर्धेत अनिष्ट वळण लावायला सुरवात केली आहे. नाहींतर चालू खात्यासाठींहि टेंडरें मागवून, बँकिंग आणि इतर कंत्राटी ठेके यांत कांहींहि फरक नाहीं असं त्यांनीं दाखवलं नसतं. पण विवेकापेक्षा इतर गोष्टींना थारा मिळाल्यानंतर अशा गोष्टी झाल्या नाहींत, तरच त्यांत नवल वाटेल.


दी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना मुंबई. १९११
मुख्य कचेरी: ९ बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई १.
चेअरमन: श्री. रमणलाल जी. सरैय्या.
हा बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ४०,११,५०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | ३१,००,००० |
| | रु. | ७१,११,५०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ५९,१८,१०० |
| ठेवी | रु. | १०,७१,३३,२०० |
| खेळतें भांडवल | रु. | १७,६३,७३,००० |

११ जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा

भारतातील प्रमुख शहरीं हुंड्या बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. जास्त माहितीसाठीं चौकशी करावी.

फोन: २५८७७
तार: फार्मर बँक

जी. एम. लाड.
मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

फलटण तालुक्यांतील सर्व सहकारी संस्थांसाठीं मध्यवर्ती बँक
श्रीलक्ष्मी सेंट्रल
को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण
स्थापना ] फलटण-जि. उत्तर सातारा ( मुंबई राज्य ) [ १९२६

| | | | |
|---|---|---|---|
| भांडवल : | भागांचें अधिकृत | रु. | ५,००,००० |
| | „ खपलेलें | रु. | २,७४,००० |
| | „ वसूल | रु. | २,६९,९०० |
| फंड : | रिझर्व्ह फंड | रु. | १,१६,८३४ |
| | इमारत फंड | रु. | ५९,००० |
| | इतर फंड | रु. | १,३१,१२० |
| ठेवी : | सर्व प्रकारच्या | रु. | १५,६१,९९९ |
| कर्ज : | रिझर्व्ह बँकेचें | रु. | ३,००,००० |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.
सध्याचे ठेवीचे दर : चालू ठेवीवर- ½% सेव्हिंग्ज ठेवीवर २%
मुदत ठेवीवर- १ ते ५ वर्षांस- २=२५ ते ४%
व्यवहार : तालुक्यांतील सहकारी पेढ्यांना व त्यांच्यामार्फत सभासदांना कर्जाऊ रकमा पुरविल्या जातात. बँकेच्या व्यक्तिशः भागीदारांनाहि विशिष्ट प्रकारचीं कर्जें मिळण्याची सोय करण्यांत येते. बँकांचे इतर सर्व प्रकारचे व्यवहार करण्यांत येतात.
चौकशी : समक्ष अगर पत्रद्वारें करावी अशी विनंती आहे.
भागावरील नफा : भागीदारांना सुरुवातीपासून सतत ३१ वर्षें या बँकेनें भागावरील नफा वाटला आहे. तालुक्यांतील सरकारी संस्था व व्यक्ति बँकेच्या भागीदार आहेत.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक
मु. रा. भोईटे, B. A., LL. B., चेअरमन.

### स्पर्धेत सामील होणें अपरिहार्य

तात्पर्य, अशा रीतीनें सर्व बाजूंनीं कुचंबणा झाल्यानंतर भारतीय बँकांची परिस्थिति विचित्रच होत चालली आहे. आधीं उल्लेखिलेल्या परदेशी एक्सचेंज बँका दर मर्यादेला कबूल होणार नाहींत. त्याचप्रमाणें, स्टेट बँक ऑफ इंडियासारखी निमसरकारी बँकहि त्या बाबतींत लक्ष घालण्यास तयार नाहीं. परदेशी बँकांच्या ठेवी सुमारें दोनशें कोटी रु. च्या आसपास व स्टेट बँकेच्या ठेवी तीनशें कोटी रु. च्या वर असल्यानें, भारतीय बँकांजवळ एकूण ठेवींच्या ६० टक्के सुद्धां ठेवी रहात नाहींत. तेव्हां स्टेट बँक व एक्सचेंज बँका वगळून इतरांनीं असा करार करण्यांत कांहीं स्वारस्य रहाणार नाहीं आणि असा करार होऊं शकत नसल्यानें बँकिंगच्या क्षेत्रांतील हें थंडे 'दर युद्ध' असें वाढतच जाणार आहे. एक्सचेंज बँकांचे पाठोपाठ मोठ्या भारतीय बँकांना व त्यांच्या पाठोपाठ लहान बँकांना ह्या स्पर्धेत केवळ आपलं अस्तित्व टिकविण्यासाठी भाग घेणं अपरिहार्य आहे, आणि तसं जर त्यांनीं केलं नाहीं तर त्यांचं अस्तित्व आपोआप नाहींसं होईल. तेव्हां या युद्धाला जर आळा घालायचा असेल, तर कांहींतरी मार्ग हा निघालाच पाहिजे.

### सरकारची बँकांशीं स्पर्धा

खरं पाहिलं तर बँकरेट आणि नाणेंबाजारांतील दर यांची सांगड सर्वत्र असणं इष्ट असतं. अशी सांगड ठेवणं आणि पर्यायानं सर्व नाणेंबाजारावर नियंत्रण ठेवणें हें देशांतील मध्यवर्ती बँकेचं कार्य आहे व कर्तव्यहि आहे. त्याखेरीज आर्थिक व्यवहारांत सुसूत्रता राहणार नाहीं. विशेषतः बँकांना सरकारकडून जेव्हां स्पर्धा होत असते तेव्हां ही तारेवरील कसरतच ठरते. आज जर सरकारच्या अल्पबचत योजनेच्या व कर्जरोख्यांच्या व्याजाच्या दराकडे नजर टाकली तर ते दर बँकांच्या मुदतीच्या ठेवींशीं चांगलीच स्पर्धा करतात. अशा रीतीनें नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकिटांवर जवळ जवळ ५·४% इतकें व प्रांतिक सरकारांच्या कर्जरोख्यांवर ४·२५% इतकें व्याज सुटण्यासारखें ठेवल्यावर मध्यवर्ती बँकेला व्याजाच्या इतर दरांवर नियंत्रण घालणें कितपत शक्य होईल याची वानवाच वाटते. इतर देशांत मध्यवर्ती बँक फक्त बँकरेटवरच आपलं वर्चस्व ठेवत नाहीं तर अन्य ठेवींचे दर, कर्जाचे दर, यावरहि आपलं नियंत्रण ठेवते. परवांच आयरिश बँकेनें आपल्या बँकरेटबरोबर बाकीचेहि दर परत घोषित केले. भारतांतहि तशी जर अपेक्षा केली गेली, तर ती



चुकीची ठरूं नये. पण अद्याप तसं प्रत्यक्षांत मात्र घडत नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. मध्यवर्ती सरकार व मध्यवर्ती बँक यांच्या अनुसंधानेंच जर राष्ट्राचा आर्थिक गाडा नीट हांकला तर देशाची सर्वांगीण प्रगति होते आणि बँका ह्या रक्तवाहिन्यांसारखं काम करीत असल्यानं त्यांचं साह्य आणि सत्कार्य हें अभिप्रेत असतें. त्यासाठी त्यांच्या उन्नतीस आड येईल, अशी कुठलीहि गोष्ट रहाता कामा नये.

### बँकांची कुचंबणा

भारतीय बँकांच्या धोरणांत, विशेषतः कर्जाच्या बाबतींतल्या धोरणांत, जरी सध्या थोडासा बदल दृष्टोत्पत्तीस येत असला तरी त्यांच्या ध्येयांत मात्र यत्किंचितहि बदल नाहीं. सुस्थिर बँकिंगच्या तत्त्वापासून च्युत व्हावयाची त्यांची आजहि तयारी नाहीं. तेव्हां, कुठल्याहि परिस्थितींत त्या देशविघातक कार्यास प्रवृत्त होतील असें वाटत नाहीं. अर्थात्, नियमाला अपवाद असतात तेवढे वगळले पाहिजेत. पण सर्वसामान्यतः त्यांची परिस्थिति आज 'आई जेवूं घालीना आणि बाप भीक मागूं देईना' अशी झाली आहे आणि त्यांतल्यात्यांत त्या जास्तींत जास्त पराकाष्ठा करण्याची शिकस्त करीत आहेत.

तात्पर्य, बँकांनीं कर्जे देण्याचें प्रमाण वाढवलें, म्हणून नाणेंबाजारांत तंगी आली असें म्हणणें सयुक्तिक ठरणार नाहीं. त्याची कारणमीमांसा जर बघितली तर त्यावर योग्य ती उपाययोजना करणं कठीण आणि अशक्य नाहीं. असा योजक मात्र आज तरी दुर्लभ झाला आहे किंवा दुर्लक्ष करीत आहे, असंच म्हणावं लागेल.

एवंच, या दुरयुद्धांतून जर लवकरांत लवकर भारतीय बँकांची सुटका झाली तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, वाढती महर्घता आटोक्यांत ठेवण्यासाठी त्यांच्याकडून अमूल्य साह्यच होईल, यांत शंका नाहीं आणि हें कर्तव्य असलेल्या संबंधितांनीं यांत निकडीनं लक्ष घालणं अत्यावश्यक झालं आहे.

---

### हिंदी कंपन्यांची प्रगति

१९५०–५५

(आंकडे कोटी रु. चे)

| | १९५० | १९५५ | वाढीचें प्रमाण % |
|---|---|---|---|
| वर्षअखेरचें वसूल भांडवल + रिझर्व्हं | ५०० | ६३४ | २६·८ |
| ग्रॉस फिक्स्ड असेट्स | ५५९ | ८२७ | ४८·७ |
| नेट फिक्स्ड असेट्स् | ३०२ | ४४४ | ४७·० |
| इन्व्हेन्टरी | २८१ | ३४३ | २२·१ |
| एकूण जिंदगी | ८८६ | ११९१ | ३४·४ |
| एकूण उत्पन्न | ९७३ | १३३२ | ३६·९ |
| विक्री | ८३१ | ११४४ | ३७·७ |
| करापूर्वी नफा | ६४ | ९७ | ५१·६ |
| करानंतर नफा | ३९ | ६० | ५३·८ |
| डिव्हिडंड | २४ | ३२ | ३३·३ |
| न वाटलेला नफा | १५ | २७ | ८०·० |
| गुंतवलेल्या भांडवलाशीं ठोक नफ्याचें प्रमाण | ९·० | १०-२ | ... |
| ठोक विक्रीशीं ठोक नफ्याचें प्रमाण | ९·६ | १०·६ | ... |
| वसूल भांडवलाशीं डिव्हिडंडचें प्रमाण | ७·५ | ८·८ | ... |


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

---

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०–६–५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३–०–० | रु. ३–४–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २–०–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–८–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# कंपन्यांमधील मनुष्य-संपर्काचें वाढतें महत्त्व

## विस्ताराच्या वेळचे संघटनात्मक प्रश्न

( चंद्रकांत शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि., पुणें )

आज आपणां सर्वांपुढें उद्योगधंद्यांच्या विस्ताराचे प्रश्न उभे आहेत. दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा करण्यासाठीं सरकार देशाच्या अर्थव्यवस्थेला पैशाचा भरमसाठ पुरवठा करीत आहे. ह्याचा एक परिणाम असा होत आहे कीं आपल्यापैकीं प्रत्येकाला अधिक क्रियाशील व्हावें लागत आहे. जे उद्योगधंदे आर्धींच स्थापन झालेले आहेत त्यांच्याबद्दल ही गोष्ट विशेषत्वानें खरी आहे. धंद्याचा विस्तार करण्याचा निर्णय आपण घेतों, त्यावेळीं कोणते प्रश्न आपणांपुढें उभे राहतील ह्याची आपल्याला कल्पना येत नाहीं. मला असें वाटतें कीं, बहुतेक कंपन्यांतून आपण जरा पुढें दृष्टि फेकून विस्तारविषयक तांत्रिक व आर्थिक प्रश्न डोळ्यांसमोर आणतों. पण कंपनीचें कार्यक्षेत्र वाढल्यामुळें कंपनीच्या संघटनेबाबत जे सामाजिक प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव असतो त्याचें चित्र आधीं रेखाटणें फार अवघड असतें. म्हणून "वर्धिष्णु कंपनीसमोर उभे राहणारे सामाजिक प्रश्न" असा विषय मी निवडला आहे. प्रथम कांहीं विशिष्ट घटना व कांहीं विशिष्ट प्रश्न ह्यांचा उल्लेख करून त्यांच्यावरील माझे विचार मी व्यक्त करणार आहे. हे प्रश्न सोडविणें माझ्या शक्तीबाहेरचे आहे; कारण प्रत्येकाला ते निराळ्या स्वरूपांत व निराळ्या तऱ्हेनें प्रतीत होतात. प्रत्येकाला आपल्या भूमिकेवरूनच त्यांची सोडवणूक करावयाची असते. मात्र, एखाद्या प्रश्नाची मांडणी आपणाला नीट करतां आली तर त्याची सोडवणूक अर्धी अधिक झाली, असें म्हणतां येईल.

### रानटीपणाचीं लक्षणें

ऑस्ट्रेलिआंतील आदिवासींवर कांहीं वर्षांपूर्वी एकाएकीं अन्नान्नदशेला पोंचण्याचा प्रसंग ओढवला. पीक कापणारीं माणसें, धान्य दळण्याच्या चक्क्या आणि इतर साधनें काम करण्यास होतीं. पण यंत्रें वापरण्यासाठीं धान्यच नव्हतें. पाऊस चांगला व वेळेवर झाला होता. आदिवासींच्या ह्या जमातींत कोणालाच कारण सांगतां येईना. अन्नाच्या तुटवड्याबद्दल त्यांनीं परमेश्वराला दोष देण्यास सुरवात केली. ऑस्ट्रेलिआंत गोऱ्या लोकांच्या वसाहती झाल्यावर आणि त्यांनीं कारखाने काढल्यावर लवकरच घडलेली ही घटना आहे. हे लोक ज्यावेळीं उपासमारीनें मरणाची वाट चालू लागले, त्यावेळीं ऑस्ट्रेलिआच्या सरकारच्या संबंधित खात्यानें चौकशी सुरू केली. प्रथम सरकारनें त्यांना जरूर असलेल्या अन्नाचा पुरवठा केला. लवकरच सरकारला अन्नाच्या टंचाईचें कारण उमगून आलें. ह्या सर्व उलथापालथींचें कारण जमातीच्या समाजरचनेंत एकदम झालेला बदल, हें होतें.

जमातीमधील कांहीं लोक बीं-बियाणें तयार ठेवीत, कांहीं जमीन नांगरीत, इतर कांहींजण पेरणी करीत व बाकीचें पीक कापीत. अशा रीतीनें काम चालें. ही पद्धत पिढ्यानूपिढ्या उत्तम तऱ्हेनें चालू होती; पण ती कशामुळें चालत होती तें कोणालाच माहीत नव्हतें. सरकारनें जेव्हां ह्या प्रकरणाची चौकशी करण्यास प्रारंभ केला तेव्हां असें आढळून आलें कीं, जमातीपैकीं कांहीं लोकांना गोऱ्या लोकांनीं आपल्या कारखान्यांत मोलानें कामावर ठेवलें होतें. अर्थात् जमातीला काय प्रकार चालू आहे त्याची कल्पनाहि नव्हती. त्यांच्या भाषेला लिपी नव्हती आणि लेखनाची पद्धतीहि नव्हती; त्यांनीं तिकडे लक्षच दिलें नव्हतें. एकाएकीं त्यांना धान्य मिळेनासें झालें. मला थोडक्यांत असें सांगावयाचें आहे कीं, ज्या समाजांत लेखनाची पद्धतच नाहीं, ज्या समाजाला तो नेमका कसा चालतो ह्याविषयीं कल्पनासुद्धां नसते; तो समाज अत्यंत रानटी अवस्थेंत असतो; हाच त्याचा अर्थ आहे. इतिहासकार रानटी लोकांची व्याख्या करतात तेव्हां "ज्या लोकांच्याजवळ आलेख नसतात, ज्यांना इतिहास नसतो, असे लोक" अशी करतात.

### मॅनेजमेंटच्या शास्त्राची आवश्यकता

मॅनेजमेंटच्या शास्त्रापुरतें पहावयाचें झाल्यास आपण आज अगदीं रानटी अवस्थेंत आहों. एखाद्या धंद्याचा कारभार आपण कां व कसा चालवतों ह्याविषयीं आपणाजवळ आलेख (रेकॉर्डस) असें जवळजवळ नाहींतच. गेल्या दहा वर्षांत ह्या विषयासंबंधींचें कांहीं वाङ्मय तयार होत आहे आणि युद्धापूर्वीहि परदेशांत कांहीं वाङ्मय होतें, ही गोष्ट खरी. तथापि पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र अशासारख्या विषयांशीं तुलना करतां आपल्याजवळ आलेख वाङ्मय नाहींच म्हटलें तरी चालेल. 'मॅनेजमेंट' हें कांहीं शास्त्र नाहीं; ती एक कला आहे. म्हणून आपणांस ह्या शास्त्राची उभारणी करावयाची असल्यास आपण आलेखांच्या निर्मितीस सुरवात केली पाहिजे. आलेख ह्याचा अर्थ पुष्कळशा फाइली असा नाहीं. ज्या तत्त्वाच्या आधारानें असें शास्त्र आपण निर्माण करूं शकूं अशी तत्त्वप्रणाली असा त्याचा अर्थ आहे. आपण एक उदाहरण घेऊं. लिओनार्डो डी व्हिन्सीच्या कालांत पदार्थविज्ञानशास्त्र हें शास्त्रापेक्षा कलेच्या रूपांत अधिक होतें. सफरचंद झाडावरून खालींच कां पडतें, वर कां जात नाहीं, ह्या प्रश्नाचा कोणी विचारच करीत नसे. फळ खालीं पडणार व पडलेंच पाहिजे हें गृहीतच धरण्यांत येई. सर ऐझॅक न्यूटन ह्यांनीं गुरुत्वाकर्षण, वाढता वेग आणि घनता ह्यांच्याविषयीं कांहीं तत्त्वें निश्चित केलीं, तोंपर्यंत पदार्थविज्ञानशास्त्र जन्माला आलेंच नव्हतें. तेव्हांपासून पुढें मात्र पदार्थविज्ञानशास्त्राचा, शास्त्र म्हणून विकास सुरू झाला. मग वीज, प्रकाश, लोहचुंबकत्व, $E = Mc^2$ हा आइन्स्टाइनचा गणिती सिद्धांत आणि इतर तत्त्वें पुढें आलीं. आपण इतिहासांत मागें वळून पाहिलें तर असें आढळून येतें कीं, वरील तत्त्वें पद्धतशीरपणें ग्रथित झाल्यावर पदार्थविज्ञानशास्त्राची प्रगति वाढत्या वेगानें होऊं लागली 'मॅनेजमेंट' च्या शास्त्रापुरतें पाहिल्यास, आपण आज लिओनार्डोच्या काळांतच आहों!

### शास्त्राचीं तत्त्वें मांडण्यांत आलेलीं नाहींत

अडचणीच्या वेळीं मार्गदर्शन करूं शकतील अशी 'मॅनेजमेंट' च्या शास्त्राचीं तत्त्वें आज आपल्याजवळ फारच थोडीं आहेत. जे प्रसंग अगर परिस्थिति नेहमीं उद्भवतात त्यांच्या बाबतींत सुद्धां ते कां उद्भवतात ह्याविषयीं नीटशीं कारणें अत्यल्प देतां

येतात. उदाहरणार्थ, एखादी कंपनी मोठी झाली कीं, कमी कार्यक्षम कां होते तें आपण सांगूं शकत नाहीं. ५० माणसें असणारी एखादी छोटी कंपनी योग्य रीतीनें व कार्यक्षमतेनें चालविली जाते. ती कार्यक्षम असते म्हणून ती वाढूं लागते. ५० माणसांऐवजीं १५० माणसें तिच्यांत काम करूं लागतात आणि मग वरच्या थराच्या 'मॅनेजमेंट' मध्यें वाढ न होतां कंपनी वाढली म्हणून सर्वांनाच बरें वाटतें. कंपनीच्या कारभार–खर्चांत बचत झाली असेंहि वाटते. पण कंपनीची वाढ कांहीं तेथेंच थांबत नाहीं. ती आणखी वाढत जाते. कंपनींतील माणसें सुमारें ३०० पर्यंत आलीं म्हणजे वरच्या अधिकाऱ्यांना असें वाटूं लागतें कीं कंपनीच्या संघटनेंत कांहींतरी चुकत आहे. वरच्या पातळीवर निर्णय घेण्यांत येतात, पण त्यांची योग्य अंमलबजावणी मात्र होत नाहीं. प्रत्येक मॅनेजरच्या टेबलावर कामाचा ढीग वाढत जाऊं लागतो, मजुरांत असंतोष निर्माण होतो आणि मग ह्यापूर्वीच त्यांची संघटना करण्यांत आली नसल्यास ती करण्यांत येते. कामगार–युनिअनची स्थापना करण्यांत येते.

### बदलत जाणारीं नातीं

कारखान्यांतील सामाजिक संबंधांना कशा प्रकारचें वळण लागत आहे, ह्याबद्दल आपणांला नेमकी कल्पना नसते. कंपनी जेव्हां छोटी असते तेव्हां वरिष्ठ संचालक म्हणून एकच माणूस काम पहात असतो. तोच जनरल मॅनेजर, मुख्य हिशेब तपासनीस, वर्क्स मॅनेजर, ह्या नात्यांनींहि काम पहात असतो. खुद्द कामगारांना असें वाटतें कीं, आपला कोणीतरी वाली आहे. तो त्यांचा पुढारी असतो. कंपनी वाढत जाते तेव्हां प्रथम एका नव्या मिस्त्रीचें आगमन होतें. त्याच्या पाठोपाठ एंजिनिअर येतो आणि मग जरूर पडल्यास वर्क्स मॅनेजर, चीफ अकौंटंट व सेक्रेटरी ह्यांचाहि प्रवेश होतो. मूळच्या सुखी घरांत पुष्कळसे पर्यवेक्षक शिरतात. परिणामतः वरिष्ठतम अधिकाऱ्याला सामान्य कामगारापासून दूर जावें लागतें. "माझ्या खोलीचा दरवाजा प्रत्येकाला खुला आहे," असें जरी तो म्हणाला तरी फारच थोडे कामगार त्याच्यापर्यंत जातात. प्रत्यक्ष असें होतें कीं कामगारांचा प्रत्यक्ष धनी म्हणून पूर्वी ज्या जागेवर जनरल मॅनेजर काम करीत असे त्याच जागेवर वर्क्स मॅनेजर, चीफ अकौंटंट व इतर अधिकारी काम करूं लागतात. कामगारांची संख्या ५,००० च्या आसपास आली म्हणजे वर्क्स मॅनेजरची जागाहि दुसरा कोणीतरी घेतो; ह्याचा अर्थ असा कीं जागच्या जागीं निर्णय घेऊन कामगारांना आपण त्यांचे वरिष्ठ आहों अशी जाणीव करून देणारा कोणीतरी माणूस त्या जागीं येतो.

### 'बॉस'ला हे अधिकार हवेत


'बॉस' ह्या संज्ञेनें फक्त सर्वोच्च वरिष्ठ अधिकाऱ्याचाच बोध होतो असें नाहीं. आपल्या हाताखालील माणसांच्या भवितव्याची जाणीव असणाऱ्या व त्याला वळण देणाऱ्या माणसाचाहि वरील संज्ञेंत अंतर्भाव होतो.

अशा माणसाला तीन मूलभूत अधिकार असावे लागतात.

(१) हाताखाली माणूस कामावर घेणें अगर त्याला कामावरून दूर करणें. सध्यांच्या परिस्थितींत कामगाराला कामावर घेतां येते; पण त्याला कामावरून दूर करावयाचें असल्यास फार विलंब लागणारी व अवघड पद्धति स्वीकारावी लागते.

(२) कामाच्या मानानें हाताखालच्या माणसाचें वेतन कमी करणें अगर वाढविणें. खालच्या पातळीवरील जागांवर काम

किती साधा अन् उपयुक्त




तयार करणार:-
ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी, (जिल्हा उत्तर सातारा)

करणाऱ्या कामगारांची वेतनाच्या वाढीची मर्यादा संकुचित असणें अगदीं शक्य असतें आणि हें तसेंच असणें युक्त आहे. मर्यादा कांहींहि असो, वरिष्ठाला हा अधिकार असलाच पाहिजे.

(३) हाताखालच्या माणसांना शिक्षा करण्याचा अधिकार. आज हा अधिकार वापरणें अवघड आहे. पण जागेवर काम करणाऱ्या प्रत्येक मॅनेजरला जर मजूरविषयक कायद्याचें किमान ज्ञान असलें तर त्याचा उपयोग करतां येणें शक्य आहे. तो जर झाडाचा पुढारी असेल, तर योग्य त्या प्रमाणांत शिक्षा करणें त्याला सद्यःपरिस्थितींतहि जमेल.

वर्क्स मॅनेजरला हे सर्व अधिकार असतात. पण कामगारांची संख्या ३०० च्या आसपास आल्यावर कारखान्यांतील वर्क्स मॅनेजरची जागा दुसऱ्या कोणाला तरी घ्यावीच लागते. ह्या कामगारांच्या संख्या मी फारच ढोबळ मानानें देत आहे. कांहीं कंपन्यांत ही संख्या फारच कमी असेल; इतर कंपन्यांत ती खूप मोठीहि असूं शकेल. वर्क्स मॅनेजर वर चढला व त्याच्या जागीं दुसरा मनुष्य आला म्हणजे कामगार व 'मॅनेजमेंट' ह्यांच्यांत आणखी एक टप्पा निर्माण होतो. मग वर्क्स मॅनेजर हुद्यानें चढलेला असो अगर नसो. अशा वेळीं कारखान्यांत जागेवर काम करणाऱ्या माणसाला हे अधिकार असले पाहिजेत. मजूरविषयक कायद्यांमुळें त्याच्या अधिकारांत झालेली घट आपण त्याला जादा अधिकार देऊन भरून काढूं शकतों. पण काम समाधानकारक होण्यासाठी इतका किमान अधिकार त्याला असलाच पाहिजे. जनरल मॅनेजर, वर्क्स मॅनेजर अगर असिस्टंट वर्क्स मॅनेजर वरच्या पातळीवर गेल्यामुळें कामकाजांत जी पोकळी निर्माण होते ती भरून काढली पाहिजे. ती तशीच राहूं दिली तर संघटनेची सर्वच इमारत कोसळून पडेल. ही कोसळण्याची प्रक्रिया सहज लक्षांत येत नाहीं. ह्याचें कारण आपणाजवळ मार्गदर्शन करणारीं लिखित तत्त्वें नाहींत.

## संघटनात्मक आराखडा

एखादी कंपनी थोडी मोठी झाली कीं, ती आपल्या संघटनेचा आराखडा तयार करण्याचा प्रयत्न करते. आपल्या देशांत अशा प्रकारचा जो आराखडा वापरण्यांत येतो तो फार दिशाभूल करणारा असतो. कारण आज जीं माणसें आहेत तीं कोणत्याहि आराखड्याच्या चौकटींत बसणें शक्य नाहीं. एखाद्या खात्यांतील पर्यवेक्षकाचे दुसऱ्या खात्यांतील आपल्याच पातळीवरील पर्यवेक्षकाशीं काम असलें तर त्यानें वर्क्स मॅनेजरच्या मार्फत गेलें पाहिजे, असें आराखड्यांत बहुधा सांगितलेलें असतें. पण व्यवहारांत असें होत नाहीं. कारण दुसऱ्या खात्यांतील पर्यवेक्षक हा पहिल्या खात्यांतील पर्यवेक्षकाचा नातेवाईक असणें अगर जवळचा स्नेही असणें शक्य असतें. अशा परिस्थितींत पहिला दुसऱ्याला एखादें काम करण्यास सांगतो, व दुसराहि तें स्नेहाखातर करतो. म्हणजे असें होतें कीं आपल्या संघटनेचा आराखडा बाजूलाच राहतो. कारण, जागेवर काम करणाऱ्या माणसानें त्याकडे दुर्लक्ष केलेलें असतें. तरीपण काम मात्र मोठ्या कार्यक्षमतेनें करवून घेण्याची दक्षता त्यानें घेतलेली असते. तेव्हां कांहीं झालें तरी संघटना ही अखेरीस माणसांची बनलेली असते हें विसरून चालणार नाहीं; आणि माणसेंहि आदर्श रीतीनें वागतात असें नाहीं. दुसरें असें कीं, एखादें काम लाल फितीच्या गुंत्याशिवाय करतां येत असेल तर तें तसें करणें अत्यंत इष्ट आहे ह्यांत शंका नाहीं. म्हणून संघटनात्मक आराखडा तयार केल्यावर त्याच्या मानवी बाजूकडे लक्ष देण्याचें अवधानहि आपण जरूर ठेवलें पाहिजे. संघटनात्मक आराखड्याला माझा विरोध नाहीं. पण त्याच्याहि कांहीं मर्यादा आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तसें केलें नाहीं तर त्याचें कार्य आपणांस जसें चालावयास पाहिजे तसें चालणार नाहीं.

कंपनीच्या संघटनेविषयीं योग्य ती समजूत झालेली नसल्यामुळेंच बहुतांशीं संघटनात्मक आराखडा अयशस्वी होतो. कंपनीच्या संघटनेसाठी कोणतीं मूलभूत कार्यें आवश्यक आहेत ती आपण प्रथम ठरविली पाहिजेत. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं एखादी वस्तु नव्यानें तयार करणें, तिचें उत्पादन करणें व तिची विक्री करणें हीं कंपनीचीं कार्यें आहेत. आपण आपल्या देशांत उत्पादन कार्यावर अगर संघटनेवर अधिक जोर देतों, तरी पण एखाद्या नव्या वस्तूची निर्मिती वा विक्री ह्यावरहि उत्पादन कार्याइतकाच जोर देण्याची पाळी आतां आली आहे. सध्यांच्या परिस्थितींत विक्रीच्या कार्याकडे लक्ष देण्याची प्रवृत्ति कमी होणें शक्य आहे. कारण, आपण आज प्रत्यक्ष विक्री करीत नाहीं. आपण आपल्या मालाचें आज फक्त वितरण करीत आहों.

## निर्णय घेतांना विचारांत घ्यावयाच्या बाबी

पण एवढ्याच कार्यांची काळजी वाहून आपणांस कंपनी चालवितां येणार नाहीं. कंपनी चालविण्यासाठी आणखीहि कांहीं जरूरीचीं कार्यें आपणांस केलीं पाहिजेत. ह्या कार्यांत आपल्या रोजच्या लहान अगर मोठ्या निर्णयांचा समावेश होतो. आपल्या कारखान्यासाठी थोडें अधिक पाणी घ्यावयाचें असलें, एखाद्या खिडकीचें फुटलेलें तावदान बसवायचें असलें, एखादें यंत्र घ्यावयाचें असलें, अगर अधिक कामगार कामावर घ्यावयाचें असलें तर आपणांस निर्णय घ्यावा लागतो. निर्णय लवकर घेण्यासाठी आपणास पुढील बाबींचा विचार करावा लागतो. प्रत्येक प्रश्नाला आर्थिक, तांत्रिक व सेवकविषयक बाजू असते. ह्या बाबी मुख्यतः कारभारविषयक असल्यानें त्यांना सेवकविषयक कार्यें असें म्हणतां येईल. तुम्ही पूर्वीं घेतलेल्या निर्णयावर पुन्हां नजर टाकली तर ह्याच बाबींचा विचार केलेला असल्याचें तुम्हांस आढळून येईल. एखादी नवी बादली जरी घ्यावयाची झाली तरी किंमतीच्या दृष्टीनें ती कारखान्यासाठी घेण्यानें एकंदरीनें कारखान्याचा काय फायदा होईल ह्याचा विचार करावा लागतो. तिचा काम करणाऱ्या माणसावर काय परिणाम होईल आणि ती कारखान्यांत आणल्यानें तांत्रिक दृष्ट्या हित होईल किंवा नाहीं हेंहि पहावें लागतें. अर्थात्, हा निर्णय अगदीं छोटा आहे आणि आपण तो बहुधा दोन क्षणांत करूं शकतों.

## सामाजिक बाजूकडे लक्ष

तात्पर्य, एखादी कंपनी वाढूं लागली म्हणजे तिला आपल्या संघटनेंतील बदल व नोकरांवर होणारा परिणाम ह्यांची दखल घेतली पाहिजे. कंपनींत योग्य असे सामाजिक संबंध राखण्यासाठी तिची संघटना योग्य अशा पायावर करणें अतिशय आवश्यक आहे. कार्य करणाऱ्या संघटनेंत राबणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जबाबदाऱ्या व अधिकार प्रत्येक बाबतींत लेखी स्पष्ट केल्या गेल्या पाहिजेत. आपल्या अंगावर टाकण्यांत आलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आपला अधिकार काय आहे ह्याची प्रत्येकास जाणीव असली पाहिजे. आपल्या हाताखालच्या माणसांचे अधिकार व जबाबदाऱ्या ह्यांचीहि माहिती असली पाहिजे. त्याचप्रमाणें, आपल्या नजिकच्या वरच्या

धरातील अधिकाऱ्यांचा अधिकार व जबाबदाऱ्या ह्यांच्याशींहि त्याचा परिचय असला पाहिजे. सामान्यपणें कंपनीच्या धोरणाचीहि त्याला कल्पना पाहिजे. त्यानें प्रथम सर्व कंपनीच्या हिताकडे लक्ष दिलें पाहिजे आणि नंतर आपल्या खात्याच्या हिताकडे लक्ष दिलें पाहिजे.

एखादी कंपनी वाढूं लागली म्हणज चालू राहण्यासाठीं तिला वाढतच राहावें लागतें. आपल्या संघटनेच्या सामाजिक बाजूकडे तिनें योग्य तें लक्ष दिलें पाहिजे. अर्थात् आपण अगदीं प्रारंभापासून जरूर ती काळजी घेतली तरी सुद्धां कांहीं काळानंतर आपणास मोठ्या अडचणींना तोंड द्यावें लागेल हें निश्चित. पण, तर्कशुद्ध विचारानें आणि स्पष्ट निर्णयानें कोणत्याहि कंपनीला ह्या प्रश्नांचा परिहार करतां येईल.

---

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

इं. फि. कॉर्पोरेशनला ३० जून, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी व्याजाचें उत्पन्न ९५,९३,१२५ रु. झालें. कॉर्पोरेशननें ४४,१७,४४६ रु. व्याज भरलें. सर्व खर्च भागवून, करासाठी ८,५६,३०० रु. ची तरतूद करून, संशयित कर्जासाठीं २२,२४,९७७ रु. बाजूस काढून आणि १,००,००० रु. कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह काढून कॉर्पोरेशनला १२,२५,००० रु. नफा झाला. त्यांतून ५ कोटी रु. वसूल भांडवलावर २½% 'गॅरंटीड' डिव्हिडंड दिलें जाईल.

कॉर्पोरेशनचे भाग कोणी किती धारण केले ?

| | |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार | २,००० |
| रिझर्व्ह बँक | २,०५४ |
| शेड्यूल्ड बँका | २,४०५ |
| विमा कं., इ. | २,५९८* |
| सहकारी बँका | ९४३ |
| | १०,००० |

### खेळतें भांडवल

कॉर्पोरेशनच्या खेळत्या भांडवलाची वांटणी अशी आहे :—

| | रु. |
|---|---|
| बाँडस् ( ३½%, १९६४ ) | ७,८०,५०,००० |
| रिझर्व्ह बँकेचें कर्ज (चालू बँक रेटप्रमाणें) | २,७९,५०,००० |
| मध्यवर्ती सरकारचें कर्ज ( ४½% ) | ६,५०,००,००० |

### कर्जावरील व्याजाचा दर ७%

कॉर्पोरेशनलाच स्वतः आतां अधिक व्याजानें रकमा उभाराव्या लागतात. म्हणून, त्यानें आपल्या स्वतःच्या कर्जावरील व्याजाचा दर वाढविला आहे. तो आतां ७% आहे. वक्तशीर व्याज व मुद्दल देणारास ½% सूट मिळते.

### दिलेलीं कर्जें

कॉर्पोरेशननें अहवालाच्या सालीं ९ कोटी, ७७ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं. आतांपर्यंत एकूण २५ कोटी, ५० लक्ष रुपयांचीं कर्जें देण्यांत आलेलीं आहेत. आतांपर्यंत, गेलें वर्ष सोडलें तर कधींहि एवढीं कर्जें दिलीं गेलीं नव्हतीं. कजवांटणीची वार्षिक सरासरी ९ कोटी, ९ लक्ष रु एवढीच आहे.

* ह्यांपैकीं २,३८६ भाग लाईफ इं. कॉर्पोरेशनकडे आले आहेत.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्ज मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाच्या दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

( १ ) सदाशिव पेठ, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४९५ रविवार पेठ, पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर

# सहकारी संस्थांची कार्यक्षमता

## जनहितासाठी पुच्छप्रगति : लोकशाही व सुलतानशाही ह्यांचा सुवर्णमध्य हवा

लेखक : " नूतन " सहकारी

गेलीं पन्नास-पंचावन वर्षे आपल्या देशांत अनेक सहकारी संस्था वेगवेगळ्या आर्थिक क्षेत्रांत थोडेंफार काम करीत आलेल्या आहेत. मुंबई राज्यांत तरी पहिलीं कांहीं वर्षे त्यांचें मुख्य कार्यक्षेत्र लहानमोठीं खेडीं हेंच असून तेथील शेतकऱ्यांना शेतीसाठी व इतर किरकोळ कारणांसाठी लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा करणें हा त्यांचा प्रमुख उद्योग होता. शेतीसाठी लागणारें जरूर तें भांडवल योग्य अशा माफक व्याजानें व वेळचे वेळीं शेतकऱ्यांना मिळवून दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारेल व स्थानिक सावकार व शेतकरी कुळें यांच्यांतील तक्रारी कमी होऊन समाजांत शांतता नांदेल अशी अपेक्षा होती. सावकार व कूळ ह्या दोन्हीं भूमिका एकाच व्यक्तिसमूहास स्वीकाराव्या लागल्यास सावकार व कूळ यांच्या अडचणी व त्यांच्या जबाबदाऱ्या काय असतात याची पूर्ण जाणीव त्या व्यक्तिसमूहास सहजीं होऊं शकेल व मग सावकार व कूळ यांचे दरम्यान निर्माण होणारा संघर्ष आपोआप बंद होईल अशी कल्पना होती. पुढें या व्यक्तिसमूहांना कायदेशीर स्थान देण्याचें ठरवून त्यांच्या सहकारी संस्था कायद्यान्वयें नोंदण्यांत येऊं लागल्या. या संस्था लोकांनीं, लोकांसाठीं, व लोकांच्या म्हणून चालवावयाच्या असल्यानें त्यांचा कारभार आजवर सर्वस्वीं लोकशाही पद्धतीनें चालत आलेला आहे व तें योग्यच आहे.

### गुंडांचा समितींत समावेश

शेतकऱ्यांना लागणाऱ्या भांडवलाच्या पुरवठ्याशिवाय इतर प्रकारचीहि मदत त्यांना याच पद्धतीनें व तत्त्वावर पुढें हळूहळू व दिवसेंदिवस जास्त जास्त प्रमाणावर मिळूं लागली. नवीन नवीन प्रकारच्या खेडुतांच्या व नागरिकांच्या सहकारी संस्था स्थापन होऊं लागल्या. आज आपल्या राज्यांत अनेक प्रकारच्या ग्रामीण व नागरी सहकारी संस्था वेगवेगळ्या आर्थिक क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणावर कामगिरी करीत आहेत; व त्या सर्वांचा कारभार लोकशाही पद्धतीनेंच चालला आहे. या संस्थांच्या सर्व सभासदांची दरवर्षी निदान एकदां तरी साधारण सभा भरत असून त्या सभेंत संस्थेनें मागील वर्षांत केलेल्या कामकाजाबाबत व तिच्या सांपत्तिक परिस्थितीबाबत चर्चा व विचारविनिमय होत असतो व अशा चर्चेनंतरच पुढील वर्षीं संस्थेचें कामकाज पाहण्यासाठीं सभासद आपल्यापैकी लायक इसमांची एक कार्यकारी समिति नेमून त्या समितीकडे संस्थेचा दैनंदिन कारभार सोंपविण्यांत येत असतो. ज्या अर्थी सर्व सभासदांच्या विचारानें व मताप्रमाणें ही निवडणूक होत असते, त्याअर्थी सभासदांच्या पूर्ण विश्वासाच्या, लायक व प्रामाणिक अशाच इसमांची निवड कार्यकारी समितीवर होत असली पाहिजे हें उघड आहे. परंतु याबाबतचा गेल्या कांहीं वर्षांचा अनुभव लक्षांत घेतला तर वस्तुस्थिति मात्र वेगळी आहे असें बऱ्याच संस्थांच्या बाबतींत दिसून येतें. समितीवर स्थानिक गुंड वेगवेगळ्या साधनांनीं निवडून येतात असें दिसतें. लांचलुचपती-पासून दहशतीपर्यंतचा उपयोग हे गुंड करीत असतात असा अनुभव आहे.

### कूळ व सावकार ह्यांच्यामध्यें समतोलपणा हवा

सहकारी संस्था या प्राधान्येंकरून कर्ज घेणाऱ्यांचे संघ असल्यानें या संस्थांच्या साधारण सभांत ज्या ज्या वेळीं अनेक प्रश्नांचा विचार होतो तेव्हां तेव्हां त्या प्रश्नांचा केवळ कर्जदारांच्या फायद्याच्या व हिताच्या दृष्टीनेंच विचार होत असतो असें बहुशः दिसून येतें. वास्तविक अशा सर्व प्रश्नांचा विचार कूळ व सावकार अशा उभयतांच्या दृष्टीनें व्हावयास पाहिजे; व तसा तो झाला तरच तो समतोलपणें होऊं शकेल. परंतु सामान्यतः तसें होत नाहीं. सहकारी संस्था या लोकशाही पद्धतीनें काम करणाऱ्या संस्था असल्यानें त्यांचे सभासद जर समतोलपणें विचार करणारे नसतील व ते केवळ स्वार्थाच्या दृष्टीनेंच वेगवेगळ्या प्रश्नांकडे पाहतील तर त्यांच्या संस्थेचें काम कितपत कार्यक्षम होत असेल हा एक मोठा प्रश्न आहे. सर्व सभासदांच्या समाईक हितसंबंधांत प्रत्येक सभासदाचें वैयक्तिक हित समाविष्ट झालेलें आहे असें प्रत्येक सभासदानें मानलें पाहिजे. परंतु आपल्या देशांतील सर्वसामान्य माणसाची विचार करण्याची पातळी इतकी उंचावलेली आहे असें अद्याप तरी दिसून येत नाहीं. आपल्या स्वतःच्या आणि फार तर आपल्या निकटच्या नातेवाइकांचा व इष्टमित्रांचा स्वार्थ साधला म्हणजे झालें; मग इतरांचें आपल्याबरोबरच हित साध्य होवो किंवा कदाचित् त्यांचें अनहितहि होवो; त्याचा विचार सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद करतोच असें नाहीं. आपल्याकडील सामान्य माणसाची तरी अशा सभासदांच्या मताधिक्यावर चालणाऱ्या संस्थांकडून सामाजिक कल्याणाचीं कामें कितपत कार्यक्षमतेनें पार पडत असतील हा मोठा प्रश्न आहे.

### 'लोकशाही'चें विडंबन

लोकशाही कारभारांत " लोक " यांचा दर्जा कोणता व कोणास " लोक " म्हणावें हा एक प्रश्न आहे. " लोक " या शब्दाची आपण जी व्यवस्था ठरवूं त्यावरच अशा लोकांकडून चालविल्या जाणाऱ्या संस्थांकडून होणारी सेवा ही समाजास कितपत उपयोगी पडेल तें अवलंबून राहील. सहकारी संस्थांनीं समाजाच्या आर्थिक व्यवहाराकडे लक्ष देऊन संस्थेंतील सर्व सभासदांचा संघटितपणें फायदा करून दिला पाहिजे अशी आजची आपली अपेक्षा आहे. ती साध्य व्हावयाची असेल, तर संस्थेंतील प्रत्येक सभासदानें वैयक्तिक स्वार्थापेक्षा संघटित फायदा हा अधिक मौल्यवान् आहे असें मानलें पाहिजे व त्याप्रमाणें वागलेंहि पाहिजे. परंतु आपल्यापैकीं बऱ्याच लोकांस स्वार्थ हा अधिक मोलाचा वाटतो, व मनावरील हें दडपण आपण लोकशाही पद्धतीनें काम करीत असतांनाहि सोडूं शकत नाहीं ही वस्तुस्थिति आहे व तें नाकबूल करून चालणार नाहीं. आपल्याकडील कांहीं लहान-मोठ्या सहकारी संस्थांच्या कारभारास " लोकशाही " हें विशेषण लावणें म्हणजे " लोकशाही " या शब्दाचें विडंबन करणेंच होय. अशा कारभारास " जमावशाही," किंवा " बाजार बुणगेशाही " किंवा " गुंडशाही " म्हणणेंच जास्त सयुक्तिक ठरेल.

स्थापना सन १९३५ टे. नं. २६१५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोवळे, ( अध्यक्ष )
श्री. गे. गो. ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. म. बा. बेंडे, ( ऑ. खजिनदार )
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. गे. ल. पाटील नलवडे ,,
श्री. आ. पां. ढोरे ,,
श्री. ज्ञा. मा. मनसुख ,,
श्री. म. रा. नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव
( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयीवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी

## एक प्रमुख बँक

मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस् वसुलीसाठी पाठविणेची सोय आहे.

जी. डी. सराफ
चेअरमन

***********************************

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

सहकारी कायद्यान्वयें स्थापन झालेली

# दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना वर्ष ] [ सन १९३५

पेण, जि. कुलाबा



| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५०,००० |
| गंगाजळी व फंड | रु. ४८,९०४ |
| खेळतें भांडवल | रु. ४,९२,४९४ |

********************
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
********************

ना. य. नेने, चेअरमन.
व. वि. कोठारी, मॅनेजिंग डायरेक्टर.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक ह्यांना सुखसमृद्धीचे जावो !

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळः—सकाळीं ९ ते ११-३० व सायंकाळीं ५-३० ते ७
शनिवारीं फक्त सकाळीं ९ ते ११-३०

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,३५,९४० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. १,७४,४५५ |
| ठेवी | रु. १५,३०,३०७ |
| खेळतें भांडवल | रु. १९,५०,२८५ |

★ पन्नास वर्षे सतत भरीव व चोख कामगिरी.
★ मध्यमवर्गीयांची सोय पाहणारी व विश्वसनीय.
★ सतत ३५ वर्षे 'अ' वर्गांत.
★ मध्य वस्तींत प्रमुख ठिकाणीं स्वतःची इमारत.
★ सेफ कस्टडीची व्यवस्था.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

नियमांसंबंधीं बँकेंत चौकशी करावी.

य. श्री. शालिग्राम, कार्यवाह.
वा. म. लेले, कार्याध्यक्ष.

## कारभाराची पद्धत बदला

वरील परिस्थिति लक्षांत घेतां सहकारी संस्थांचा कारभार जास्त कार्यक्षमतेनें व्हावा अशी आपली अपेक्षा असेल तर ती साध्य होण्यासाठी या संस्थांचा कारभार चालविण्याची आपण आजवर अवलंबलेली पद्धत यापुढें आपणांस बदलली पाहिजे किंवा काय, या दृष्टीनें विचार करणें जरूर झालें आहे असें आम्हांस वाटतें. याबाबतचे आमचे कांहीं विचार याखाली आम्ही देत आहों. कित्येक जुन्या सहकारी कार्यकर्त्यांना हे आमचे विचार पटणार नाहींत, अशी भीति वाटते. तथापि प्राप्त परिस्थिति लक्षांत घेऊन याबाबतचे आमचे विचार स्पष्टपणें व निर्भीडपणें आम्ही मांडीत आहों त्यांचा विचार करून आपलेहि याबाबतचे साधक-बाधक विचार सरकारी व बिनसरकारी सहकारी कार्यकर्त्यांनीं जनतेसमोर मांडावेत अशी आमची त्यांस आग्रहपूर्वक विनंती आहे. सरकारनें देखील या विषयाकडे स्थितप्रज्ञासारखे डोळे मिटून गप्प न राहतां चौकस बुद्धीनें व थोड्याफार कठोर वृत्तीनें पाहून हल्लींच्या कामकाजाच्या पद्धतींत आमूलाग्र फेरफार करणें जरूर आहे किंवा काय, याचा विचार करावा. सुदैवानें, मुंबई राज्याच्या हल्लींच्या सहकारी मंत्र्यांनीं आपल्या पूर्वाश्रमीं कांहीं सहकारी संस्थांचा कारभार बरींच वर्षें चालविलेला असल्यानें आम्ही या पुढें करीत असलेल्या सूचनांचा विचार ते निर्विकारपणें करूं शकतील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

## सरकारची भूमिका

सहकारी संस्था या सर्वस्वीं लोकांच्या असून त्या लोकशाही पद्धतीनें चालत असल्यानें त्यांच्या कामकाजांत सरकारनें ढवळाढवळ करूं नये, एवढेंच नव्हे तर त्यांनीं त्यांच्या कामकाजाकडे विशेष लक्षहि देऊं नये, असें बऱ्याच कार्यकर्त्यांचें अद्यापहि मत आहे. संस्थेच्या कारभाराबाबत एखाद्या सभासदानें किंवा सभासदांनीं सहकारी खात्याच्या अम्मलदारांकडे तक्रार केली तरच फार तर अशा तक्रारींची मामुली चौकशी करण्यापलीकडे त्यांनीं फारशी हालचाल करूं नये, असेंहि मानणारे कांहीं जुने कार्यकर्ते आहेत. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या विचारसरणींत बराच फरक झाला आहे. सरकारनें केवळ सल्लागार अगर तत्त्ववेत्ता अशी भूमिका यापुढें न घेतां सहकारी संस्थांच्या कामकाजांत प्रत्यक्ष लक्ष घालणारा भागीदार म्हणून जबाबदारी सरकारनें यापुढें पतकरली पाहिजे, असे विचार अलीकडील तज्ज्ञांनीं प्रदर्शित केलेले आहेत व ते सरकारनें मान्यहि केलेले आहेत. अलीकडे सरकारनें बऱ्याच संस्थांत, विशेषतः मध्यवर्ती किंवा फेडरल संस्थांत, भागीदारी स्वीकारली असून त्या संस्थांतून भाग रूपानें अगर कर्ज रूपानें आपले पैसे गुंतविण्यास सुरुवात केली आहे. सरकारी पैसा हा सामान्य जनतेकडून कर रूपानें जमविलेला पैसा असल्यानें, वेगवेगळ्या संस्थांचे सभासद, व जनतेचे प्रतिनिधी म्हणून सरकार, अशा दोघांच्या भागीदारीनें यापुढें या संस्थांचा कारभार चालणार आहे. सबब पूर्वीप्रमाणेंच लोकशाही पद्धतीनें या मध्यवर्ती, फेडरल वगैरे संस्थांचा कारभार यापुढें चालविणें श्रेयस्कर ठरेल असें आम्हांस वाटत नाहीं. शिवाय, स्वातंत्र्यानंतर प्रस्थापित झालेलें सरकार हें लोकांनींच निवडून दिलेलें आहे हेंहि लक्षांत घेणें जरूर आहे. अशा परिस्थितींत, जोंपर्यंत सहकारी संस्थांचे सभासद "लोक" या भूमिकेस पात्र ठरत नाहींत तोंपर्यंत तरी या मध्यवर्ती वगैरे संस्थांचा कारभार लोकशाहीखेरीज अन्य प्रकारच्या पद्धतीनें चालविण्याचा प्रयोग करून पहावा असें आम्हांस वाटतें.

## तज्ज्ञांकडे व्यवस्था सोंपवा

सहकारी संस्थांचा कारभार केवळ सुलतानशाही पद्धतीनें किंवा नोकरशाही पद्धतीनें चालविणें श्रेयस्कर होईल असें आम्हांस वाटत नाहीं; कारण याप्रकारच्या पद्धतींत लोकांच्या अडीअडचणींचा अगर आकांक्षांचा विचार होतोच असें दिसत नाहीं व म्हणून ही पद्धत स्वीकारार्ह आहे असें मानता येणार नाहीं. सबब "लोकशाही" व "सुलतानशाही" या दोन्ही पद्धतींतील सुवर्णमध्य असा आपणास पसंत करावा लागेल असें दिसतें. अशी नवी पद्धत सुरू करण्यांत आल्यावर लोकांना स्वैरपणानें वागतां येणार नाहीं हें खरें आहे. संस्थांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें अशी अनिर्बंध सत्ता लोकांना देणें अयोग्यच आहे. सबब आम्हांस असें वाटतें कीं, आणखी कांहीं वर्षें तरी या संस्थांचा दैनंदिन कारभार जनहिताच्या दृष्टीनें काम करणाऱ्या सुजाण व तज्ज्ञ, अशा पुढाऱ्यांकडे सोंपवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थांचा कारभार चालावा. संस्थांच्या सभासदांच्या साधारण सभा हल्लींप्रमाणें भरविण्यांत येऊन त्या सभांपुढें या तज्ज्ञांनीं वर्षांत केलेली आपली कामगिरी सभासदांच्या माहितीसाठी व फार तर त्याबाबत आपलें मतप्रदर्शन करण्यासाठी मांडावी. अशा तज्ज्ञांचा व संस्थेच्या सभासदांचा संबंध, वाटल्यास, सभासदांनीं आपल्यामधून निवडलेल्या एखाद्या सल्लागार समितीमार्फत घडवून आणावा; परंतु या समितीनें संस्थेच्या कारभारांत ढवळाढवळ मात्र करतां कामा नये. अशा प्रकारें कांहीं वर्षें तरी कारभार सुरू ठेवावा. दरम्यान, संस्थेच्या सभासदांना लोकशाही संस्था कशा चालविल्या पाहिजेत हें समजून येईल अशी अपेक्षा आहे. सभासद "लोक" या संज्ञेस लायक झाले असून आपल्या आर्थिक संस्था ते निःस्वार्थपणें चालवितील अशी खात्री झाली, म्हणजे मगच त्या संस्थांचा कारभार हळूहळू लोकांकडे सोंपविण्यांत येऊन शेवटीं त्या सर्वस्वीं लोकशाही तत्त्वावर चालाव्या. परंतु, सभासदांना तशी लायकी प्राप्त होण्यापूर्वी त्यांना लोकशाहीचे हक्क देणें हें संस्थांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीनें योग्य नाहीं असेंच आजवर आलेल्या अनुभवावरून निरुपायानें म्हणणें प्राप्त आहे. हल्लींच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करणें हें अनहिताचें आहे असें दिसून येत असल्यानेंच पुच्छ-प्रगति करणारी ही सूचना करणें आम्हांस भाग पडत आहे, हें सूज्ञ वाचकांच्या ध्यानीं येईलच.

स्वस्त दरांत सर्वोत्कृष्ट मोटार-विमा, म्हणजेच
दि मोटार ओनर्स म्युच्युअल
इन्शुअरन्स कंपनी लि. बेळगांव
दिवाळीची भेट : नफ्यांत भागीदारी देणारी पॉलिसी
सहर्ष सादर करीत आहे.
अधिक माहितीसाठी लिहावें.

आमचे विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतकांना
ही दिवाळी व नवीन वर्ष
आनंदाचें जावो !

# दि मिरज स्टेट बँक, लिमिटेड, मिरज

( स्थापना १९२९ )

शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १२,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ७,०२,८०० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा : पंढरपूर, कुर्डूवाडी, वार्शी, करमाळा, लक्ष्मेश्वर व सांगली.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक ह्यांना उत्कर्षाचें जावो.

श्री. एन. पी. कानिटकर, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.



बँकेच्या भागीदारांना, खातेदारांना व हितचिंतकांना नूतन वर्ष सुखाचें जावो !

# दि बँक ऑफ कराड लि.

## हेड ऑफिस : कराड

शाखा : सातारा व इसलामपूर

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | २,२३,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ८१,५०० |
| एकूण ठेवी | रु. | २३,००,००० |

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, चेअरमन

श्री. नारायण बाळाजी बुधकर, वकील, व्हा. चेअरमन

ठेवीवरील व्याजाचे दर

सेव्हिंग्ज ठेव रु. १½%

मुदत ठेव १ वर्ष रु. ३½% २ वर्षें रु. ३¾% ३ वर्षें रु. ४%

बँक स्वतःचे मालकीची इमारत बांधीत असून इमारतीचें बांधकाम सुरू आहे.

कराड
१८-९-५७

म. वि. खंडकर
मॅनेजर.



महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

# नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१० | हेड ऑफिस : अहमदनगर शहर

शाखा:-१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड-श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,८८,४०० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | ३,१५,५१७ |
| (४) इतर फंड | रु. | ३,१८,४८० |
| (५) चालू ठेवी | रु. | २३,१६,१७१ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | १०,०५,३७३ |
| (७) मुदत ठेवी | रु. | २०,४१,९१५ |
| (८) खेळतें भांडवल | रु. | ६५,४४,५७१ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ, मॅनेजर | कृ. ज. जोशी, जनरल मॅनेजर | मो. मु. बोरा, चेअरमन



रजिस्टर नंबर ७२१८ स्थापना १९३५

# सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँडमॉर्गेज बँक, लि.

## शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !

शेतकरी लोकांना कर्जांतून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड ——— ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,२१,५७५ |
| खेळतें भांडवल | रु. | १८,०२,००० |
| वांटलेलें कर्ज | रु. | २४,५०,००० |
| ३०-६-'१७ अखेर नफा | रु. | १५,९०४ |

व्याजाचे दर:—

| | |
|---|---|
| विहीर, विहीर दुरुस्ती | ४½% |
| शेती, यंत्रसामुग्रीकरितां | ५½% |
| जमीन-खरेदी व जुनें कर्ज भागविणें | ७¼% |

म. सि. पुटाणी, मॅनेजर. | नीलकंठ आणाप्पा कल्याणी, चेअरमन.

# पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद

## परदेशीय हुंडणावळीची प्राप्ति

भारताला परदेशीय हुंडणावळीचा तुटवडा भासत असल्यामुळें सरकारनें सर्व तऱ्हेच्या पक्क्या मालाच्या आयातींत बरीच काट-छाट केली आहे, इतकेंच नव्हे तर भांडवली मालाच्या आयातीवरहि कांहीं निर्बंध घातले आहेत. कांहीं खास अपवाद सोडून भारतीय नागरिकांना परदेशांत जाण्यासाठी लागणारी हुंडणावळ उपलब्ध करून देण्याचेंहि बंद करण्यांत आलें आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या भल्यासाठी सरकारनें घातलेले सर्व निर्बंध लोकांनीं कमी-अधिक प्रमाणांत स्वीकारले आहेत. पण, ह्याच वेळीं कांहीं सरकारी खातीं परदेशीय हुंडणावळ मिळविण्याच्या कामीं मदत करीत नसल्याचें दिसून येतें, हें थोडेसें विचित्र वाटतें. उदाहरणार्थ, भारताचें पोस्टखातें भारतीय तिकिटांची निर्यात करण्याकडे पुरेसें लक्ष कां देत नाहीं हें समजण्यासारखें नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं, खात्यातर्फे जीं नवीं तिकिटें काढलीं जातात त्यांच्या नमुन्याकडे फारसें लक्ष पुरविलें जात नाहीं. नाशिक येथील सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसमध्यें खूप मोठी रकम गुंतविण्यांत आली असून जरूर त्या नोकरवर्गाची व यंत्रसाहित्यांची तरतूद करण्यांत आली आहे. पण छापखान्यांतून काढण्यांत येणाऱ्या तिकिटांचे नमुने, रंग व छपाई ह्यांची तुलना हॉलंड, स्विटझरलंड, इजिप्त, इत्यादि देशांतून काढण्यांत येणाऱ्या तिकिटांशीं केली तर भारताचीं तिकिटें कमी प्रतीचीं व कमी आकर्षक आढळून येतात. पोस्टल स्टेशनरीचीहि हीच कथा.

### पूर्वप्रसिद्धीची आवश्यकता

नमुन्यांचा प्रश्न सोडून दिला तरी एक बाब शिल्लक राहतेच. नवीं तिकिटें ज्या तारखेला बाहेर काढावयाचीं असतील त्या तारखेच्या बऱ्याच आधीं निर्णय घेऊन नव्या तिकिटांच्या विक्रीसंबंधीं योग्य ती प्रसिद्धि सरकार कां करीत नाहीं, तें समजत नाहीं. उदाहरणार्थ, हॉलंडसारखें छोटें राष्ट्र ह्या बाबतींत किती खबरदारी घेते तें पहा. नव्या तिकिटांबद्दल डच सरकार एक सुंदर पत्रकच तयार करतें व तें परदेशांना पाठवितें. ह्या पत्रकांत नव्या तिकिटांचे नमुने, रंग, एका पानांत किती तिकिटें असतील, तिकिटें केव्हां बाहेर काढलीं जातील, इत्यादि माहिती दिलेली असते; आणि हें पत्रक कित्येक महिने आधीं तयार केलें जातें. उलटपक्षीं, भारताचें पोस्टखातें जे प्रसिद्ध व्यापारी मोठ्या रकमांच्या किंमतीचीं तिकिटें विकत घेतांत त्यांना सुद्धां जरूर ती माहिती एक-दोन आठवड्यांपेक्षा अधिक पूर्वी देत नाहीं. त्यामुळें तिकिटांची निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना जगाच्या निरनिराळ्या भागांतील आपल्या ग्राहकांना नव्या तिकिटांविषयीं आगाऊ माहिती देण्यास फारसा अवधी मिळत नाहीं. त्यांना नव्या तिकिटांबद्दलच्या आपल्या मागण्या नोंदवितां येत नाहींत. उदाहरणार्थ, दशांश पद्धतीच्या चलनावर आधारलेलीं नवीं तिकिटें. ह्या तिकिटांची माहिती निर्यात करणाऱ्या लोकांना इतकी उशिरा पुरविण्यांत आली कीं, परदेशांतील गिऱ्हाइकांना त्याबद्दल कळविण्यास फारच अल्प अवधी मिळाला. दशांश पद्धतीचीं नवीं तिकिटें भारताच्या परदेशांतील फौजांना वापरावीं लागणार होतीं. पण ह्या लोकांना नवीं तिकिटें विक्रीसाठी ठेवलीं जाण्याच्या आदल्या दिवसापर्यंत त्यासंबंधीची माहिती देण्यांत आली नव्हती; इतकेंच काय, पण निदान मुंबईमधील फिलॅटेलिक ब्यूरोला तरी नव्या तिकिटांच्या विक्रीच्या दिवसा आधीं कांहीं दिवस सुद्धां त्यांच्याविषयीं कांहीं माहिती नव्हती. जी माहिती देण्यांत आली तीहि बिनचूक नव्हती. उदाहरणार्थ, खात्यातर्फे जें पत्रक काढण्यांत आलें होतें त्यांत असें लिहिलें होतें कीं, नव्या तिकिटांच्या एका कागदाच्या तुकड्यांत ९० तिकिटें असतील. प्रत्यक्ष असें दिसून आलें कीं, सर्व्हिस स्टॅंप्सच्या प्रत्येक कागदांत ३२० तिकिटें होतीं. मामुली तिकिटांच्या कागदांत मात्र ९० तिकिटें होतीं. दुसऱ्या एका पत्रकांत असें सांगण्यांत आलें होतें कीं, सर्व्हिस स्टॅंप्समध्यें १० नव्या पैशांचीं तिकिटें असतील. पण अशा प्रकारचीं तिकिटें प्रत्यक्षांत आढळून आलीं नाहींत.

### तिकिटांमार्फत परदेशांत प्रचार

भारतामधील तीन सगळ्यांत जुन्या विद्यापीठांच्या शताब्दींच्या स्मृति साजऱ्या करण्यासाठी एक अगर अधिक नवीं तिकिटें काढण्याची सूचना कांहीं महिन्यांपूर्वी सरकारला करण्यांत आली असल्याचें समजतें. विद्यापीठांचे शताब्दि समारंभ होऊनाहि गेलें. तरी पण अशीं नवीं तिकिटें काढण्यांत येणार आहेत किंवा नाहींत आणि काढण्यांत येणार असतील तर तीं केव्हां, ह्यासंबंधीं अजून कांहीं वार्ता नाहीं! असें कां तें एक पोस्टखात्यालाच माहिती. तिकिटें काढण्यांत आलीं तर त्यांची विक्री करून सरकारला निदान १० हजार रुपयांचे विदेशी चलन फारशी किंमत न देतां सहजासहजीं मिळविता येईल. पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा ज्या लोकांना छंद आहे त्यांना लक्षावधि रुपयांचीं तिकिटें विकलीं जातात हें कोणाला फारसें माहीत नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, तिकिटें विकत घेणारांसाठी कांहींहि न करतां विक्रीच्या मार्गानें लाखों रुपये मिळविलें जातात. म्हणून थोडें कां होईना, पण विदेशी चलन मिळविण्याची ही एक चांगली बाब आहे. पण पोस्टखातें ह्या बाबतींत उदासीन असल्यासारखें दिसतें. सरकारनें आपल्या नव्या तिकिटांची निर्यात केली तर सरकारला थोडाबहुत फायदा होतोच. पण परदेशांतील तिकिटें जमा करणाऱ्या लोकांना विकून निर्यात करणाऱ्यांनाहि थोडाबहुत पैसा मिळवितां येतो. तिकिटांच्या ह्या विक्रीमुळें ज्या देशांचीं तिकिटें असतील त्यांच्या संस्कृतीविषयीं, उद्योगधंद्याविषयीं, एक प्रकारचा प्रचारहि अनायासें होतो.

### हवाई तिकिटें

विमानानें पाठविल्या जाणाऱ्या टपालासाठी कित्येक देशांचीं सरकारें खास तिकिटें काढतात. तशीं तिकिटें आपलें सरकार कां काढीत नाहीं तें समजत नाहीं. विमानानें पाठविण्याच्या पत्रांसाठी निरनिराळ्या किंमतीचीं तिकिटें काढण्यांत एक फायदा आहे. सध्यां अशा पत्रांवर अगर पार्सलावर 'एअर मेल' अशा चिठ्ठ्या डकवाव्या लागतात. विमानानें जाणाऱ्या टपालासाठी वेगळीं तिकिटें काढण्यांत आल्यास अशा प्रकारच्या वेगळ्या चिठ्ठ्या छापण्याचा व त्या डकविण्याचा त्रास व खर्च दोन्हींहि वाचतील. शिवाय, परदेशांतील तिकिटें जमविणाऱ्यांना हीं तिकिटें विकून सरकारलाहि उत्पन्न मिळवितां येईल. जगाच्या निरनिराळ्या भागांत विमानानें टपाल पाठविण्यासाठी वेगवेगळ्या किंमतीचीं हवाई तिकिटें असणें जरूर आहे. लोकांची सोय आणि काटकसर ह्याहि दृष्टीनें अशीं तिकिटें उपयुक्त ठरतील.



डोकेंदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज

# रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )

केस काळे रहातात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येतें, केस वाढतात, दृष्टीहि सुधारते.

मोठी बाटली रु. ४=००
लहान बाटली रु. १=००

**श्री रामतीर्थ योगाश्रम**
मुंबई १४.
शरीर निरोगी ठेवण्यासाठीं योगासन-चार्ट मागवा.
पोस्टेजसह रु. १-०-०



[ स्थापना १९२१ ]

# गरगट्टी अँड सन्स

शहापूर-बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार

************************************

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो !

# दि सांगली बँक, लि., सांगली

( स्थापना – १९१६ :: शेड्यूल्ड बँक )
मुख्य ऑफिस : सांगली

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | :: | :: | रु. १०,००,००० |
| वसूल भांडवल | :: | :: | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | :: | :: | रु. ७,००,००० |
| एकूण ठेवी | :: | :: | रु. १,५०,००,००० |
| खेळतें भांडवल अदमासें | :: | :: | रु. २ कोटी |

: शाखा :

( १ ) शहापूर ( बेळगांव ), ( २ ) रबकवी, ( ३ ) शिरहट्टी, ( ४ ) कवठे-महांकाळ, ( ५ ) तेरदळ, ( ६ ) मंगळवेढें, ( ७ ) विलिंग्डन कॉलेज, ( ८ ) कराड, ( ९ ) मुंबई-फोर्ट, ( १० ) उगार खुर्द, ( ११ ) इचलकरंजी, ( १२ ) कोल्हापूर, ( १३ ) मार्केट यार्ड (सांगली)

*सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.*

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

श्री. एम्. ए. शेख, आय्. ए. एस्., कलेक्टर साऊथ सातारा, सांगली.
चेअरमन, एक्स ऑफिशिओ बँचे गव्हर्मेंट नॉमिनी
श्री. महादेव हरी गोडबोले, बी. ए., एलएल. बी.
श्री. आण्णा बाबाजी टारे,
श्री. राजाराम रामचंद्र शहा,
श्री. लालचंद नथमल,
श्री. हरीहरराव नारायणराव पटवर्धन,
श्री. श्रीनिवास रामचंद्र माल्दू,

एम्. के. गुप्ते, M. A., LL. B., C. A. I. I. B. मॅनेजर.

# शत्रुपक्षावर कागदी शस्त्रास्त्रांचा प्रभावी भडिमार

## सोनें व दुर्लभ चलन मिळविण्यासाठी बनावट नोटांचा उपयोग

दुसऱ्या महायुद्धांत दोन्ही पक्षांनीं युद्ध जिंकण्यासाठी अनेक सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब केला. रणांगणावरील हाणामारी, मुत्सद्यांच्या पडद्यामागील कारवाया, भेदनीति, आर्थिक नाकेबंदी, इत्यादि मार्गांचा उपयोग ह्यांत नवीन असें कांहीं नाहीं. युद्धांत जयश्री खेचून आणण्यासाठी कोणताहि उपाय न्यायाचाच असतो ह्या अर्थाचें इंग्लिश सुभाषित प्रसिद्धच आहे. पण, शत्रुराष्ट्रांतील आर्थिक घडी 'शुद्ध' आर्थिक उपायांनीं विस्कटून टाकण्याचे प्रयत्न कांहींसे अभिनव पद्धतीचे म्हणण्यास हरकत नाहीं. अशाच पण लोकविलक्षण अशा ठकबाजीची नुकतीच प्रसिद्ध झालेली खालील हकीकत मनोरंजक आणि उद्बोधक वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

### बनावट कूपन्सना बनावट नोटांनीं उत्तर

दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर ब्रिटिश विमानांनीं जर्मनीवर नुसता बॉंबचाच वर्षाव केला, असें नाहीं. ब्रिटिश विमानांतून जर्मन सरकारच्या अन्नाच्या व कपड्याच्या कुपनासारखीं कुपन्साहि टाकण्यांत आलीं. मूळच्या नमुन्याबरहुकूम हुबेहूब बनविण्यांत आलेलीं हजारों कुपन्स जर्मन प्रदेशांत टाकण्यांत आलीं. अर्थातच ह्याचा बदला घेण्याची कल्पना जर्मन सरकारच्या मनांत आली. ब्रिटनच्या पौंडाच्या बनावट नोटा तयार करून त्या ब्रिटिश बेटावर टाकण्याची योजना आंखण्यांत आली. त्यामुळें ब्रिटनची अर्थव्यवस्था विस्कळीत होईल असा अंदाज करण्यांत आला होता. ह्या योजनेला हिटलरनें आपली संमति दिली आणि मग हें काम गुप्त पोलिसांच्या एका खास शाखेकडे सोंपविण्यांत आलें. हें खातें परदेशांत हेरगिरी करण्यासाठी लागणारे बनावट पासपोर्टस तयार करण्याच्या कामांत वाकबगार होतें. कुशल कामगारांनीं अनेक महिने खपून नोटांसाठी लागणारा वॉटरमार्कचा कागद तयार केला, बेमालूम ठसे तयार केले आणि शाई बनविण्याची रीतहि शोधून काढली. ह्या कामगारांत बनावट नोटा तयार करण्यांत तरबेज असे कांहीं गुन्हेगारहि होते.

### धिटाईची योजना

पौंडाच्या बँक नोटस विमानांतून नुसत्या टाकल्या असत्या तर त्यांपैकी पुष्कळशा वाया गेल्या असत्या. म्हणून ह्यापेक्षा अधिक धिटाईची योजना आंखण्यांत आली. तटस्थ असलेल्या देशांच्या चलनी नोटांच्या बदला ह्या नोटा त्या देशांत द्यावयाच्या असें ठरलें. परकीय राष्ट्रांतून जर्मन गुप्तपोलिसांचें जें जाळें होतें त्याचा खर्च अशा तऱ्हेनें भागविण्यांत येणार होता. कारण, जर्मन मार्कची परदेशांतील किंमत अगदीं अल्प असल्यानें गुप्तपोलिसांचें खातें आर्थिक अडचणींत सांपडलेलें होतें. बनावट नोटा तयार करण्याची ही कारवाई सामान्य स्वरूपाची नव्हती. अनुक्रम नंबर, तारीख, सही, ह्याबाबतींत तज्ज्ञांच्या डोळ्यांतहि धूळ टाकतील आणि मूळ नोटा सारख्या दिसतील अशा प्रकारच्या हुबेहूब बनावट नोटा तयार कराव्या लागणार होत्या. हें काम अतिशय गुप्ततेनें चालावें म्हणून नोटा छापण्याचा कारखाना ऑस्ट्रियांतील एका दुर्गम अशा ठिकाणीं ठेवण्यांत आला. नंतर कांहीं नोटा छापण्यांत आल्या आणि एका निरोप्याकरवीं स्वित्झर्लंडमधील एका बँकेकडे पाठविण्यांत आल्या. निरोप्याबरोबर जर्मनीच्या राइश बँकेचें एक खोटें पत्रहि देण्यांत आलें होतें. बँकेनें नोटांची कसून तपासणी केली, नोटांचे नंबर बँक ऑफ इंग्लंडच्या मदतीनें निश्चित केले आणि नोटा खऱ्या असल्याचा आपला अभिप्राय व्यक्त केला!

### ठकबाजींत होटेल मॅनेजर व बँक मॅनेजर सामील.

पुढें ह्या ठकबाजीचें स्वरूप आणखी विस्तार पावलें. असल्या प्रकरणांत अनेक देशांतील चांगला अनुभव असलेला एक माणूस जर्मनींत आला. त्याला ह्या बनवाबनवीची माहिती देण्यांत आली. त्याच्या युरोपांतील अनेक व्यक्तींशीं ओळखी होत्या. त्या व्यक्तींमार्फत पौंडांच्या बनावट नोटा ह्या सोनें आणि दुर्लभ चलन ह्यांच्या बदला प्रसृत करतां येतील, असें

ही दीपावलि बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो!

**जनता सहकारी बँक लिमिटेड**

८६६ सदाशिव पेठ, पुणें २.
फोन नं. २८८५
सेव्हिंगचा दर : द. सा. द. शें. दोन टक्के
अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.
व्याजाचे दर वा इतर माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

शाखा:—घोले रोड, शिवाजीनगर पुणें ५.
★ मध्यम व गरिबांसाठी आकर्षक बचत योजना.
★ कार्यक्षम व तत्पर व्यवस्थापक-मंडळाची देखरेख.
★ रेल्वे रिसीट, हुंड्या, चेक्स, वगैरे वसुलीची व्यवस्था.
★ शेअर्स खरेदी, विक्री, वगैरे व्यवहाराची सोय.

याशिवाय अद्यावत् बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

द. शं. जमदग्नि, मॅनेजिंग डायरेक्टर

त्याचें म्हणणें होतें. जर्मनीला युद्धोपयोगी कच्च्या मालाची फार आवश्यकता होती. तो माल परदेशांत विकत घेण्यासाठी सोन्याचा व दुर्लभ चलनाचा जर्मनीला फार उपयोग झाला असता. ही योजनाहि मंजूर करण्यांत आली. ज्यानें ती सूचित केली, तो होणाऱ्या उलाढालीवर ३३⅓ टक्के कमिशन घेऊन त्यापैकी २६ टक्के आपल्या हस्तक एजंटांना देणार होता. उरलेलें कमिशन तो घेणार होता. हे एजंटस म्हणजे मुख्यतः जेवण्या-राहण्याची सोय करणारे होटेल्सचे मालक होते असें पुढें आढळून आलें. ह्यापैकी कांहीं मालकांचीं होटेल्स तर आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीचीं होतीं. पण ह्या होटेल–मालकांशिवाय बँकांचे दोन मॅनेजर्सहि हस्तक एजंटस् होते: एक होता स्विट्झरलंडचा नागरिक व दुसरा होता इटलीचा नागरिक. दोघांच्याहि वागणुकीबद्दल शंका घेण्याचें मुळींच कारण नव्हतें.

### हस्तकांचे विविध मार्ग

पौंडाच्या बनावट नोटांचा पहिला हप्ता बर्लिनमधील गुप्त-पोलिसांच्या मुख्य कचेरींत पोंचविण्यांत आला. त्यांत ५ लाख पौंडांच्या नोटा होत्या. त्या बरेच दिवस वापरांत असल्यासारख्या दिसत होत्या, आणि त्यांचे नंबरहि मोठ्या खुबीनें सरमिसळ करण्यांत आलेले होते. कचेरीनें नोटा लगेच योग्य ठिकाणीं पाठविल्या. फलप्राप्ति होण्यास फारसा काळ लागला नाहीं. लवकरच बर्लिनमधल्या कचेरीकडे पोलादाच्या तीन पेट्या पाठविण्यांत आल्या. ह्या पेट्या डॉलर–बिल्स व स्विस बँकनोटस् ह्यांनीं भरलेल्या होत्या. शिवाय आंत असलेल्या चार छोट्या पेट्यांत सोन्याचीं नाणीं आणि सोन्याच्या कांबी होत्या. लोभी माणसाच्या स्वप्नांतहि येणार नाहीं इतकी ही संपत्ति होती. सहज बदला करता येणारीं बिल्स देऊन त्यांच्या बदला बँक ऑफ इंग्लंडच्या म्हणून मानल्या गेलेल्या नोटा कां घेण्यांत आल्या, आणि सोन्याच्या मालकांनीं त्याच्या बदला कागदी चलन कां घेतलें, असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. पौंडाच्या बँक नोटस् खूप 'डिस्काऊंट' देऊन टाकण्यांत आल्या असाव्या हें उत्तर सयुक्तिक वाटतें. हस्तक एजंटांचे मार्ग नाना प्रकारचे होते. एक एजंट एक जर्मन कॅप्टन होता. त्याला पोर्तुगालमध्यें नोंदविण्यांत आलेली एक बोट देण्यांत आली होती. ह्या बोटीचा उपयोग करून तो इटली व उत्तर आफ्रिकेंतील बंदरें ह्यांच्या दरम्यान खेपा करीत असे. बोटीच्या एंजिनामध्यें ॲसबेस्टॉसच्या धातूचा एक कप्पा बसविण्यांत आला होता. ह्या कप्प्यांतून तो पौंडाच्या नोटा छपवून नेत असे आणि येतांना डॉलर-बिल्स घेऊन येत असे. डेन्मार्कमधील एका हॉटेलचा मॅनेजरहि असाच धंदा करीत होता. त्याच्या अधिकार-क्षेत्रांत स्वीडनचा समावेश करण्यांत आल्यावर पौंडाच्या नोटांच्या बदला सोनें मिळूं लागलें. अमेरिका-इंग्लंडचीं सैन्यें फ्रान्समध्यें उतरल्यावर त्यांनीं आपलें चलन सुरू केलें होतें. तें वापरांतून काढून घेण्यास सुरुवात झाल्यावर त्याचा फायदा घेऊन एका फ्रेंच एजंटानें १० लाख पौंड किंमतीच्या बनावट नोटा खऱ्या खोट्या व्यवहारांत खपविल्या. नंतर अशाच आणखी १० लाख पौंडांच्या नोटा स्पेनमध्यें खपविण्यासाठी स्पेयाच्या स्वाधीन करण्यांत आल्या. ह्या नोटांच्या बदला त्यानें हिऱ्यानें भरलेली एक कातड्याची पेटी दिली. पुष्कळशा नोटांचा उपयोग लांच-लुचपतीसाठी करण्यांत आला. तुर्कस्थानांतील ब्रिटिश वकिलाचा एक अल्बानिअन नागरिक चपराशी होता. वकिलाच्या तिजोरींतील गुप्त कागदपत्रांचे फोटो घेण्यासाठी त्यानें ते कागदपत्र तात्पुरते चोरले. ह्या कामगिरीसाठी त्याला ३लाख पौंड देण्यांत आले. तुर्कस्थान युद्धांत सामील झाल्यावर तो आपल्या मायदेशीं परतला आणि चैनींत रहाण्याचीं सुखस्वप्नें पाहूं लागला. पण ह्या सुमारास ठकबाजीचें वृत्त पसरूं लागलेलें होतें त्यामुळें त्याचें सर्व वैभव कागदाच्या कस्पटासमान झालेलें होतें. पश्चिम जर्मनीमधील बॉन सरकारची स्थापना झाल्यावर ह्या माणसानें रकमेवर आपला हक्कहि सांगितला. पण तो फेटाळण्यांत आला.

### सैनिकांनीं हत्यारें देऊन नोटा घेतल्या

युगोस्लाव्हिआंत गनिमी लष्कर लढत होतें. त्याला ब्रिटनकडून पाणबुड्यांच्या साह्यानें शस्त्रास्त्रें पुरविण्यांत येत होतीं. ह्या लष्करांतील कांहीं सैनिकांचे डोळे ब्रिटिश बँक नोट्सनीं इतके दिपून गेले कीं त्यांनीं आपलीं हत्यारें नोटांच्या बदला देऊन टाकलीं. हींच हत्यारें त्यांच्याविरुद्ध वापरण्यांत येणें शक्य होतें. रशिअन लष्कर मुसंडी मारूं लागल्यावर ऑस्ट्रिआंतील कारखाना मोडण्यांत आला आणि नोटांनीं भरलेल्या दोन मोटारी दुसरीकडे पाठविण्यांत आल्या. त्यापैकीं एक वाटेंतच बिघडली व अडकून पडली. त्यावरील अधिकाऱ्यानें टेलिफोनवरून मदतीची मागणी केली असतां नोटांनीं भरलेल्या पेट्या जवळच्या पूर आलेल्या नदींत फेकून देण्यास सांगण्यांत आलें. कांहीं दिवसांनीं प्रवाहाच्या जोरानें म्हणा अगर आंतील माल फुगल्यामुळें म्हणा नदींत टाकलेल्या पेट्या फुटल्या आणि नदीच्या प्रवाहावर हजारों नोटा तरंगूं लागल्या. अमेरिकन सैनिकांनीं त्या गोळा केल्या आणि वाळूंत टाकल्या. पुष्कळशा नोटा चोरीला गेल्या आणि पुढें युरोपमधील काळ्या बाजारांत वावरूं लागल्या. दुसरी मोटार अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनीं पकडली. ह्या मोटारींत ५, १० व २० पौंडांच्या नोटांनीं भरलेल्या २३ पेट्या होत्या. एकूण नोटा ४ कोटी पौंड किंमतीच्या होत्या. तिसऱ्या एका मोटारींत नोटांचे ठसे आणि कदाचित् आणखी नोटा असाव्या. पण त्या मोटारीचें काय झालें तें रहस्यच आहे.

### प्रचंड व्यवहार

एकूण बनावट नोटा किती किंमतीच्या छापण्यांत आल्या तें नक्की कळणें संभवनीय नाहीं. पुढें करण्यांत आलेल्या चौकशींत असें निष्पन्न झालें कीं, दर महिन्याला निदान ४ लाख नोटा तरी छापण्यांत येत होत्या. हा अंदाज अतिशयोक्तिपूर्ण असला आणि त्याच्या निम्म्यानें दरमहा नोटा छापण्यांत येत होत्या असें जरी धरलें तरी एकूण रकमेचा आंकडा खूपच मोठा होईल. दुसऱ्या एका ठिकाणच्या माहितीप्रमाणें, १९४२ पासून युद्ध संपेपर्यंतच्या कालांत १५ कोटी पौंडांच्या नोटा तयार करण्यांत आल्या. त्यापैकीं पुष्कळशा नोटा परदेशीं पसरल्या. बनावट नोटा-संबंधींची बातमी बँक ऑफ इंग्लंडला लागण्यापूर्वी बँकेचें किती नुकसान झालें तें कधींच कळणार नाहीं. पण, इतकें मात्र सांगतां येईल कीं सावधगिरीचा इषारा मिळाल्यावर खऱ्या नोटा खोट्या नोटांपासून ओळखण्यासाठीं बँकेनें उपाय शोधून काढले.

सुक्या मेव्याचे आद्य प्रवर्तक
द. ना. हेजीब
किराणा व सुक्या मेव्याचे व्यापारी,
१० शुक्रवार पेठ, पुणें २.

# टाटा कंपनीचा रोमांचकारी इतिहास

## सुवर्णमहोत्सवानिमित्त घेतलेला आढावा

### जमशेटपूर : नव्या युगाचें प्रतीक

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीची स्थापना ५० वर्षांपूर्वी करण्यांत आली. आधुनिक भारताचा औद्योगिक विकास आणि भारताच्या उद्योगधंद्यांतील सर्वोत्तम प्रथा ह्या दोन्ही गोष्टींचें प्रतीक म्हणून तिचा उल्लेख करावा लागेल. भारताच्या औद्योगिक वाढीची व त्याच्या संपत्ति उत्पन्न करण्याच्या सामर्थ्याची मोजपट्टी म्हणून आज पोलाद उत्पन्न करण्याच्या कुवतीचा उपयोग करण्यांत येतो. म्हणून, ५० वर्षांपूर्वी भारताचा पहिला पोलादाचा कारखाना उभा करणाऱ्या जे. एन्. टाटांची दूरदृष्टि अधिक तेजानें तळपत आहे. गेल्या शतकांत, १८८० च्या सुमारास, जमशेटजी टाटा ह्यांनीं आपलें स्वप्न साकार करण्याच्या प्रयत्नास सुरवात केली. पोलादाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या म्हणजे लोहमिश्रित मातीच्या शोधास त्यांनीं हात घातला. त्यावेळीं खाणीविषयक जे कायदे होते त्यांच्यामुळें २० वर्षें त्यांच्या प्रयत्नांना पालवी फुटली नाहीं. पण त्यांच्या ध्येयावरील श्रद्धेमुळें अखेर यश आलें. त्यावेळचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट, लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन, ह्यांनीं लोहमिश्रित मातीच्या भूगर्भीय शोधास परवानगी दिली. मग टाटा कंपनीच्या भूस्तर शास्त्रज्ञांनीं संघटित शोधाला प्रारंभ केला आणि १९०४ सालीं मध्यप्रदेशांतील धाली राजहरा भागांतील अशुद्ध लोखंडाचा शोध लागला. त्याशिवाय बिहारमधील लोखंडाच्या खाणीहि उघडकीस आल्या. त्यावेळीं मध्यप्रदेशांत पोलादाचा कारखाना काढूं नये, असा निर्णय भूस्तरशास्त्रज्ञांनीं घेतला. कारण, भट्टीसाठी लागणारा कोळसा तेव्हां फक्त राणीगंज व झरिया येथील खाणींमधूनच मिळण्यासारखा होता. पण पुढें ५० वर्षांनीं भिलई येथें पोलादाचा कारखाना काढण्याचा भारत सरकारनें निर्णय घेतला त्यावेळीं ह्या शोधाचा उपयोग झाला. भिलईच्या कारखान्याला अशुद्ध लोखंडाचा पुरवठा 'धाली–राजहारा' भागांतील खाणींपासूनच करण्यांत येणार आहे.

### अमोल कामगिरी

भारतामधील भावी पिढ्यांसाठी टाटांनीं केलेल्या कामगिरीपैकी सर्वांत अमोल अशा कामगिरीवर बोट ठेवावयाचें झाल्यास, भारताची पोलाद निर्माण करण्याची पात्रता त्यांनीं सिद्ध केली तिचा निर्देश करावा लागेल. भारत पोलाद निर्माण करूं शकणार नाहीं अशी समजूत त्यावेळीं सर्वत्र प्रसृत होती. पुढें ५० वर्षांनीं खुद्द लंडन शहरांतील नाणेबाजारानें भारतामधील दुर्गापूरच्या पोलादाच्या कारखान्यासाठी १·२ कोटी पौंडांचें भांडवल उभारलें. पण ह्याच लंडन शहरानें टाटांच्या मुलांना रिक्तहस्तानें परत पाठविलें होतें! भारत सरकारच्या रेल्वे–बोर्डाचे एक माजी अध्यक्ष फ्रेडरिक अपकॉट ह्यांना तर भारतांत पोलादाचा कारखाना उभारण्याची कल्पना इतकी हास्यास्पद वाटली कीं, भारतांत उत्पन्न करण्यांत आलेलें सर्व पोलाद आपण खाऊ शकूं, असे उद्गार त्यांनीं काढले! पण २६ ऑगस्ट १९०७ ह्या दिवशीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनी रजिस्टर करण्यांत आली. तिचें प्रारंभींचें भांडवल २ कोटी रुपयांचें होतें. त्यावेळच्या परिस्थितीच्या मानानें ही रक्कम मोठी होती आणि भारतांतील एका धंद्यांत गुंतविलेली ती सर्वांत मोठी रक्कम होती. त्यावेळच्या एका प्रसिद्ध धातुविषयक सल्लागार कंपनीच्या एका डायरेक्टरनें लोकांच्या उत्साहाचें असें वर्णन केलें आहे:—"सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत मुंबईतील टाटा कंपनीच्या कचेरीला, भांडवल गुंतविणाऱ्यांचा वेढा पडलेला होता. वृद्ध व तरुण, गरीब व श्रीमंत, स्त्रिया आणि पुरुष असे बहुसंख्य लोक आपआपली पुंजी घेऊन आले होते. तीन आठवड्यांत बांधकामासाठी लागणारें १६ लाख, ३० हजार पौंडांचें भांडवल भरणा झालें. ही सर्व रक्कम ८,००० भारतीयांच्या खिशांतून जमा झालेली होती."

### आर्थिक संकटांशीं यशस्वी सामना

जमशेटजी टाटा १९०४ मध्यें जर्मनीमध्यें कालवश झाले. त्यांच्या जीवनांत त्यांच्या युगाचे गुण प्रकर्षानें दिसून येतात. काटकसर आणि औदार्य, हिंमत व धाडस हेच ते गुण होत. अजूनहि ह्याच गुणांचा कंपनीला उपयोग होत आहे. त्यांच्यानंतर कार्याची धुरा त्यांचे वडील पुत्र श्री. दोराबजी टाटा आणि कंपनीचे सध्यांचे अध्यक्ष श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांचे वडील श्री. आर. डी. टाटा ह्यांच्या खांद्यावर पडली. १९०८मध्यें बिहारमधील सांकची येथें कारखाना उभारण्यास सुरवात झाली. छोटा नागपूरच्या जंगलांत आधुनिक सुखसोयींनीं युक्त असें नवीन शहरच वसविण्यांत आलें. ह्याचेंच नामकरण पुढें जमशेटपूर असें करण्यांत आलें. १९११ च्या अखेरीस कारखाना उत्पादन करूं लागण्यास सिद्ध झाला. १९१६ मध्यें कारखाना आपली सर्व उत्पादनक्षमता वापरूं लागला आणि युद्धविषयक मागण्या पुरवूं लागला. कसोशीच्या कारभारामुळें कंपनीला मंदीच्या लाटेला व आर्थिक संकटाला तोंड देता आलें. युद्धकाळांत झालेला नफा परत कारखान्यांत गुंतवून कारखान्याच्या विस्ताराचा खर्च भागविण्यांत आला. १९१३ मध्यें कारखान्याचा राखीव निधि ३·५८ लाख रु. होता, तो १९१६–१७ मध्यें ३६·२५ रु. लाख झाला. ह्या राखीव निधीच्या साह्यानें १९१७ मध्यें कंपनीनें ७ वर्षें मुदतीची एक विस्ताराची योजना हातीं घेतली. योजना पूर्ण झाल्यावर उत्पादन दुप्पट तर झालेंच, पण त्यांत बरीच विविधताहि आली. आज पोलादाच्या बाजारांत विकणारांचा वरचष्मा आहे. पण कंपनीच्या इतिहासांत ज्यावेळीं पोलादाची मागणी अत्यल्प होती, अशा वेळीं ह्या विस्ताराच्या योजना अंमलांत आणल्या गेल्या हें लक्षांत आणलें म्हणजे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाहीं.

### संरक्षक जकाती

पहिलें महायुद्ध संपल्यावर युरोपमधील पोलादाचें उत्पादन करणाऱ्या कारखान्यांना आपल्या उत्पादनक्षमतेचें काय करावें तें समजेना. भारतामध्यें युरोपमधील स्वस्त पोलादाचा पूर येऊं लागला आणि त्यांत नुकतेंच बाळसें धरूं लागलेला पोलादाचा हा धंदा बुडतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. भारताच्या धंद्यानें सरकारकडे संरक्षणाची मागणी केली. 'डोळस संरक्षणा'चें जें धोरण स्वीकारण्यांत आलें होतें त्याची

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखसमृद्धीचें जावो!

## दि इसलांपूर अर्बन को. बँक लिमिटेड

इसलांपूर ( जि. द. सातारा )

( स्थापना १९३५ )



| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | २५,९७५ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १०,९१३ |
| खेळतें भांडवल | रु. | १,९७,२६६ |

सेक्रेटरी. कृ. द. बोरकर

चेअरमन. गो. ल. फडणीस, बी. ए., एलएल. बी.,

---

आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस नवीन वर्ष सुखाचें जावो।

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

( जि. उत्तर सातारा )

स्थापना १४ जानेवारी, १९१७] [फोन नं. ४३

सतत १५ वर्षांच्यावर 'अ' वर्गात असलेली कराड शहरांतील जुनी बँक

चेअरमनः—श्री. विश्वनाथ कृष्णराव तांबवेकर, B. A., LL. B.

| | | |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | रु. | २८,४३,६०० |
| ठेवी | रु. | २१,७४,७०० |
| भाग भांडवल व रिझर्व फंड | रु. | २,८७,८०० |
| इतर फंडस् | रु. | ३,१९,६०० |

तिजोरी-घरांत मौल्यवान वस्तू ठेवण्याची अद्यावत् सोय, ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर, 'स्वल्प संचय' ठेवीची नवीनच केलेल्या योजनेची अल्पावधीतच झालेली लोकप्रियता, हींच या बँकेचीं आकर्षणें आहेत. शिवाय, इतर सर्व बँकिंगचे व्यवहार सभासदांच्या व हितचिंतकांच्या समाधानास पात्र झालेले आहेत. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

कराड, 11—10—1957 शं. पु. कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर.

---

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

जिल्हा : दक्षिण सातारा.

स्थापना सन १९३५ फोन नं. ५३ } हेड ऑफिस :—हरभट रोड, सांगली. शाखा :—माधवनगर ( द. सातारा )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,०००·०० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,७७,८७०·०० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १,१९,२४१·१८ |
| इतर फंडस् | रु. | १,६५,७७८·०१ |
| ठेवी | रु. | ३४,११,११५·११ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ४४,८१,८४८·९८ |

—: व्यवस्थापक मंडळ :—

श्री. वामन विष्णु वाटवे, बी. ए., एलएल. बी.

श्री. गणेश काशिनाथ वांडेकर, डी. एम्. ई. ई., कारखानदार.

श्री. रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी उदगांवकर, जमीनदार.

श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे, व्यापारी

श्री. विष्णू हरी माईणकर, बी. एससी., एलएल. बी.

श्री. गंगाधर गोविंद विनीवाले.

श्री. महादेव हरी गोडबोले, बी. ए., एलएल. बी.

श्री. ज्ञानोबा आप्पाजी येडके, जमीनदार.

श्री. लक्ष्मण दत्तात्रय भिडे, जमीनदार.

अल्प भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर मिळण्याची सोय आहे. बचतनिधी वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर.

---

## श्री वीरशैव को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

हेड ऑफिस—कोल्हापूर] स्थापना १९४२ [ब्रँच ऑफिस—गडहिंग्लज

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | १,२५,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,१५,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु. | ६१,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | ७,४७,९८८ |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | ४९,९४२ |

(१) " समाजवादी समाजरचनेचें अंतिम ध्येय ठरवून आपल्या भारतांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेद्वारें नियोजित अर्थव्यवस्थेनें जें महान् राष्ट्रसंवर्धनाचें कार्य चाललें आहे त्यांत आपल्या परीनें सभासदांत सहकार्य वाढवून राष्ट्राच्या अंगीकृत कार्यांत बँक सक्रिय साहाय्य करीत आहे.."

(२) अद्यावत् बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

(३) आकर्षक व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारून माफक व्याजानें सर्व जमातींतील बांधवांना लहान मुदतीचीं तारण कर्जें दिलीं जातात.

(४) मुंबई राज्यांतील सर्व व्यापारी पेठेवरील ड्राफ्ट्स दिले जातात.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) मे. एम्. बी. चौगुले (अध्यक्ष) (२) मे. एस. व्ही. नष्टे (उपाध्यक्ष)

(३) मे. के. एस. करंचळी (४) मे. डॉ. एस. एस. घाळी

(५) मे. व्ही. एस. डोईजल (६) मे. एस. एन्. मिश्रकोटी

(७) मे. डी. बी. सोत (८) मे. सी. जी. हंशेटी

(९) मे. एस. ए. देसाई (१०) मे. जी. व्ही. वाली

मे. सी. एन्. आजरी ( चेअरमन ब्रँच-सल्लागार मंडळ )

श्री. एम्. जी. जोटकर, B. A. (HONS), मॅनेजर. मे. महादेव बाळाप्पा चौगुले, प्रेसिडेंट.

ही पहिलीच कसोटी होती. १९२४ सालीं टॅरीफ बोर्डानें चौकशी केली आणि त्यानें केलेल्या शिफारसीप्रमाणें परदेशांतील पोलादावर थोडीशी संरक्षणात्मक जकात वसविण्यांत आली. तिची मुदत तीन वर्षांची होती. पण परदेशाच्या पोलादाच्या किंमतींत एकदम बरीच घट झाली आणि जकातीचा फारसा उपयोग झाला नाहीं. टॅरीफ बोर्डानें जकातीच्या दरांत वाढ करण्याची शिफारस केली; पण सरकारनें ती मानली नाहीं. नंतर प्रत्येक एक टनाच्या पोलादाच्या ठोकळ्यामागें २० रुपये मदत देण्यांत येऊं लागली. पुढें तीहि कमी करण्यांत आली. अशा अडचणी असतांनासुद्धा कंपनीनें उत्पादन वाढविलें आणि कामगारांची कार्यक्षमता सुधारली. तंत्रज्ञांच्या जागांवर हिंदी लोकांची नेमणूक केली. कामगारांना पगारवाढीबरोबरच राहण्याच्या जागेच्या व इतर सोयी करून दिल्या. १९२७ सालीं टॅरीफ बोर्डानें पुन्हा चौकशी केली आणि मदतीची पद्धत बंद करून संरक्षण जकातीची नवी सप्तवार्षिक श्रेणी घालून दिली. मात्र ब्रिटनहून आलेलें पोलाद व इतर ठिकाणांहून आलेलें पोलाद ह्यावरील जकातींत फरक ठेवण्यांत आला होता. ह्याच सुमारास १९२९ सालची मंदी आली. तिचा सर्वच उद्योगधंद्याप्रमाणें टाटा कंपनीवरहि परिणाम झाला. कंपनीला कारभारांत काटकसर करणें भाग पडलें. पण ही काटकसर करतांना कंपनीनें बेकारी येऊं दिली नाहीं. नोकरीवरून कोणालाच कमी करण्यांत आलें नाहीं. उलटपक्षीं, कंपनीच्या नोकरांनींहि ह्या काटकसरीला हातभार लावून आपल्या पगारांत दोन वेळां स्वेच्छेनें कपात करून घेतली. भागीदारांनाहि कित्येक वर्षें आपल्या ऑर्डिनरी भागावरील नफा मिळाला नाहीं.

## उत्पादनाची वाढ

१९३४ सालीं पोलादाच्या धंद्याला ७ वर्षांपुरतें संरक्षण देण्यांत आलें. त्यावेळीं तो आपल्या पायावर स्थिर झाला होता. १९२४ ते १९३९ ह्या काळांत भारतामधील पोलादाच्या ग्राहकांनीं एरवीं दिलें असतें त्यापेक्षा ह्या धंद्याला ११ कोटी रुपये जास्त दिले होते. ह्याला कारण अर्थातच संरक्षण जकात होती. पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, पोलादाच्या निर्यात किंमती लक्षांत घेतां भारतामधील ग्राहकांना पोलादासाठी द्याव्या लागणाऱ्या किंमतींत दरसाल ४० कोटी रुपयांची बचत कित्येक वर्षें झाली. १९२३ सालीं प्रथम संरक्षण मिळालें त्यावेळीं टाटा कारखान्याचें उत्पादन १,५६,००० टन होतें. १९२७ सालच्या सुमारास तें ५,३०,००० टनापर्यंत आलें. नंतरच्या सात वर्षांत उत्पादनांत दरसाल वाढ होत गेली आणि १९३४ सालीं तें ८,३४,००० टन इतकें होऊं लागलें. त्यामुळें पोलादाच्या आयातींत कपात करतां येणें शक्य झालें. १९२७–२८ सालीं देशाच्या गरजेपैकीं ७५ टक्के पोलाद आयात करावें लागे. १९३२ सालीं ३८ टक्के पोलाद आयात करून भागूं लागलें. १९३५–३६ सालीं कंपनीनें ऑर्डिनरी भागावरील नफावांटणी पुन्हा चालू केली. पण त्याहिपूर्वीं कामगारांना नफ्यांतून खास बोनस देण्याचें ठरविण्यांत आलें. दरवर्षी होणाऱ्या नफ्याप्रमाणें कमीजास्त बोनस देण्याची पद्धत चालू ठेवण्यांत आली; व १९३० सालीं नफ्यांतील कामगारांचा वाटा पद्धतशीरपणें ठरविण्यांत येऊं लागला. युद्धपूर्व काळांत उत्पादनाची वाढ तर झपाट्यानें करण्यांत आलीच, पण त्याशिवाय धातुविषयक संशोधन, तांत्रिक शिक्षण आणि कामगारवर्गाच्या नोकरीच्या अटी, ह्या गोष्टींकडेहि लक्ष पुरविण्यांत आलें. जमशेटपूर येथें स्थापन करण्यांत आलेल्या कंट्रोल अँड रिसर्च लॅबोरेटरीज ह्या संस्थेनें केलेल्या संशोधनामुळें विशेष प्रकारचें पोलाद तयार करण्यास मदत झाली. हौरा येथें बांधण्यांत आलेल्या पुलाच्या पोलादाचें कंत्राट ह्या संशोधनामुळेंच कंपनीला मिळूं शकलें. हें काम मिळवितांना कंपनीला ब्रिटन, जर्मनी व अमेरिका ह्या देशांतील पोलाद कारखान्यांच्या स्पर्धेला तोंड द्यावें लागलें होतें. हौरा येथील पुलाखेरीज ब्रह्मदेशांतील इरावती नदीवरील पुलाचें पोलाद आणि रंगूनजवळील पाण्याचे पोलादाचे नळ ह्यांचा पुरवठाहि कंपनीनें केला.

## कल्याणकारी गोष्टींत पुढाकार

१९२१ सालीं कंपनीनें जमशेटपूर टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. हिंदी लोकांना तांत्रिक शिक्षण देऊन तरबेज करण्याचें संस्थापकांचें स्वप्न साकार करण्यासाठी तिची स्थापना करण्यांत आली. ह्या संस्थेंतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तंत्रज्ञांनीं पोलादाचा कारखाना तर चालविला आहेच; पण इतर उद्योगधंद्यांना व रुरकेला येथील हिंदुस्थान स्टील वर्क्स ह्या कारखान्याला लागणारा तंत्रज्ञ नोकरवर्गहि शिकवून तयार केला आहे. १९२० च्या सुमारास कंपनीच्या नोकरवर्गात २५० परदेशी तज्ज्ञ होते. आतां त्यांची संख्या अवघी ६ आहे. १९१२ सालीं कंपनीनें ८ तासांचा कामाचा दिवस सुरू केला. त्यावेळीं ही कल्पना युरोप अगर अमेरिकेंतहि मान्यता पावलेली नव्हती.. १९२९ सालीं पगारी रजेची प्रथा सुरू करण्यांत आली. त्यावेळीं ती इंग्लंड अगर अमेरिका ह्या देशांतहि नव्हती. १९२० सालीं कामगारांसाठी प्रॉव्हिडंट फंड योजना सुरू करण्यांत आली. तीहि इंग्लंडमध्यें नव्हती. खुद्द भारतांत १९५२ सालीं प्रॉव्हिडंट फंडाचा कायदा करण्यांत आला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत कंपनीच्या यंत्रसामुग्रीची खूपच झीज झालेली होती. युद्धानंतर ती भरून काढण्यासाठी नव्या साहित्याची गरज भासूं लागली. १९४६ सालीं कंपनीनें एंजिनिअरिंगच्या एका अमेरिकन सल्लागार कंपनीची मदत घेऊन उत्पादन वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचें काम तिजकडे सोंपविलें. एंजिनिअरांचा अहवाल आल्यावर असें दिसून आलें कीं, त्यांच्या शिफारसी अंमलांत आणण्यासाठी जरूर असलेला पैसा कंपनीजवळ नव्हता. त्यामुळें हें काम लांबणीवर टाकण्यांत आलें.

## आधुनिकीकरण

अखेर १९५१ सालीं कारखान्याचें आधुनिकीकरण करण्याचा व नवीन यंत्रसामुग्री बसविण्याचा कार्यक्रम हातीं घेणें शक्य झालें. जुनी व झिजलेली यंत्रसामुग्री काढून तिच्या जागीं नवीन बसविणें आणि पोलादाचें उत्पादन १० लाख टनांवरून १३ लाख टनांपर्यंत वाढविणें, एवढाच मर्यादित कार्यक्रम आंखण्यांत आला होता. त्याशिवाय उत्पादनांत कांहीं विविधता आणण्याचाहि हेतु होता. तरीपण एकंदरीनें पाहतां, अधिक मोठी विस्ताराची योजना हातीं घेण्यापूर्वीची तात्पुरती योजना असेंच ह्या कार्यक्रमाचें स्वरूप होतें. ह्याच वेळीं भारत सरकारनें टाटा कंपनीला आणि इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनीला आपआपल्या विस्ताराच्या प्रमुख योजना हातीं घेण्यास परवानगी दिली. टाटा कंपनीच्या विस्तार-योजनेचें बरेचसें प्राथमिक काम झालेलें असल्यामुळें कांहीं महिन्यांच्या अवधींतच, १९५५ च्या डिसेंबरमध्यें २० लाख टन उत्पादनाची योजना वाटचाल करूं लागली. अमेरिकेंतील कैसर एंजिनिअरिंग कंपनीशीं करार करण्यांत आला. युद्धकाळांत ह्या कंपनीची कार्यक्षमता व झटपट काम करण्याची पद्धति चांगलीच प्रशंसा पावलेली होती. करारांतील अटींप्रमाणें कंपनीनें

विस्ताराची योजना २॥ वर्षांच्या अवधींत पूर्ण करावयाची आहे. तथापि, अथपासून इतिपर्यंत सर्वच योजना कंपनीकडून पार पाडण्यांत यावयाची नव्हती. विविध प्रकारचें कितीतरी यंत्र-साहित्य ब्रिटन, अमेरिका, पूर्व जर्मनी, जपान, चेकोस्लोव्हाकिआ, इटली, इत्यादि देशांतील कारखान्यांकडून टेंडर्स मागवून आणण्यांत यावयाचें आहे. विस्ताराच्या योजनेसाठी एकूण १३ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. करारावर सह्या झाल्याबरोबर पैशाची व्यवस्था मुकर करण्यांत आली. भारत सरकारनें पोलादाच्या किंमती वाढवून दिल्या. मात्र किंमतींतील वाढाव्याचें उत्पन्न कर वजा जातां विस्ताराच्या कामींच वापरण्यांत आलें पाहिजे, अशी स्पष्ट अट घालण्यांत आली. वाढवून दिलेल्या किंमतीमुळें ५ वर्षांच्या काळांत कंपनीला २० कोटी रुपये मिळतील असा अंदाज करण्यांत आला आहे. नवीन भांडवल विक्रीला काढून १३·५ कोटी रु. उभारण्याचें ठरलें. जागतिक बँकेनें योजनेंतील परदेशीय हुंडणावळीची गरज भागविण्यासाठी ७·५ कोटी डॉलर्स म्हणजे सुमारें ३६ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें. विस्ताराच्या योजनेंत कच्च्या मालाच्या पुरवठ्यापासून पक्का माल तयार होईपर्यंतच्या सर्वच अवस्थांत आमूलाग्र सुधारणा करण्यांत येणार आहे. सध्यां ह्या योजनेंत १०,००० हिंदी लोक आणि ९० अमेरिकन विशेषज्ञ खपत आहेत. जी गोष्ट भारतांत मिळूं शकेल तिच्या जागीं परदेशांतील वस्तु आयात करावयाची नाहीं, असें धोरण ठरलें आहे. हें धोरण योजनेचा विशेष आहे.

### कंपनीच्या यशास कारण झालेले थोर लोक

आज टाटा कंपनी ही भारताच्या उद्योगकुटुंबांत सर्वांत वडील बंधूसारखी आहे. तिचें हें स्थान निरनिराळ्या क्षेत्रांतील ज्या बुद्धिमान् माणसांनीं तिच्यासाठी कष्ट घेतले त्यांच्यामुळें प्राप्त झालेलें आहे. सर दोराबजी टाटा, सर आर. डी. टाटा व श्री. बी. जे. पातशहा ह्यांसारख्या महान् व्यक्ती कंपनीच्या बोर्डावर होत्या. त्यांनीं कंपनी स्थापण्याच्या कामीं, सुरवातीच्या अडचणीच्या काळांत तिचें मार्गदर्शन करण्याच्या कामीं, व पहिल्या महायुद्धानंतर आलेल्या अरिष्टाला तोंड देण्याच्या कामीं अमोल सेवा बजावली. ह्या मंडळींशिवाय श्री. शापुरजी सकलातवाला, सर पुरुषोत्तम ठाकूरदास, सर अरदेशीर दलाल, डॉ. जॉन मथाई, इत्यादि ख्यातनाम व्यक्तींच्या कर्तबगारीचाहि कंपनीला लाभ झाला. सर एम्. विश्वेश्वर अय्या ह्यांचा व कंपनीचा संबंध तर उणापुरा तीस वर्षांचा आहे. सर विश्वेश्वर अय्या ह्यांच्यामुळें कंपनींत तांत्रिक ज्ञानाची एक परंपराच स्थापन केली गेली. आजहि उच्च तांत्रिक ज्ञानाची ही परंपरा सर जहांगीर गांधी आणि श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांच्या कंपनीशीं असलेल्या निकट-च्या संबंधामुळें पुढें चालविली जात आहे. श्री. जे. आर. डी. टाटा हे कंपनीचे अध्यक्ष व सर जहांगिर गांधी हे खास डायरेक्टर आहेत. गेल्या पन्नास वर्षांत कंपनींत अनेक नामवंत तंत्रज्ञांनीं कामें केलीं. त्यांपैकी मि. सी. पी. पेरिन हे धातुशास्त्रज्ञ होते. मि. सी. एम्. वेल्ड व श्री. श्रीनिवास राव हे भूगर्भशास्त्रज्ञ होते. श्री. पी. एन्. बोस ह्यांनीं केलेल्या भूगर्भीय पाहणीचें काम मूलभूत महत्त्वाचें होतें. त्यांच्या अहवालामुळेंच मध्यप्रदेशांतील द्रुग जिल्ह्यांतील 'धाली–राजहारा' लोखंडाच्या खाणींचा शोध लावणें सुलभ झालें.

### जमशेटपूर

कंपनींत काम करणारीं सामान्य माणसें आणि त्यांच्यावर अवलंबून असणारीं माणसें ह्यांच्या दृष्टीनें कंपनीच्या यशाचें खरें गमक कोणतें म्हणून विचारलें तर जमशेटपूर हें शहर असें उत्तर यावें लागेल. ह्या शहरांत २ लाख, ३० हजार लोक वस्ती करून आहेत. भारतामधील सुखसोयींनीं युक्त अशा प्रमुख शहरांत जमशेटपूरची गणना होते. शहरवासीयांना शुद्ध पाण्याचा पुरवठा मोफत केला जातो. वीज युनिटला अर्धा आणा ह्या दरानें पुरविण्यांत येते. बालमृत्यूंचें अल्पप्रमाण आणि भारता-मधील आयुष्याच्या सरासरीपेक्षा दीर्घायुषी माणसें ह्या गोष्टींवरून तेथील आरोग्यविषयक व वैद्यकीय सोयींची कल्पना येते. थोडक्यांत म्हणजे, एक छोटेंसें कल्याणकारी राज्य म्हणजे जम-शेटपूर असें म्हणतां येईल. जमशेटपूरला कंपनीच्या पैशाचा हक्कानें उपयोग होत असला तर कंपनीच्या नफ्यांतून देण्यांत येणाऱ्या मोठ्या देणग्यांच्या रूपानें सर्व भारतालाहि तिच्या पैशाचा लाभ होतो. हल्लींचें युग स्वयंचलित यंत्रसामुग्रीचें, अणुशक्तीचें, शास्त्रीय शोधांचें आणि सामाजिक वैद्यकीय सुखसोयींचें गणलें जातें. ह्या युगाची पायाभरणी करण्याच्या कामीं इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आणि मूलभूत शास्त्रीय संशोधन करणाऱ्या टाटा कंपनीनें स्थापन केलेल्या संस्था ह्यांनीं महत्त्वाची कामगिरी केलेली आहे; ती सहज विसरतां येण्यासारखी नाहीं.

चालू दिपावली व नूतन वर्ष सर्व भारतीयांना सुखाचें जावो.

**वामन गणेश हरचेकर प्रायव्हेट लि.**

सोनें, चांदी, मोतीं, आणि जवाहिराचे व्यापारी.
एन्. सी. केळकर रोड, मुंबई नं. २८
टेलिफोन ६०४२८

आमचे पेढीवर लेटेस्ट डिझाइनचे नेकलेस, नवीन प्रकारचे हार, मोत्यांचीं कुडीं, नथी, बांगड्या, तनमणी, लफ्फा, वगैरे माल खात्रीचा तयार असतो आणि ऑर्डरप्रमाणें वक्तशीर तयार करून मिळतो.

बाहेरगांवच्या ऑर्डर्स व्ही. पी. नें रवाना केल्या जातात.

शेती व ग्रामीण जीवन यांस वाहिलेलें बहारदार

किरकोळ अंक १० आणे ] मासिक **बहर** [ वार्षिक वर्गणी ६ रुपये

दरमहा १ तारखेस प्रसिद्ध होतें

पिकें, खतें, पाणी-पुरवठा, पिकांवरील रोग व कीटक इत्यादि माहितीबरोबरच विश्वास ठेवा अगर ठेवूं नका, संशोधनाची घोडदौड, फायदा व न्यायालय, बंगल्याभोंवतीं बागबगीचा, परदेशांतील शेती, संस्था परिचय, इत्यादि माहितीपूर्ण व मनोरंजक सदरें.

आजच वर्गणीदार व्हा.

बहर मासिक, ५८९ सदाशिव पेठ, पुणें २

# जर्मनीची औद्योगिक ज्योत तेवत ठेवणारें 'क्रुप' घराणें

## दोन महायुद्धांतील पराभवानंतरहि जर्मनी पुनः डोकें वर कसें काढूं शकला ?

१९ सप्टेंबर, १९५७ रोजीं ब्रिटिश सरकारनें बँकरेट २% नें वाढवून ७% केला. उलटपक्षीं, पश्चिम जर्मनीनें तेथील बँकरेट १८ सप्टेंबर रोजींच अर्ध्या टक्क्यानें कमी केला. आंतरराष्ट्रीय नाणें निधीच्या बैठकीपुढें भाषण करतांना पश्चिम जर्मनीच्या प्रतिनिधीनें खुद्द जर्मनींतच भांडवलाचा तुटवडा असल्यानें अविकसित देशांना जर्मनी भांडवल पुरवूं शकणार नाहीं असें सांगितलें. भांडवलाचा पुरवठा अपुरा असतांना बँकरेट उतरविण्याची किमया जर्मनी कशी करूं शकला ? जर्मनीच्या उद्योगधंद्यांचें पुनरुत्थापन, त्यांचें वाढतें उत्पादन व वाढती निर्यात ह्यांच्यामुळें जर्मन मार्क हें जगांतील एक बळकट चलन झालेलें आहे. खुद्द जागतिक बँकेनेंहि जर्मनीच्या मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेतलेलें आहे. जर्मनीच्या आर्थिक उत्कर्षांत क्रुप कंपनीनें केलेल्या गौरवास्पद कामगिरीची कल्पना ह्या लेखावरून येईल.

दिल्ली येथें दोन वर्षांपूर्वी भरलेल्या प्रचंड औद्योगिक प्रदर्शनांत क्रुप ह्या सुप्रसिद्ध जर्मन औद्योगिक संघटनेनें भाग घेतला होता. उत्कृष्ट दर्जा व काम ह्याबद्दल गेलीं १५० वर्षें 'क्रुप' हें नांव सुप्रसिद्ध आहे. उत्पादनाबरोबर संशोधनाच्या कामींहि क्रुपनें महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. त्या सर्वांचा फायदा जगांतील सर्व देशांच्या प्रगतीस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें झालेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर रशिआ व अमेरिका ह्यांच्यामधील स्पर्धेचा व अविश्वासाचा फायदा क्रुपला मिळाला व क्रुपच्या फर्मचें पुनरुज्जीवन होऊन तिला पुनः जागतिक पुढारीपण प्राप्त झालें आहे. क्रुप साम्राज्याच्या पुनरुज्जीवनाची माहिती येथें थोडक्यांत देण्यांत आली आहे; वाचकांना ती उद्बोधक व उत्साहक वाटेल.

### कारखान्यांचें पुनरुज्जीवन

जर्मनीच्या शत्रूंच्या बॉंबफेक्या विमानांनीं अपुरें ठेवलेलें, क्रुप कारखान्याची उत्पादनक्षमता संपूर्णपणें नष्ट करण्याचें काम बारा वर्षांपूर्वी जेत्यांनीं पुरें करण्याचा चंग बांधला होता. पण आतां त्या कारखान्याचें उत्पादन जोरांत चालूं आहे. गेल्या वर्षीं त्या कारखान्यांनीं सुमारें १२५ कोटी रुपये किंमतीच्या मालाचें उत्पादन केलें. वेसर नदीच्या तीरावर टँकर्सचें उत्पादन, एसन् ट्रक्स व रेल्वे एंजिनें ह्यांची निर्मिति आणि भारतांत पोलादाचें उत्पादन अशा कितीतरी विविध प्रकारच्या व्यवसायांत मिळून क्रुपनें ४,००,००० कामगारांना काम दिलेलें आहे. दारूगोळ्याचें उत्पादन पुनः हातीं घेण्याचा क्रुपचा विचार नाहीं. कारण " आतां इतरत्र ॲटम बॉंबचें उत्पादन चालूं झालें असतांना दारूगोळ्याचें उत्पादन सुरू करणें अव्यवहार्य होईल. "

### विविध कामगिरी

जगांतील अविकसित राष्ट्रांच्या औद्योगिक प्रगतीस क्रुपचे कारखाने बहुमोल साहाय्य करीत आहेत. आशिआ, आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि इतर ठिकाणचे अविकसित प्रदेश ह्यांना ते कारखानदारीला उपयुक्त असा माल तर पुरवितातच; पण त्याबरोबरच इंजिनिअरिंगविषयक तांत्रिक ज्ञानहि विकत असतात. इतक्या पद्धतशीरपणें आपला व्याप दुसऱ्या कोणत्याहि युरोपियन देशानें वाढविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. त्यामुळें ग्रेट ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, इत्यादि देशांना क्रुपची स्पर्धा जाणवल्याविना राहणार नाहीं. ( १ ) १० लक्ष टनांचा पोलादाचा कारखाना व त्याची १,८०,००० वस्तीची वसाहत, ( २ ) पाकिस्तानांतील लोखंडाच्या खाणी चालवून तेथें पोलादाचा कारखाना स्थापणें, ( ३ ) लॅब्रेडॉरमध्यें लोखंडाच्या खाणी खणून देणें, ( ४ ) ग्रीसमध्यें निकलच्या खाणी चालवून त्याच्या शुद्धीचे कारखाने उभारणें, ( ५ ) युगोस्लाव्हिया, इजिप्त, एथिओपिया व सुदान ह्यांच्या औद्योगीकरणास हातभार लावणें, ( ६ ) अर्जेंटिनामध्यें रेल्वे एंजिनांचा कारखाना उभारणें, ( ७ ) जगांतील इतर भागांत अशाच प्रकारचे उपक्रम हातीं घेणें, इत्यादि क्रुपच्या परदेशांतील योजना आहेत. क्रुप नव्या क्षेत्रांतहि प्रवेश करीत आहे. प्लॅस्टिक्स व सिंथेटिक्सच्या उत्पादनपद्धतीचें अमेरिकन पेटंट त्यानें विकत घेतलें आहे. जेत्या राष्ट्रांनीं क्रुपला पोलादाच्या बाबतींत संशोधन चालूं ठेवण्यास बंदी केली, तेव्हां त्यानें आपल्या संशोधकांना नवें काम दिलें. आज माहीत नसलेल्या, पण पुढें महत्त्व पावणाऱ्या धातूंच्या उत्पादनास कोण बंदी करूं शकणार ? लवकरच क्रुप हेलिकॉप्टर्सचें उत्पादन सुरू करणार आहे, अशी बोलवा आहे. बारा वर्षांपूर्वी क्रुपचे कारखाने उध्वस्त झाले होते; आज ते पुनः जागतिक पुढारीपण मिळविण्यास सुसज्ज झाले आहेत.

### जागतिक पुढारीपण

युद्धसमाप्तीनंतर क्रुप व त्याचे साहाय्यक ह्यांच्यावर खटले भरण्यांत आले होते व कामगारांकडून गुलामी पद्धतीनें कामें करून घेतल्याबद्दल त्यांना दोषी ठरविण्यांत आलें होतें. न्युरेंबुर्ग न्यायालयानें क्रुपची सर्व मालमत्ता अलाइड कंट्रोल कौन्सिलच्या नांवें जप्त केली होती. पण मागाहून लक्षांत आलें, कीं त्यामुळें ह्या मालमत्तेंत रशियाला एकचतुर्थांश वांटा मिळेल! अमेरिकेचे लष्करी गव्हर्नर, जनरल क्ले ह्यांनीं हा निवाडा तत्परतेनें फिरवून टाकला. पुढें क्रुपला त्याची मालमत्ता परत देण्यांत आली. मात्र कोळसा व पोलाद ह्यासंबंधींतील मालमत्तेपासून त्याची फारकत करण्यांत आली व लोखंड, पोलाद अथवा कोळसा ह्याविषयक कोणत्याहि उपक्रमांत भाग घेण्यास त्याला बंदी करण्यांत आली. ही बंदी किती काळ ठेवावयाची, हें पश्चिम जर्मन सरकारनें ठरवावयाचें होतें.

हेर क्रुप फोन बोलेन ह्यानें आपल्या कोळशाच्या कांहीं खाणी विकून टाकल्या आहेत. त्याचे त्याला सुमारें १२ कोटी रुपये मिळाले. पश्चिम जर्मनींत रोकड रकमेची फारच टंचाई असतांना क्रुपला एवढें मोठें रोख भांडवल हाताशीं आलें त्याचा त्याच्या औद्योगिक पुनर्घटनेस खूपच फायदा झाला. त्याच्या कोळशाच्या खाणी व लोखंड-पोलादाचे कारखाने ह्यांची व्यवस्था विश्वस्तांमार्फत पाहिली जाते. ड्यूसबर्ग येथील ऱ्हाइन हॉसेन ह्या

पोलादाच्या कारखान्याची वार्षिक उत्पादनशक्ति १८,००,००० टन एवढी प्रचंड आहे. हेर क्रुपला त्यांचें उत्पन्न मिळतें, पण त्यांच्या व्यवस्थेत त्याला हात नाहीं.

हेर फोन बोलेनूचें वय ५० वर्षांचें आहे. तोच ह्या औद्योगिक साम्राज्याचा प्रमुख आहे. त्याच्या साहाय्यकांत जर्मनींतील प्रमुख उद्योगपतींची गणना होते. 'मोनोरेल' म्हणजे एकरुळी आगगाड्यांचे मार्ग अविकसित प्रदेशांतील वहातुकीस फार सोईचे होतील व त्यांतील खनिजें व इतर संपत्ति उपयोगांत आणतां येईल, ह्या दृष्टीनें क्रुपचे प्रयत्न चालू आहेत. त्यास ॲक्झेल वेनेर-ग्रेन ह्या स्वीडिश कोट्यधीशांचा सक्रिय पाठिंबा आहे.

### क्रुप : युरोपांतील सर्वांत श्रीमंत मनुष्य

क्रुपची फर्म ही खासगी मालकीची फर्म आहे. त्यांत भागीदार नाहींत. त्यामुळें फर्मचे वार्षिक हिशेब प्रसिद्ध करण्याची क्रुपवर जबाबदारी नाहीं. इंजिनांचा कारखाना, फाउंड्री, फोर्जेस, यंत्रसामुग्रीचे कारखाने, पोलादनिर्मितीचे कारखाने, पुलांचें उत्पादन, खाणकामाच्या यंत्रांचें उत्पादन, रेल्वेच्या सामुग्रीचें उत्पादन, डिझेल मोटर ट्रक्स, खणण्याची व बांधकामाची सामुग्री, कृत्रिम इंजनांचें उत्पादन, इत्यादींचा क्रुपच्या कारखानदारीशीं निकटचा संबंध आहे. विक्री आणि निर्गत ह्यांची व्यवस्था, एसेन येथें १५,००० बिऱ्हाडांची रहाण्याची व्यवस्था, हॉटेल्स, अनेक शाखा असलेले स्टोअर्स, इस्पितळें, विमा-फर्म, इत्यादींचाहि क्रुपच्या साम्राज्यांत अंतर्भाव होतो. क्रुपच्या मालमत्तेची किंमत किती असेल ह्याविषयीं अनेक अंदाज करण्यांत आले आहेत. एवढें खरें कीं, तो युरोपांतील सर्वांत श्रीमंत मनुष्य आहे. त्याबरोबरच त्यानें कित्येक जबाबदाऱ्याहि पत्करलेल्या आहेत. उदाहरणार्थ, क्रुप १५,३०० पेन्शनर कामगारांचा चरितार्थ चालवीत आहे. दोन वर्षांपूर्वी त्यानें आपण होऊन कामगारांना दीड कोटी रुपये बक्षिस दिले आणि सरकारला तो दरसाल ६ कोटी रुपये कर भरीत असतो.

युद्धोत्तर काळांत क्रुपनें इंजिनिआरिंगविषयक सल्ला देण्याचें मोठेंच खातें सुरू केलें आहे. कित्येक राष्ट्रें त्याचा सल्ला विचारतात व तो देण्याचा त्याचा मोठा व्यवसायच बनला आहे. परराष्ट्रांतील औद्योगिक योजनांसाठी त्यानें एक स्वतंत्र कचेरीच खोलली आहे. जगांतील सर्व देशांतील बाजारपेठांतून व प्रदर्शनांतून क्रुपच्या निशाणीस मानाचें स्थान मिळालें आहे.

क्रुपनें पूर्वी दारूगोळ्यांची निर्मिति केली म्हणून त्याच्या चालकांना मुळींच विषाद वाटत नाहीं. व्हिकर्स, आर्मस्ट्राँग्ज, श्नायडर क्रासो, इत्यादि फर्म्सनींहि नाहींका तोफा, टँक्स व इतर शस्त्रास्त्रें तयार केलीं? असें क्रुपचे संचालक मार्मिकपणें विचारतात. जर्मनीचा पराभव झाला, एवढेंच.

हेर क्रुपनें त्याच्या कामगारांना उद्देशून नुकतेंच भाषण केलें, त्यांत सांगितलें, "तुम्हीं गेलीं कांहीं वर्षे माझ्याशीं जें सहकार्य केलें, त्याचा सुपरिणाम दिसूं लागला आहे. आपण आपला माल जागतिक बाजारपेठांतून पुनः मांडूं शकलों आहों. त्यामुळें आपल्या फर्मकडे जगाचे डोळे लागून राहिले आहेत. आपल्या फर्मचें महत्त्व आणखी वाढविण्यासाठी आपण जर्मनी व जर्मनीबाहेरची जनता ह्यांकडे पूर्वीपेक्षा अधिक लक्ष पुरविलें पाहिजे." उद्योगपतींचें पूर्वीच्या पद्धतीचें ऐश्वर्य ह्यापुढें डोळ्यांत खुपल्याविना राहणार नाहीं, हें जाणून १०२ खोल्यांच्या आपल्या वडिलोपार्जित प्रचंड निवासस्थानांत हेर क्रुपनें राहणें सोडून दिलें


दिवाळीची भेट कॅश सर्टिफिकेटांच्या रूपानें द्या!

## दी जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

चीं ५½% दराचीं दशवार्षिक कॅश सर्टिफिकेटें आजच खरेदी करून आपली बचत अधिक सुरक्षित व फायदेशीर करा !!

सतरा वर्षांतील प्रगतीचे आंकडे

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. २,०४,२८० |
| सर्व प्रकारचे निधि | रु. २,४६,५८६ |
| सर्व प्रकारच्या ठेवी | रु. १८,०४,९०२ |
| सरकारी रोखे व शेअर्समधील गुंतवणूक | रु. ७,२४,८७३ |
| व्यवहारांतील गुंतवणूक | रु. १०,८२,९४९ |
| ऑडिट वर्ग | 'अ'. |

मध्यवस्तींत स्वतःच्या मालकीची भव्य इमारत !
सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्कृष्ट सोय !
—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

श्री. म. अथणी, चेअरमन. म. द. खाडिलकर, मॅनेजर.



## दि बेळगांव बँक लिमिटेड, बेळगांव

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना १९३० इ.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | रु. १,८८,००० |
| एकूण ठेवी | रु. १ कोटी १३ लाखांचेवर |
| खेळतें भांडवल | रु. १ कोटी ४० लाखांचेवर |

खालीं नमूद केलेल्या वाढलेल्या व्याजाचे दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात. :—

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | — | द. द. शें. ३ टक्के |
| ३ " " | — | " ३। " |
| ४ " " | — | " ३॥ " |
| ५ " " | — | " ४ " |
| सेव्हिंग्ज बँक | — | " २ " |
| होम सेव्हिंग्ज बँक | — | " २॥ " |
| पंचवार्षिक कॅश सर्टिफिकेट्स् | | " ४ " |

दरमहा नियमित बचत करणाऱ्यांसाठी—"क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट"ची नवीन व आकर्षक योजना १ आक्टोबर १९५७पासून सुरू करण्यांत आली आहे. या योजनेप्रमाणें, १, २, ३ व ४ वर्षांच्या ठेवी दरमहा ठराविक हप्त्यानें स्वीकारण्यांत येतात.

खेरीज "शॉर्ट टर्म" व "कॉल डिपॉझिट्स्" देखील अत्यंत आकर्षक व्याजानें स्वीकारण्यांत येतात.

नुकतीच बँकेची २५ वी शाखा गोकाक फॉल्स, जिल्हा बेळगांव, येथें उघडण्यांत आली आहे.

बँकेच्या बेळगांव येथील मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्यावत् अशा सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

रविवार पेठ, बेळगांव. एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर.

आहे. त्या निवासस्थानाचें आतां एसेन शहरवासियांसाठी एका प्रचंड म्युझियममध्यें रूपांतर करण्यांत आलें आहे.

## क्रुपचा ५० वा वाढदिवस

युरोपमधील किंवा कदाचित् जगांतील सर्वांत श्रीमंत अशा ह्या उद्योगपतींचा ५० वा वाढदिवस गेल्या ऑगस्ट महिन्यांत साजरा करण्यांत आला. वाढदिवसाच्या दिवशीं त्यांची ७१ वर्षांची वृद्ध माता बार्था त्यांना भेटली. त्यांच्या कुटुंबियांच्यातर्फे आलेल्या भेटींचा व अभिवादनाचा स्वीकार करून ते एसेन शहरांत सार्वजनिक समारंभासाठीं गेले. त्यांच्या औद्योगिक साम्राज्याचें हें केंद्र सर्वस्वीं त्यांनींच उभारलेलें आहे. समारंभाच्या निमित्तानें त्यांना एका संशोधनशाळेच्या किल्ल्या देण्यांत आल्या. ही शाळा त्यांच्या सहकाऱ्यांनीं भेट म्हणून त्यांच्या हवाली केली. तींत २०० शास्त्रज्ञ लवकरच काम करूं लागतील. बारा वर्षांपूर्वीं असला प्रसंग कल्पनेंतसुद्धा अशक्य वाटणारा होता. त्यावेळीं क्रुपचे कारखाने म्हणजे वेड्यावाकड्या पोलादाचें एक जंगल होतें. जर्मनीचे विजयी शत्रु उरलेसुरले कारखाने पाडून आपआपल्या देशांत नेत होते. खुद्द क्रुप आणि त्यांचे ११ सहकारी युद्धगुन्हेगार म्हणून तुरुंगांत होते. पण आज एसेनमधील व जर्मनीमधील त्यांचे कारखाने धडाक्यानें उत्पादन करीत आहेत. ऱ्हूरमधील त्यांच्या प्रासादतुल्य निवासस्थानीं राजांची, राज्यांच्या अध्यक्षांची व मंत्र्यांची, उद्योगपतींची, रीघ लागली आहे. ज्या अमेरिकेनें त्यांना युद्धांतील गुन्हेगार म्हणून अमेरिकेंत यावयास बंदी केली होती त्याच अमेरिकेनें त्यांना आतां अमेरिकेंत येण्यास परवानगी दिली आहे. क्रुपच्या नेतृत्वाखाली त्यांचें औद्योगिक साम्राज्य पुन्हा विस्तार पावत आहे. गेल्या वर्षीं त्यांच्या कारखान्यांनीं ७५·२ कोटी डॉलर्स किंमतीच्या मालाची विक्री केली. आज त्यांच्या ६९ कारखान्यांतून ९१,००० कामगार काम करीत आहेत. आणखी दोन वर्षें पुरतील एवढ्या मागण्या त्यांच्याकडे नोंदविलेल्या आहेत. क्रुपनें आपलें गेलेलें स्थान धाडस, निश्चय आणि श्रम ह्यांच्या जोरावर पुन्हा मिळविलें आहे. पश्चिम जर्मनी आज औद्योगिक दृष्ट्या जगांतलें ४ थ्या क्रमांकाचें राष्ट्र आहे. गेल्या वर्षीं जर्मनीनें १० लाखांपेक्षा अधिक मालवाहू मोटारी उत्पन्न केल्या आणि मोटारींच्या उत्पादनांत जगांतील दुसरा नंबर पटकावला. १९३८ सालीं हिटलरच्या जर्मनींत दरमहा पोलादाचें जितकें उत्पादन होत असे, त्याहिपेक्षा अधिक उत्पादन आतां होऊं लागलें आहे. जर्मनीनें गेल्या वर्षीं इतकी निर्यात केली कीं, त्याच्याजवळील सोनें व परदेशीय हुंडणावळ ह्यांचा निधि पौंडाच्या कक्षेंतील सर्व देशांच्या निधींच्या निम्मा झाला आहे ! पश्चिम जर्मनीमध्यें बेकारी इतर कोणत्याहि देशापेक्षा अगदीं कमी आहे. कामगारांचें वेतन वाढत आहे. जर्मन कामगारांनीं गेल्या वर्षी १,५७,००० नव्या मोटारी खरेदी केल्या. अन्नाचीं चंगळ आहे. मांसाच्या खपांत १९५० च्या मानानें ३० टक्के वाढ झालेली आहे. युरोपमध्यें जर्मन प्रवासी उन्हाळ्यांत प्रवासास निघतात त्यावेळीं पूर्वीं अमेरिकन हौशी प्रवासी ज्या बेदरकारपणानें दुर्लभ चलन खर्च करीत असत, त्याच बेदरकारपणानें तेहि दुर्लभ चलन खर्च करतात. जर्मनीच्या पुनरुत्थापनाला हजारों छोट्या व मध्यमप्रतीच्या उद्योगधंद्यांनीं हातभार लावलेला आहे. तथापि, क्रुपच्या घराण्यानें त्या सर्वांत प्रमुखत्वाची जागा मिळविली आहे. शस्त्रास्त्रांचे कारखानदार म्हणून घराण्याचें नांव जरी जर्मनीच्या लष्करशाहीशीं निगडित झालेलें असलें तरी त्यानें आपली औद्योगिक समृद्धि, रेल्वेचीं एंजिनें व औद्योगिक यंत्रसाहित्य ह्यांच्या निर्मितीनें साध्य केलेली आहे.

## घराण्याची औद्योगिक परंपरा

एसेन्‌मधील एक व्यापारी फ्रेडरिक क्रुप ह्यानें प्रथम जर्मनीमध्यें पोलाद् करण्याचा प्रयत्न केला. नेपोलिअन बोनापार्ट ह्यानें ब्रिटनची नाकेबंदी केल्यामुळें युरोपला ब्रिटनमधील उत्तम प्रतीचें पोलाद् मिळेनासें झालें होतें. फ्रेडरिक स्वतः वयाच्या चाळिसाव्या वर्षीं वारला व तोहि धंद्यांत अयशस्वी होऊन. त्याचा मुलगा अल्फ्रेड ह्यानें आपल्या बापाचें स्वप्न साकार करण्याचें ठरविलें. त्याला त्यांचे नातेवाईक 'मूर्ख' म्हणत असत. पण हा मूर्ख मुलगा वयाच्या १५ व्या वर्षीं ब्रिटनला गेला व उत्तम प्रतीचें पोलाद् करण्याचें कसब शिकून आला. परत आल्यावर त्यानें आपला मोडकातोडका कारखाना पुन्हा बांधला. लवकरच त्याला सर्व जगांतून पोलादासाठीं मागण्या येऊं लागल्या. प्रथम त्यानें आगगाड्यांचे रूळ तयार केले. नंतर पोलादाच्या तोफा ओतल्या. पण त्या कोणीच घेईना. अखेर जर्मन लष्करी पुढाऱ्यांना ब्राँझच्या त्यावेळच्या तोफांपेक्षा पोलादाच्या तोफा अधिक टिकाऊ, अचूक आणि डागण्यास सोप्या असल्याचें पटलें. ह्याच क्रुपच्या तोफांच्या साह्यानें जर्मनीनें ऑस्ट्रियाचा १८६६ सालीं व् फ्रान्सचा १८७१ सालीं पराभव केला. १८८७ च्या सुमारास क्रुपनें निरनिराळ्या २१ राष्ट्रांना २४,५६७ तोफा पुरविल्या. ह्या सुमारास तो 'अल्फ्रेड द् ग्रेट' ह्या नांवानें ओळखला जाऊं लागला. परदेशी त्याला 'कॅनन किंग' नांव पडलें. अल्फ्रेडच्या मुलाच्या १५ वर्षांच्या कारकीर्दींत, क्रुपच्या कारखान्यांतील कामगारांची संख्या ४३,००० पर्यंत आली होती. पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभीं क्रुपची कंपनी ही युरोपमधील सर्वांत मोठी होती. तीमधील कामगारांची संख्या ८२,५०० झाली होती. अल्फ्रेडची नात बार्था हिचें नांव देऊन क्रुपनें पहिल्या महायुद्धांतील सर्वांत मोठी तोफ ओतली. तिच्या साह्यानें जर्मन तोफखान्यानें ७५ मैलांवरून पॅरिसवर गोळे टाकले. युद्धानंतर दोस्त राष्ट्रांनीं क्रुपच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता अर्ध्यानें खच्ची केली, हजारों हत्यारांची व यंत्रांची मोडतोड केली. १९३२ सालीं हिटलरचा उदय झाल्यावर शस्त्रास्त्रांच्या उत्पादनास पुन्हा प्रारंभ करण्यांत आला.

## क्रुपला १२ वर्षें कैदेची शिक्षा

दुसऱ्या महायुद्धांत क्रुपच्या कारखान्यांत १,६०,००० कामगार खपत होते. जर्मनीचा पराभव झाल्यावर हेर क्रुप ह्यांना अटक झाली. त्यांच्यावर खटला करण्यांत येऊन त्यांना १२ वर्षांच्या कैदेची व मालमत्ता जप्त करण्याची शिक्षा देण्यांत आली. पण पुढें अमेरिकेचे जर्मनींतील हाय कमिशनर मि. मॅक्लॉय ह्यांनीं क्रुप व त्यांचे डायरेक्टर्स ह्यांनीं भोगलेली ६ वर्षांची शिक्षा पुरेशी मानून त्यांची सुटका केली. सुटका झाल्यावर क्रुप व त्यांचे सहकारी ह्यांनीं पुन्हा उद्योगाला सुरवात केली. बँकांतील शिलकी, कर्जें आणि दोस्त राष्ट्रांनीं विकलेल्या मालमत्तेची किंमत ह्यांच्या साह्यानें त्यांनीं धंद्याची उभारणी केली. १९५५ अखेर कारखाने पुन्हा बांधण्याच्या कामीं त्यांनीं ४ कोटी डॉलर्स खर्च केले. १९५४ पासून क्रुपला पुन्हा नफा होऊं लागला. शत्रूच्या बॉम्बवर्षावामुळें, पडझड झाल्यानंतर जे कांहीं कारखाने उरले होते त्यापैकी ४० टक्के ब्रिटिश, फ्रेंच व रशिअन सरकारांनीं उचलून नेले. पण, त्याचा क्रुपला फायदाच झाला. कंपनीनें नवे कारखाने उभारतांना अद्यावत् यंत्रसामुग्री वापरली व अधिक

स्वस्त, चांगलें व जलद उत्पादन सुरू केलें. क्रुपच्या हजारों कामगारांची कंपनीविषयीं आज्वल्य निष्ठा होती. त्यांनीं जिवाकडे न पाहतां कामें केलीं. १०० वर्षांपूर्वी पासूनच कामगारांची जन्मापासून मरणापर्यंत काळजी वहाण्याची जी पद्धत क्रुपनें सुरू केली होती तिला अशा रीतीनें उत्कृष्ट फळ आलें.

### क्रुपचा उजवा हात : बेटझ

आपल्या उद्योगधंद्यांची पुनर्रचना करण्यासाठी हेर क्रुपने बर्थोल्ड बेटझ नांवाच्या एका तज्ज्ञाची निवड केली आहे. हेर क्रुप ह्यांच्याच म्हणण्याप्रमाणें, ते तुरुंगाबाहेर आले तेव्हां क्रुपची कंपनी म्हणजे एक व्यापारी व यंत्रसामुग्री बनविणारी कंपनी झाली होती. तिची पोलादाची कारखानदारी ती करीत नव्हती. नव्या परिस्थितीचें आकलन करणारा, नव्या धोरणानें वागणारा, असा तरुण मनुष्य त्यांना पाहिजे होता. बर्थोल्ड बेटझ ह्यानें युद्धोत्तर जर्मनींत आपल्या विमा-कंपनीची चांगलीच प्रगति केली होती. जर्मन विमा-कंपन्यांत १६ वा नंबर लागणारी त्याची कंपनी त्यानें तिसऱ्या क्रमांकावर आणली होती. ह्या माणसाची व हेर क्रुप ह्यांची एका स्नेह्याच्या मध्यस्थीनें ओळख झाली. नंतर कित्येक महिने त्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून हेर क्रुप ह्यांनीं त्याला कंपनीचा जनरल डायरेक्टर म्हणून नेमलें. जर्मन उद्योगधंद्यांत जे नवे तरुण पुढारी तयार होत आहेत त्यांचा उत्कृष्ट नमुना म्हणून बेटझ ह्यांच्याकडे बोट दाखवावें लागेल. चाळीस वर्षें वयाचा हा अनुभवी तरुण आक्रमक वृत्तीचा व धडाडीनें काम करणारा आहे. हेर क्रुप आपल्या औद्योगिक पसाऱ्यांतील दैनंदिन कामकाज बेटझवर सोंपवितात. फक्त महत्त्वाच्या प्रश्नांतच ते स्वतः लक्ष घालतात. ते स्वतः आज्ञा अशा क्वचितच करतात; सूचना मात्र करतात. डायरेक्टरसच्या निर्णयांत फिरवाफिरवाहि कधीं करीत नाहींत. पण जेव्हां तीं करतात, तेव्हां त्यांच्या निर्णयासंबंधीं कोणी कांहीं विरोधी शब्दसुद्धां काढीत नाहीं. खाजगी जीवनांत हेर क्रुप हे एकाकी राहतात. त्यांना जवळचे असे मित्र नाहींत.

### बर्था

अल्फ्रेड क्रुप ह्यांची नात बर्था ही नुकतीच मरण पावली. क्रुप कारखान्यांतून तिनें आपलें स्वतःचें असें स्थान निर्माण केलें होतें. वयाच्या १६ व्या वर्षांपासून तिच्याकडे कारखान्यांचा वारसा आला. तेव्हांपासून तिनें त्यांच्या प्रगतीला आपल्या आजोबाच्या खालोखाल उत्कृष्ट मदत केली. दोन महायुद्धांत जर्मनीचें व क्रुप कारखान्यांचें जें नुकसान झालें तें भरून काढण्यांत तिच्या चिकाटीचा व मार्गदर्शनाचा फार उपयोग झाला


दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

महिलांची पसंती
सांडू ओरिजिनल ब्राह्मी तेल


दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
फॅक्टरी व हेडऑफिस :— चेंबूर, मुंबई नं. ३८.

पुणें एजंट :—प्रभाकर एजन्सी, १००, रविवार पेठ, पुणें २

लोकल स्टॉकिस्ट :—सिताराम एजन्सी, नियर सकाळ ऑफिस, पुणें २.

एस. आर. माने अँड सन्स, ५०१ रास्ते वाडा, पुणें २.

सर्वांना हवी असलेली सहकारी बँक
४० वर्षें व्यक्तिविकास व व्यापारवृद्धीसाठी सेवा व संरक्षण करणारी
व्यापारी वर्गाची यशस्वी बँक
दि डेक्कन मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि०
: मुख्य कचेरी : २१७ चर्नी रोड, मुंबई ४.
: शाखा : रानडे रोड, वेस्टर्न रेल्वेसमोर दादर.

* मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजावर स्वीकारल्या जातात.
* मध्यमवर्गीयांची, व्यापारी, धंदेवाईक, वगैरेंची सहकार्यानें सेवा.
* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

# सहकारी संस्थांची कर्जवसुली

( श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल., बी. पुणें ४ )

सहकारी संस्थांनीं त्यांच्या सभासदांना दिलेलीं कर्जें व त्या कर्जांच्या वसुलीबाबतच्या उपाययोजनांकडे सहकारी कार्यकर्त्यांनीं आपलें लक्ष केंद्रित करावयाची वेळ नजिक येऊन ठेपली आहे. सहकारी संस्थांचे पदाधिकारी अथवा चालकवर्ग कर्जवांटप करतांना जितकी काळजी घ्यावयास पाहिजे तितकी घेत नाहींत, असें खेदानें म्हणावें लागतें. निष्काळजीपणानें अथवा योग्य छाननी न करतां कर्जवांटप केलें गेल्यास त्याचे परिणाम सर्व सभासदांस व सहकारी संस्थेस भोगावे लागतात आणि वेळप्रसंगीं सहकारी संस्था गोत्यांत येऊन शेवटीं त्यांचा कारभार गुंडाळणेचा अनिष्ट प्रसंग प्राप्त होतो. सर्वव्यापी सहकारी चळवळीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

### कर्जांचा विनियोग उत्पादक रीतीनें होत नाहीं

सभासदांकडून आलेल्या कर्जमागणी अर्जांचा विचार करतांना सभासदांच्या कर्ज–फेडीची पात्रता फारशी विचारांत न घेतां अगर दिलेल्या उत्पन्नाचा पडताळा पाहाण्याचें निष्काळजीपणामुळें कर्जवांटप केलें गेल्यास कर्जफेडीची मुदत संपून जाऊनाहि सभासदांना घेतलेलें कर्ज वेळेवर परत करतां येत नाहीं. कर्जवांटप करतांना, दिलेल्या कर्जाचा विनियोग सभासद जास्त उत्पादन वाढविणेकडे करतात किंवा नाहीं हें कांटेकोरपणें पाहाणें अगत्याचें आहे. दिलेलें कर्ज अधिक उत्पादन करण्यासाठी न लावल्यास त्या कर्जाचा बोजा सभासदांवर दिवसेंदिवस वाढत जाऊन सभासदांस घेतलेलें कर्ज परत करतां येणें अशक्य होतें. मध्यम मुदतीच्या अगर दीर्घमुदतीच्या कर्जमागणी अर्जांचा विचार करतांना ज्या कारणांसाठी सभासद कर्ज मागत असतो त्या कारणांसाठीच त्या कर्जाचा विनियोग करावयास सभासदांस भाग पाडणें, हें सहकारी कार्यकर्त्यांचें प्रमुख कर्तव्य ठरतें. कित्येक वेळां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, सभासद विहिरीसाठी अगर तालबांधणीसाठी मोठमोठाल्या रकमा कर्जरूपानें उचलतात व रक्कम हातांत पडल्यावर त्या रकमेचा उपयोग विहिरीसाठी अगर तालबांधणीसाठी न करतां, दुसऱ्या कर्जाची फेड करणेसाठी अथवा मुलाचे लग्नासाठी करून टाकतात. अशा सभासदांवर शेवटीं पश्चात्ताप करण्याची पाळी येऊन कर्जफेडीसाठी सर्वस्वाचा होम करावा लागतो. अशा परिस्थितींत सहकारी संस्थांतील पदाधिकारी, चालकवर्ग, सभासद व सहकारी कार्यकर्ते यांचेवर फार मोठी जबाबदारी येऊन पडते. सहकारी संस्थांतील प्रचंड थकबाकीयांची छाननी केल्यास, दिलेल्या कर्जांचा विनियोग दुसऱ्या कारणांसाठी केला आहे हेंच प्रामुख्यानें दिसून येतें. अशा वृत्तीमुळें सभासदांची सांपत्तिक परिस्थिति सुधारण्याऐवजीं ती कालांतरानें खालावत जाऊन त्यांना अधोगति प्राप्त होते.

### वाढती थकबाकी

सहकारी संस्थांचें यशापयश दिलेल्या कर्जांची वेळेवर वसुली होते किंवा नाहीं ह्यावरच प्रामुख्यानें अवलंबून आहे. सहकारी संस्थेंत थकबाकीचें प्रमाण वाढूं लागल्यास, गरजवंत सभासदांना त्यांच्या उत्पादनासाठी लागणारें कर्ज वेळेवर सहकारी संस्थेस उपलब्ध करून देतां येत नाहीं. जसजसें थकबाकीचें प्रमाण वाढत जातें तसतसें सहकारी संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर आघात होऊं लागतात आणि त्याचें पर्यवसान सोसायटीस खालचा दर्जा अगर वर्ग मिळण्यांत होऊं लागतें. सोसायटीचा सांपत्तिक दर्जा खालावल्यामुळें मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्जाचा योग्य व प्रमाणित पुरवठा होत नाहीं आणि त्यामुळें इतर सभासदांचें अतोनात नुकसान होतें. मुंबई सावकारी कायद्यानें इतरत्र कोठें कर्ज मिळणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे; आणि योग्य वेळीं कर्ज न मिळाल्यास शेतकरी सभासदांचा सर्व कार्यक्रम हुरपळून पडतो.

### कर्ज–वसुलीसाठी स्वतंत्र खातें हवें

सहकारी संस्था सभासदांना स्थावर मिळकतीचे तारणावर अथवा वैयक्तिक जामीनावर कर्जें देतात. कांहीं वेळेस सोनें-चांदीचे तारणावर, इन्शुअरन्स पॉलिसीवर अगर सरकारी कर्ज-रोख्यांचे तारणावर कर्जें दिलीं जातात. सोनें, चांदी अगर सरकारी कर्जरोखे अगर तत्सम तारण घेऊन दिलीं जाणारीं कर्जें ह्याबाबत वसुलीस फारसा त्रास पडत नाहीं. परंतु स्थावराचे तारणावर अगर जामीनकीवरील दिलेल्या कर्जवसुलीचे बाबत सहकारी संस्थांना फार घस सोसावी लागते व वसुलीच्या प्रयत्नांत अनंत अडथळे निर्माण होऊन कर्जाच्या बरोबरीनें कर्ज वसुलीसाठी

कॅम्फीन कॅम्फीन



इन्फ्ल्युएन्झानें होणाऱ्या शारीरिक वेदनावर, तसेच सर्दीचा ताप, डोकें व दांतदुखी यांवर ए. पी. सी. आणि कॅम्फर मोनोब्रोम असलेले वापरा. पॅकेट किं. १० नये पैसे. ( १२ डझन पॅकेट किं. रु. १२ खर्च निराळा ) बनविणार :—स्टार कंपनी, बेळगांव.

दी पैसाफंड शेतकी सहकारी बँक लिमिटेड

स्थापना ] हुपरी ( जिल्हा कोल्हापूर ) [ २६-१-५०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | १,००,००० |
| खपलेले व वसूल शेअर | रु. | ६४,८६० |
| रिझर्व्ह फंड | रु. | १४,४६७ |
| इतर फंड | रु. | १,९४० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५५,०१५ |

“सभासदांच्या शक्य तों सर्व प्रकारच्या अडचणी सहकार्यानें दूर करण्याचा प्रयत्न, हें ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे.”

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर

गेलीं ऐंशी वर्षांपासून प्रसिद्ध असलेलें
आरोग्य व शक्तिवर्धक
सॅन्डो ब्रॅन्ड (रजिस्टर्ड)

# शुद्ध व साजूक तूप

सीलबंद डबे व सुटे मिळतें.

एजंटः—म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

## दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि., राहुरी

राहुरी तालुक्यांतील ४३ गांवांतील शेतकऱ्यांनीं भांडवल जमवून सहकारी जीवनाचें बाळकडू पाजणाऱ्या भारतीय संस्कृतींतून निर्माण झालेल्या सहकारी साखर कारखान्यांपैकी एक. ह्या कारखान्याचा दि. १७-१०-५७ पासून पहिल्या हंगामास मुहूर्त होऊन दररोज सुमारें १००० ते १२०० पोतीं शुभ्र दाणेदार साखर बाहेर पडेल.

| स्थापना | इंडस्ट्रियल लायसन्स—एल ८ | सभासदसंख्या |
|---|---|---|
| १९५४ | दि. ५-१-१९५५ | ११९७ |

(१) अधिकृत भांडवल—५०,००,००० रुपये.
(२) विक्रीस काढलेलें—४६,००,००० रुपये.
(३) खपलेलें भांडवल—४०,७२,००० रुपये.

—**—

(१) श्री. बा. पुं. वर्देसाहेब—चेअरमन
डायरेक्टर, मुंबई राज्य
को. ऑ. बँक, मुंबई—बँक नॉमिनी.
(२) श्री. बाबुराव बापूजी तनपुरे—व्हाईस चेअरमन—राहुरी
(३) श्री. लक्ष्मणराव बळवंतराव पाटील—संचालक—देवळाली प्रवरा
(४) श्री. अनंतराव शंकरराव धावडे „ राहुरी
(५) श्री. चंद्रभान रुपचंद डाफळे „ बेलापूर खुर्द
(६) श्री. विश्वनाथ दादाजी मुसमाडे „ देवळाली प्रवरा
(७) श्री. शिवराम पांडुरंग राजुळे „ बेलापूर खुर्द
(८) श्री. किसन गंगाराम पाटील „ कोल्हापूर खुर्द
(९) श्री. बाघूजी रामजी पाटील „ बेलापूर खुर्द
(१०) श्री. मुनशीबेग पापाबेग इनामदार „ देवळाली प्रवरा
(११) श्री. प्रा. धनंजयराव गाडगीळ „ पुणें
(१२) श्री. पी. डी. कसबेकर, आय. ए. एस.—जॉइंट रजिस्ट्रारसाहेब को. ऑ. सोसायटीज (शुगर) बॉम्बे स्टेट, पुणें.
(१३) मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, अहमदनगर डिव्हिजन अहमदनगर.
(१४) मे. स्पेशल डेप्युटी रजिस्ट्रारसाहेब को. ऑ. शुगर फॅक्टरीज अ.नगर डिव्हिजन अहमदनगर

मॅनेजर व सेक्रेटरी—य. द. खोले

# रेखा फर्निशर्स

३२४, सदाशिव, पुणें.
(टेलिफोन नं ४०१३)

सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे
कारखानदार

ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो।

# दी बँक ऑफ औंध लि.

(स्थापना : १९३८)

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा शहर.
शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... | रु. ३,४१,००० |
| वसूल भांडवल ... ... | रु. १,७०,५०० |
| रिझर्व्हस् ... ... | रु. ९७,००० |
| खेळतें भांडवल ... ... | रु. १९,००,००० |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.
श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.
डॉ. माधव दत्तात्रय वोकील, एल. सी. पी. अँड एस्. डी. ओ. एम्. एस्. (बॉंबे).
श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.
श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.
श्री. रंगराव पांडुरंग शालगर, बी. एस्. सी., व्यापारी, सातारा.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

खालील वाढलेल्या दरानें मुदतठेवी स्वीकारण्यांत येतात
१ वर्ष—३ टक्के, ३ वर्षें—३॥ टक्के, ५ वर्षें—४ टक्के, ७ वर्षें—४॥ टक्के, १० वर्षें—५ टक्के.

सेव्हिंग्ज बँकेवर द. सा. द. शें. २ टक्के व्याज दिलें जातें.

मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, बंगलोर, भिवंडी, नागपूर, हुबळी, कोपरगांव, वगैरे प्रमुख ठिकाणांवर माफक दरांत ड्राफ्ट दिले जातात.

शेअर्स व गव्हर्मेंट सिक्युरिटीज्ची खरेदी-विक्री केली जाते.

विशेष माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

बा. वा. घमंडे, C. A. I. I. B. मॅनेजर.
न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

रकमा खर्ची टाकाव्या लागतात. ही कर्जवसुलीची पद्धत अतिशय गैरसोयीची व कष्टाची झालेली असून सहकारी संस्थांच्या कर्जवसुलीसाठी झटपट उपाययोजना होणारें स्वतंत्र खातें सहकारी खात्यानें निर्माण केलें पाहिजे. कर्जवसुलीसाठी जो पैसा खर्च करावा लागतो तो पुरेपूर वसूल करतां येऊन कर्जवसुली विनासायास व शक्य तितक्या लवकर झाल्याशिवाय सहकारी संस्थांना उर्जितदशा केव्हांहि प्राप्त होणार नाहीं.

### स्थावरावरील कर्जांच्या वसुलींतील अडचणी

स्थावरावरील दिलेलीं कर्जें बहुतकरून थकत असतात. थकलेल्या एकूण कर्जाचे प्रमाणांत स्थावरावरील थकबाकीचें प्रमाण जास्त आढळतें. सर्वसाधारण समजूत अशी आहे कीं, स्थावरावरील कर्जें हीं सुरक्षित स्वरूपाचीं आहेत. परंतु स्थावराचे तारणावरील कर्जवसुली इतर कर्जवसुलीच्या मानानें त्रासाची, खर्चाची व जास्त दिरंगाई होणारी आहे. स्थावरावरील कर्ज थकल्यावर सभासदाचे विरुद्ध सहकारी संस्था लवाद दावा करून लवादनिवाडा मिळवितात आणि नंतर सहकारी कायद्याचें कलम ५९ अन्वयें रजिस्ट्रार-साहेबांकडून सर्टिफिकेट मिळवून कर्जवसुलीच्या प्रत्यक्ष प्रयत्नांत लक्ष घालतात. त्यांपैकी एक मार्ग म्हणजे जिल्ह्याचे कलेक्टर-मार्फत कर्जवसुली प्रकरण तालुक्याच्या कचेरींत पोंचतें करणें हा होय. मुलकी अधिकाऱ्याकडून अशा प्रकरणांची वास्तपुस्त बराच काळपर्यंत होत नाहीं. सहकारी संस्थेनें स्मरणपत्रें पाठवल्यावर मुलकी अधिकारी कर्जवसुलीच्या प्रकरणीं लक्ष घालावयास सुरवात करतांच सभासदांचे वारस अगर अन्य कोणी हितसंबंधी स्थावरांत हक्क आहे अशा स्वरूपाच्या तक्रारी करून मिळकतीच्या मालकी-हक्काविषयीं वाद निर्माण करतात व कर्जवसुली प्रकरण दिर्घकाळपर्यंत कांहींहि वसुली न होतां पडून राहतें. कर्जवसुलीचा दुसरा मार्ग म्हणजे सर्टिफिकेट मिळाल्यावर त्या सर्टिफिकेटाचा आधार लवादनिवाड्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत दरखास्त देऊन स्थावर मिळकतीची विक्री करून विक्रीच्या रकमेंतून कर्जवसुली करणें हा होय. ह्या मार्गांतहि अनंत अडचणी पेरलेल्या आहेत. लबाड व अप्रामाणिक सभासद आपल्या अज्ञान मुलांना अगर हितसंबंधीं मंडळींना पुढें करून वाटप, ठराव व ताकीदीचे दावे दाखल करून दिवाणी कोर्टांतील दाखल केलेल्या दरखास्तीस फारशी वाटचाल करूं देत नाहींत व दाव्याच्या निर्णयावर दरखास्तीचें पुढील काम संपूर्णपणें अडून पडतें. दरम्यानच्या काळांत सहकारी संस्थांना दाव्याच्या भांडणासाठी व दरखास्तीस गती देणेसाठी सारखा पैसा खर्च करावा लागतो. खर्च केलेला सर्वच पैसा कोर्टामार्फत वसूल होत नाहीं आणि त्याचे विपरीत परिणाम सहकारी संस्थांच्या चालकांना व इतर सभासदांना भोगावे लागतात. दरम्यानचे काळांत लायक व प्रामाणिक सभासदांना लागणारें कर्ज उपलब्ध करून न देतां आलेमुळें त्यांची स्थिति शोचनीय होते.

### कालहरणासाठी युक्त्या

अप्रामाणिक अगर लबाड सभासद कर्जफेडीचें कालहरण करणेसाठी निरनिराळ्या युक्त्या शोधून त्यांचा अवलंब करतात. त्यांपैकी कांहीं सभासद लवाददाव्याचे निर्णयाचे कामीं अतिशय दिरंगाई घडवून आणतात. चौकशीचे वेळीं लवाद-दाव्याचे कामांत गैरहजर राहून एकतर्फी लवादनिवाडा करून घेऊन नंतर सहकारी न्यायमंडळापुढें कांहीं कारणांची यादी देऊन


# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर,
पुणें ४.

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.
[२] सर्वांनीं वाखाणलेलें.
[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली
[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.
[५] स्वच्छता, टापटीप, कटाक्षानें ठेवली जाते.
[६] हवेशीर खोल्या.

आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.



# दी सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ६,३०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ३,१४,५४,२५० |
| राखीव व इतर निधि | रु. ४,०२,७७,१२२ |

संपूर्ण संरक्षण व आपल्या बचतीचा योग्य मोबदला.

आपली बचत सेंट्रल बँकेच्या तीन वर्षे मुदतीच्या कॅशसर्टिफिकेटसूमध्यें गुंतवा व ४% चक्रवाढ व्याज मिळवा.

— पुण्यांतील शाखा —

लक्ष्मीरोड, पुणें २. ईस्ट स्ट्रीट, पुणें १.

गैरहजर राहणेस सबळ कारण होतें अशी रचना करून सदरच्या दाव्याची फेरचौकशी व्हावी असा आग्रह धरतात. ह्यांत कालहरण होऊन सोसायटीच्या कर्जवसुलीच्या कामीं निरनिराळे अडथळे अगर हरकती निर्माण करतात. ह्या सर्व हरकतींचा सोक्षमोक्ष झाल्याशिवाय कर्जवसुली होत नाहीं अगर ती करतां येत नाहीं.

### वसुलीबाबत आदेश

वैयक्तिक जामीनकीवरील दिलेलीं कर्जें थकलीं गेल्यास लवाद-निवाडा करतांना न्याय करणाऱ्या अंमलदाराकडून कांहीं निराळेच आदेश दिलेले दृष्टोत्पत्तीस येतात. दिलेल्या आदेशाप्रमाणें कर्जवसुली करणें दिरंगाईचें होऊन बसतें. वैयक्तिक जामीनकीवरील घेतलेल्या कर्जांची जबाबदारी सर्व प्रतिवादींवर वैयक्तिक व संयुक्त अशी जरी कायद्यानें मानलेली आहे, तरी वर नमूद केलेप्रमाणें विशिष्ट स्वरूपाचे आदेश दिलेले असलेमुळें मूळ कर्जदाराविरुद्ध योग्य व कायदेशीर उपाययोजना केल्याशिवाय इतर प्रतिवादींवर कर्जवसुलीसाठीं सहकारी संस्थांना ससेमिरा लावतां येत नाहीं, त्याचा अप्रत्यक्ष परिणाम कर्जवसुलीवर होऊन थकबाकीचे प्रमाणांत वाढ होत राहते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी संस्थांतील सभासदांना कर्जपुरवठा करणेसाठीं कांहीं विशिष्ट योजना केलेल्या आहेत. राष्ट्रविकासासाठीं अधिक धान्य उत्पादन व ग्रामोद्योग ह्यांवर भर दिलेला आहे आणि या सर्व विकास-योजनांसाठीं निरनिराळ्या सहकारी संस्थांमार्फत कर्जपुरवठा करणेच्या योजनांचे आराखडे तयार होत आहेत. या सुसंधीचा फायदा व्यक्ति व राष्ट्र-विकासासाठीं योग्य तऱ्हेनें करून घ्यावयाचा झाल्यास सहकारी कार्यकर्ते, संस्था व तिचे सभासद ह्यांच्यावर निस्पृहपणें कार्य करणेची प्रचंड जबाबदारी येऊन पडणार आहे. त्याचा बारकाईनें विचार करून या सर्व घटनांचा तपशील समजावून घेऊन कार्य करणें अगत्याचें आहे. त्या दृष्टीनें सहकारी पद्धतीनें कर्जवसुलीची प्रकरणें सहकारी कार्यकर्ते दिरंगाई न करता कशी हातावेगळीं करतील, यांकडे लक्ष लागणें अगदीं स्वाभाविकच आहे.

पुण्यांत उत्तम वस्तींत उत्तम लॉज

स्वागत लॉज

डेक्कन जिमखाना, हिंदविजयसमोर, पुणें ४

PYE – केंब्रीज इंग्लंड
SIMENS – जर्मन
N. Ekco, AMZEL, BUSH,
वगैरे कंपन्यांचे प्रमुख विश्वसनीय व्यापारी

पुना म्युझिक सेन्टर
गणपती चौक, पुणें २.

दि कल्याण पीपल्स
को-ऑपरेटिव्ह बँक लि., कल्याण

पो. बॉ. नं. ११ ] स्थापना : ४ जून, १९२३ [ टे. नं. ५५

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. ३,११,९१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४,०४,८८० |
| खेळतें भांडवल | रु. १६,३०,००० |
| सरकारी रोखे | रु. ६,३२,८०० |

मुख्य ऑफिस :
टिळक चौक, कल्याण.
शाखा : ★ डोंबिवली ★ शाहापूर ★ अंबरनाथ
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
ठेवींवर व्याज—सेव्हिंग २, २½, कायम मुदत ठेव ३ ते ४
रिकरिंग ३½ स्पेशल सेव्हिंग ३ टक्के.

: डायरेक्टर बोर्ड :
श्री. पांडुरंग शिवराम देशमुख, चेअरमन
श्री. कृष्णाजी लक्ष्मण भिडे, मॅनेजिंग डायरेक्टर
डायरेक्टर्स
श्री. देवानंद जेठाराजा
श्री. पुरुषोत्तम गणपतराम जोशी
श्री. महंमद हनीफ फकीरसाहेब फणगारी
श्री. ज्ञानेश्वर बाळकू शेलार
श्री. विठ्ठलदास मोरारजी
श्री. मासुदमिया अल्लाउद्दीन फरीद
श्री. दगडू श्रीपत कदम
मॅनेजर — बाळकृष्ण बाबूराव रुद्रभटे

देणगी देण्यास आदर्श
काटकसरीस उत्तेजन...

देना बँक
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड
स्थापना १९३२

कॅश सर्टिफिकिटें
२¾% ते ४½%
व्याज देणारीं

लहान
चांदीच्या चिपा
I. G. मिंट छापाच्या

वेगवेगळ्या आकारांत मिळूं शकतात.

भविष्यकाळासाठी
बचत करा.

देवकरण नानजी बँकिंग कं. लि.
मुख्य कचेरी : मुंबई.

## बिलमार्केट योजनेखालीं रिझर्व्ह बँकेनें दिलेलीं कर्जें

१९५६ मध्यें शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून मोठ्या प्रमाणावर कर्जें काढावीं लागलीं; रोख शिलका व इन्व्हेस्ट-मेंट्सचा ह्यांचा वाढता वापर करूनहि कर्जांची मागणी पुरी पाडण्यास ठेवी अपुऱ्या पडूं लागल्या. शेड्यूल्ड बँकांनीं सरकारी रोख्यांच्या तारणावर रिझर्व्ह बँकेकडून पैसे घेतले, त्यापेक्षा कितीतरी जास्त रक्कम बिलमार्केट योजनेखाली घेतली. ह्या योजनेखालील कर्जांवरील व्याजाचा दर रिझर्व्ह बँकेनें ३% चा ३½% केला, तरी कर्जांत मोठी वाढ झाली, ह्याचा अर्थ ही योजना हिंदी बँकिंगमध्यें दृढमूल झाली आहे.

### योजनेचें स्वरूप

बिलमार्केट योजना जानेवारी, १९५२ मध्यें प्रथम सुरू झाली. त्यापूर्वी शेड्यूल्ड बँकांना पैशाची गरज लागली, कीं त्या सरकारी रोखे रिझर्व्ह बँकेला विकून किंवा रोखे तारण ठेवून पैसे उभारीत असत. ह्या पद्धतीच्या मर्यादा लक्षांत घेतां, हिंदी बँकिंग क्षेत्रांत बिलमार्केट निर्माण करण्याची आवश्यकता आहे ह्याविषयीं बरीच चर्चा झाली, आणि ही योजना लागलीच अंमलांतहि आणण्यांत आली. शेड्यूल्ड बँकांनीं दोन किंवा अधिक चांगल्या सह्या असलेल्या हुंड्या रिझर्व्ह बँकेकडे डिस्कौंट करून घ्याव्या; ह्या हुंड्यांची कमाल मुदत ९० दिवसांची असावी; शेड्यूल्ड बँकांना त्यांचे तारणावर अधिक त्या बँकांच्या प्रॉ. नोटेवर रिझर्व्ह बँकेनें 'डिमांड' कर्जें द्यावीं; अशी ही योजना होती. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व कानपूर येथील रिझर्व्ह बँकेच्या कचेऱ्यांतून कर्जें देण्यास प्रारंभ झाला.

प्रारंभीं १० कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या बँकांनाच ह्या योजनेचा फायदा घेण्यास परवानगी होती; आतां लायसेन्स असलेल्या सर्व बँकांना ती परवानगी आहे. प्रारंभीं, प्रत्येक हुंडी किमान १ लक्ष रु. ची असावी लागे; आतां ती ५०,००० रु. ची असली तरी चालते. पूर्वी, प्रत्येक वेळीं किमान २५ लक्ष रु. तरी कर्ज घ्यावें लागे; आतां ती रक्कम १० लक्ष रु. करण्यांत आली आहे.

### वाढती लोकप्रियता

बिलमार्केट योजनेची वाढती लोकप्रियता खालील आंकड्यां-वरून दिसून येईलः—

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | १-१०-५३ ते ३०-९-५४ | १-१०-५४ ते ३०-९-५५ | १-१०-५५ ते ३०-९-५६ |
|---|---|---|---|
| मंजूर कमाल मर्यादा | ७१·८१ | ८२·४० | ११८·१५ |
| वेळोवेळीं प्रत्यक्ष घेतलेलीं कर्जें | १३६·५७ | २०४·८८ | ३०५·२६ |
| मोसमाच्या अखेर बँकांकडून येणें रक्कम | १·३२ | ७·८० | ३३·८६ |

१–१०–१९५६ पासून सुरू झालेल्या मोसमासाठी मंजूर कमाल मर्यादा त्यापूर्वीच्या मानानें बरीच जास्त आहे. बिलमार्केट योजना शक्य तेवढी लोकप्रिय करण्यासाठी रिझर्व्ह बँक तत्पर आहे; परंतु शेड्यूल्ड बँकांचें त्यावरील अवलंबनहि मर्यादित रहायला हवें; त्यांनीं शक्य तों स्वतःच्या ठेवींतूनच कर्जें द्यावीं, हेंहि खरें आहे.

ही दिवाळी आमचे विमेदारांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीची जावो!
★ मोटार विमा
★ आग, अपघात विमा
★ दंगल, दर्या, धोका विमा, इ. इ.
सर्व प्रकारचें विमा-संरक्षण देण्यांत नांवाजलेली लोकप्रिय व श्रेष्ठ विमासंस्था
व्हल्कन विमा कंपनी लि.
: पुणें शाखा :
१७९ लक्ष्मी रोड, पुणें २.
ह. के. जोशी, B. Sc. शाखाधिकारी, पुणें.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

जोशी विठलदास करसनदास आणि कंपनी
भात व धान्य व्यापारी आणि कमिशन एजंटस
कल्याण (जि. ठाणें)
शाखा :—२०७ वडगडी, मुंबई.

## लँड मॉर्गेज बँकांच्या कार्यक्षेत्रावर अतिक्रमण !

(श्री. नीलकंठराव आण्णाप्पा कल्याणी, चेअरमन सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँड मार्गेज बँक लिमिटेड, कराड-सांगली.)

मुंबई स्टेट को. ऑ. बँक व सेंट्रल बँका यांना आपल्या नेहमींच्या रूढीस व पद्धतीस अनुसरून जमीन सुधारणे-करतां, बांधबंधारे घालणेस, विहीर काढणेस अगर दुरुस्त करणेस एंजीन, इलेक्ट्रिक मोटार इत्यादि. खरेदी करणें, जिरायत जमीन बागाईत करणें, ट्रॅक्टर्स, शेतीउपयोगी यंत्रसामुग्री खरेदी करणें, फळफळावांच्या बागा तयार करणें अगर याकरितां झालेलें कर्ज भागविणें, वगैरे अनेक कारणांकरितां मध्यम मुदतीचें कर्ज या नांवाखाली २ टक्के व्याजानें सरकारकडून लाखों रुपयांचें कर्ज मिळालेलें आहे. मध्यम मुदतीचे कर्जाचा बहाणा करून लँड मॉर्गेज बँकांच्या कार्यक्षेत्रांत बेधडक घुसण्याचा या बँकांचा नवीन उपक्रम आहे. हें अतिक्रमण मूलभूत सिद्धांताच्या अगदीं उलट तर आहेच, पण लँड मॉर्गेज बँकांचें स्वास्थ्य, वहिवाट व अस्थित्वासच धोका आणणारें आहे. या बँकांना आपल्या पद्धतीप्रमाणें कर्ज देतां येतें परंतु लँड मॉर्गेज बँकांना विनाचौकशी कर्ज देतां येत नाहीं. आमच्या अर्जदारांना अनेक प्रकारचे उतारे, कागदपत्र, पुरवून जमिनीवरील मालकीहक्क शाबीत केल्याशिवाय आणि भरपूर तारण असल्याशिवाय कर्जच मिळूं शकत नाहीं. इतकेंहि होऊन एखाद्या अर्जदाराची परतफेडीची पात्रता कमी पडल्यास बँकेस कर्जहि नाकारण्याचा हक्क आहे. कोणत्याहि बँका झाल्या तरी सरकारास सारख्याच. तेव्हां झालेलें अतिक्रमण हें अन्यायाचें असून त्याचा गंभीरपणें वेळींच विचार झाला पाहिजे असें मला वाटतें. याचवेळीं बाँबे को.ऑ. बँकेकडून लँड मार्गेज बँका एकेकाळीं कशा चालविल्या गेल्या याची थोडीशी मला आठवण करून द्यावी असें वाटतें. मुंबई सरकारच्या प्रोत्साहनानें १९२८ सालीं भडोच, पाचोरा, आणि धारवाड या ठिकाणीं मुंबई स्टेट को.आ. बँकेकडून ३ लँड मार्गेज बँका काढण्यांत आल्या. परंतु त्यांना नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ७।८ वर्षे काम करूनहि यश तर आलें नाहींच; उलट लँड मार्गेज बँकांच्या बाबतींत कांहीं अंशीं झीजच सोसावी लागली आहे. अल्प मुदतीचें कर्ज देणाऱ्या बाँबे स्टेट को. ऑ. बँकेकडून लांब मुदतीच्या कर्जाची नीटपणें व्यवस्था लागेना म्हणूनच १९३५ सालीं स्वतंत्र लँड मार्गेज बँकांचें दालन उघडण्यांत आलें. अशाप्रकारचें मागील अनुभव पाठीस असतांना देखील लँड मार्गेज बँकांच्या कार्यक्षेत्रांत अतिक्रमण करणें योग्य दिसत नाहीं याचा कार्यकर्त्यांनीं विचार करावा असें मला वाटतें.

नुकत्याच भरलेल्या मुंबई प्रॉ. को.ऑ. लँड मार्गेज बँकेच्या वार्षिक सभेमध्यें हल्लींचें नवीन रजिस्ट्रार श्री. डॉ. शेखसाहेब यांनीं लँड मार्गेज बँकांचें पूर्वीचें धोरण आमूलाग्र बदलून त्यांना ज्या कांहीं अडचणी येत आहेत अगर येणार आहेत त्या सर्वांचें निराकरण केलें जाईल असें आश्वासन दिलेलें आहे. तसेंच या बँकांचें कर्ज शेतकरी लोकांना लवकर मिळावें म्हणून ज्या त्या जिल्हा लँड मार्गेज बँकांना ४,००० रुपयांपर्यंतचे अर्ज मंजूर करणेबद्दल अधिकार देण्यास व डिपॉझिटस् स्वीकारण्यास जिल्हा लँड मार्गेज बँकांना परवानगी देणेबाबत आपली योजना सरकारपुढें ठेवली असलेबद्दल जाहीर केलें आहे. लँड मार्गेज बँकांचे बाबतींत डॉ. ए. यू. शेख रजिस्ट्रारसाहेब यांनीं केलेल्या महत्त्वाच्या सूचनाबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.


**म. गो. कुलकर्णी**

७८६ सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणें २.

आमचेकडे सर्व तऱ्हेचा किराणा व धान्य, तसेंच शुद्ध तूप, लोणी, चक्का, अस्सल केशर, सुका मेवा, वगैरे जिन्नस खात्रीचे मिळतील.

आमची स्पेशल मसाला सुपारी अवश्य वापरा.

ढेकूण, झुरळें, पिकावरील कीटक, वाळवी आणि इतर अन्य कीटकांचा पूर्ण नाश करणारा

**कर्दनकाळ**



**"डी. डी. टी ६६६" वापरा.**

"डी. डी. टी स्प्रे सर्व्हिसकरितां आम्हांस पाचारण करा !

टेलिफोन नं. २७५५७

अजा लॅबोरेटरीज, ३३, मंगळवाडी, मुंबई ४.

# पूर्व खानदेश सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जळगांव

स्थापना सन १९१६

मुख्य कचेरी : महात्मा गांधी पथ, जळगांव पू. खा.

टेलिफोन नं. ३५४ ] ★ [तारेचा पत्ता : EKCOBANK

चेअरमन : श्री. जे. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी.,

व्हाईस चेअरमन : बॅरिस्टर डी. एम्. निकम

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| वसूल झालेलें भाग भांडवल | |
| मागीदारांतर्फे | रु. १७,८१,८०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ३,००,००० |
| राखीव व इतर गंगाजळी | रु. २९,५५,५१३ |
| ठेवी | रु. २,७८,१०,९९१ |
| सरकारी व इतर रोखे | रु. १,१७,२३,९०१ |
| शेतकी व इतर कर्जांत गुंतवणूक | रु. १,९९,२८,०३८ |
| खेळतें भांडवल | रु. ३,७८,१५,१३७ |

जिल्ह्यांत एकूण ३१ शाखा

ग्रामीण पतपहाणी मंडळाच्या शिफारशीनुसार तारीख २ ऑक्टोबर १९५५ पासून पायलट योजना या जिल्ह्यांत बँकेनें सुरू केली आहे.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. तसेंच बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. जळगांव, जामनेर, चोपडा, पारोळा, चाळिसगांव येथें सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जनतेनें आपल्या ठेवी याच बँकेंत ठेवून पायलट योजना यशस्वी करण्यास मदत करावी. अल्प मुदतीच्या ठेवीसाठी आकर्षक व्याजाचे दर ठेवले आहेत. शर्तीसाठी लिहा अगर भेटा.

ब. न. वाणी — ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर

रा. या. सोनवणे — मॅनेजिंग डायरेक्टर

# मुलतानी हुंड्यांचें हिंदी बँकिंगमध्यें स्थान

मुलतानी शब्द उच्चारला कीं, पंजाबमधील मुलतान शहरांतील एखाद्या रहिवाशाची मूर्ति डोळ्यांसमोर येते. पण हा समज खरा नाहीं; कारण व्यापारधंद्याला पैसा पुरविणारे मुलतानी लोक मूळ सिंध प्रांतांतील शिकारपूर ह्या गांवांतील आहेत. व्यापारधंद्याला लागणारा पैसा पुरविणें हा त्यांचा खास व्यवसाय आहे. ह्या मुलतानी लोकांनीं आपली एक संघटना केली आहे. तिचें नांव 'शिकारपुरी बँकर्स असोसिएशन'. संघटनेचे सभासद सहकार्यानें काम करणारे असतात व त्यांचे एकमेकांशीं नेहमीं संबंध असतात. विश्वसनीयता आणि सचोटी ह्याबद्दल त्यांनीं कीर्ति मिळविलेली आहे. ह्याच गुणांवर बँकवाले मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतात. मुलतानी श्रॉफस् कसोटीला उतरलेल्या, खूप दिवस धंदा केलेल्या, अनुभवी आणि मान्यता मिळालेल्या दलालांमार्फत बँकांशीं संबंध ठेवतात. हे दलाल अधूनमधून बँकांत जातात, श्रॉफसूसाठी बिलें डिस्कौंट करण्याच्या मर्यादा ठरवितात, त्यांच्या पतीविषयीं बँकांना माहिती पुरवितात, दुसऱ्या बँकांशीं व्यवहार करण्याची त्यांची व्यवस्था काय आहे तें सांगतात आणि व्यापार उदीम करणाऱ्या लोकांतील त्यांच्या राबत्याची माहिती देतात. अशा रीतीनें बँका व मुलतानी श्रॉफस् ह्यांच्या दरम्यान दलाल हा एक महत्त्वाचा दुवा आहे.

### हुंड्यांत बँकांची मोठी गुंतवणूक

मुलतानी हुंड्या डिस्कौंट करण्याचा धंदा बँकांना अनेक कारणांसाठी फार पसंतीचा झाला आहे. त्यापैकी प्रमुख कारण असें आहे. बँकांना आपल्या जवळील शिलकी पैसा एखाद्या जोखीमरहित व नफादायक मार्गानें गुंतविण्यास संधि पाहिजेच असते. मुलतानी हुंड्यांचा व्यवहार हा अल्प मुदतीचें कर्ज देण्याच्या स्वरूपाचा असतो. बँका त्याचा उपयोग करून घेतात. मुलतानी श्रॉफसूच्या मार्फत विशेषतः छोट्या व्यापाऱ्यांना बँका मदत करतात आणि अशा रीतीनें असल्या व्यवहारांतील आपला योग्य वांटा मिळवितात. दुसरें असें कीं, ह्या हुंड्या दूरदूरच्या प्रदेशांत प्रसृत होत असतात. कारण, कधीं कधीं त्या एका जागीं काढलेल्या असतात, पण त्यावरील पैसे मात्र दुसऱ्या ठिकाणीं मिळवावयाचे असतात. उदाहरणार्थ, कलकत्त्यामधील माणसावर मुंबईमध्यें काढण्यांत आलेली हुंडी मुंबईमधील बँक स्वीकारील आणि हुंडीवरील मुदतीच्या तारखेला पैसे वसूल करण्यासाठी ती कलकत्त्याला पाठवील. अशा रीतीनें मुंबई व इतर व्यापारी केंद्रें ह्यांच्या दरम्यान मोठा धंदा चालू होतो.

### व्यवहाराची पद्धति

हुंडी काढल्या दिवसापासून २०० दिवसांपर्यंत तिची मुदत असल्याचीं उदाहरणें आहेत. तथापि, बँका मात्र हुंडीची मुदत भरण्यास ९० अगर त्यापेक्षा कमी दिवस असतांना ती डिस्कौंट करतात. डिस्कौंटचा दर बहुधा बँक रेट इतका अगर त्यापेक्षा अर्धा टक्का अधिक असतो. इतर बँकांचा हुंड्या डिस्कौंट करण्याचा जो दर असतो त्यापेक्षा अर्धा टक्का कमी दरानें स्टेट बँक ऑफ इंडिआ ह्या प्रकारचे व्यवहार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करते. तथापि, नाणे-बाजारांतील पैशाच्या परिस्थितीप्रमाणें व व्यापारासाठी लागणाऱ्या पैशाच्या जरूरीप्रमाणें हा दर कमी-जास्त होण्याचा संभव असतो. मुलतानी श्रॉफसना यावयाच्या


## दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि.

१७९ ब, बुधवार पेठ, पुणें २.

फोन नं. ३४९७ स्थापना : १९४५

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१ श्री. गंगाधर शिवराम आडकर, वकील, चेअरमन
२ श्री. वसंत विष्णु वर्तक, बी. एससी., कारखानदार
३ श्री. महादेव बाळकृष्ण साळवेकर, व्यापारी
४ श्री. हरकचंद मोतीचंद बाफना, व्यापारी
५ श्री. शंकर नारायण वैद्य, बी. ए., एलएल. बी., वकील.
६ श्री. काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर, मॅ. डायरेक्टर

**भांडवल**

अधिकृत : १ लक्ष रु. वसूल : ६५ हजार रु.
फंडस : १५ हजार रु. खेळतें भांडवल : १४ लाख रु. (अंदाजें)

**ठेवींवरील दर**

स्पेशल सेव्हिंग्ज ३% इतर दरांची चौकशी करणें

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

के. बी. साळवेकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन
### सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि. पुणें

७३ बुधवार पेठ, पुणें शहर.

— स्थापना १९१४ —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १,४८,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ६०,६९६ |
| खेळतें भांडवल | रु. ११,००,००० |

मा. सल्लागारमंडळ : (१) मा. सि. धों. आवनावे, अध्यक्ष (२) मा. पुं. ना. स्वार, उपाध्यक्ष (३) मा. स. ति. स्वामी, एल. एस. जी. डी. (४) मा. रा. द. भट, बी. ए., एल. एस. जी. डी. (५) मा. वि. द. नवले.

मा. कार्यकारी मंडळ : (१) मा. ना. धों. भोकरे-कार्याध्यक्ष (२) मा. पां. धों. सोनवणे, उपकार्याध्यक्ष (३) मा. रा. ता. कांबळे (४) मा. कृ. गो. कुंभार (५) मा. द. ना. कुंभार (६) मा. व रा. कोतवाल, एल. एस. जी. डी. (७) मा. म. मा. खोले (८) मा. कृ. द. धारमळकर (९) मा. दि. म. जाधव (१०) मा. आं. ब. टण्णू (११) मा. भी. वि. पाटील, एल. एस. जी. डी.

या बँकेंत काटकसर फंडाची रकम सभासदांची रु. ५,३५,००० पर्यंत जमा आहे हें, या बँकेचें वैशिष्ट्य आहे.

बँकेंत सभासद व बिगर-सभासद यांच्या सेव्हिंग्ज, चालू व हप्तेबंद ठेवी स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

नारायण कृष्ण कुलकर्णी,
कार्यवाह.

सवलतींची मर्यादा ठरवितांना त्यांचा अनुभव, सचोटी आर्थिक परिस्थिति, ह्यांचा विचार केला जातो. त्यांच्या पतीबद्दल बाजारांतून स्वतंत्रपणें माहिती मिळविण्यांत येते आणि इतर बँका त्यांना काय सवलती देतात त्याचाहि विचार करण्यांत येतो. मुलतानी श्रॉफला पैसे देण्यासाठी काढलेलें बिल आपल्या नांवावर करून घेतल्यानंतर बँका तें डिस्कौंट करतात. पण तत्पूर्वी तें ग्राहकाच्या खातीं आणि ज्यानें तें काढलें असेल त्याच्या खातीं नांवें लिहिण्यांत येतें व स्वीकारण्यासाठी त्याच्याकडे पाठविलें जातें. नेहमींची प्रथा अशी आहे कीं, बिल ज्यानें काढलें असेल त्याला पैसे देण्याच्या तारखेची सूचना पाठवावयाची. पैसे देण्याच्या तारखांना हुंड्या काढणारे अनेक लोक बँकांत येतात आणि हुंड्यांच्या रकमा चुकत्या करतात. त्यामुळें बँकांना हुंड्या काढणारांशीं संबंध ठेवतां येतो. परिणामीं व्यापाराला पैसे पुरवणारी बँक म्हणून बँकेची लोकप्रियताहि वाढते. हुंडी ही छुय्याखुय्या व्यापारी व्यवहारांतून उगम पावणारी आहे, आणि रिझर्व्ह बँकेनें रीडिस्कौंट करतां येणारें ट्रेड बिल म्हणून तिला मान्यता दिलेली आहे. ज्या बँकांना ह्या मान्यतेचा फायदा घ्यावयास पाहिजे असेल त्यांनीं आपल्या एंडॉर्सर्सच्या यादीसह रिझर्व्ह बँकेकडे दरसाल अर्ज करावयाचा असतो. असा अर्ज आल्यावर रिझर्व्ह बँकेकडून त्यांना मिळणाऱ्या रिडिस्कौंटच्या मर्यादा मंजूर होतात व जरूर पडल्यास ह्या सवलतीचा बँकांना फायदा घेतां येतो. शिवाय ह्या पद्धतीनें बँकांना आपल्या खातेदारांना रिझर्व्ह बँकेची अप्रत्यक्षरीत्या मान्यताहि मिळवितां येते.

मुलतानी हुंडीच्या आधारावर देण्यांत येणारें कर्ज हें अल्प मुदतीचें आपोआप फिटणारें कर्ज असतें. शिवाय तें तरतें व खात्रीचें असतें. हुंड्यांचा व्यवहार केल्यानें बँकेच्या वजनदारींत वाढ होते. कारण बऱ्याच छोट्या व्यापाऱ्यांना लागणारा पैसा पुरविण्यास बँक कारणीभूत होते. चांगला नफा देणारें साधन म्हणून हुंड्यांच्या व्यवहाराला सर्व सुप्रतिष्ठित व प्रसिद्ध बँका अनुकूलता दर्शवितात. कारण, हुंड्या डिस्कौंट करून मिळणारा फायदा हा सरकारी रोख्यांवरील व्याजाच्या तुलनेनें आकर्षक असतो.

## एका शंभराच्या नोटेची सत्यकथा

कांहीं दिवसांपूर्वी पुण्याच्या म्युनिसिपल बसमध्यें एक व्यापारी चढला. ठराविक वेळीं बस सुरू झाली. बस कांहीं अंतर जाते न जाते तोंच कंडक्टरची व त्या व्यापाराची बोलाचाली सुरू झालेली इतर उतारूंना ऐकूं आली. व्यापाऱ्यानें भाड्यासाठी एक रुपयाची नोट कंडक्टरला दिली होती. पण तीवर तेलाचा लहानसा डाग असल्यामुळें कंडक्टर ती घेईना. व्यापारीहि हट्टास पेटला. अखेर म्युनिसिपल ट्रान्सपोर्टचा वरिष्ठ अधिकारी मध्यें पडला व त्यानें प्रकरण मिटविलें. ही सदोष नोट देण्याघेण्याबद्दल इतकें रण माजलें. पण ह्याहीपेक्षा सदोष नोट आणि तीहि शंभराची वापरांत आली आहे. तिच्या कायदेशीरपणाबद्दल शंका घेतली गेलेली नाहीं. शंभर रुपयांच्या मुलखा-वेगळया अशा ह्या नोटेची सत्यकथा मोठी आव्हान देणारी आहे. तिचा मागील बाजूचा डाव्या हाताचा खालचा कोपरा पूर्णपणें कोरा आहे. गेले कांहीं दिवस ती चलन म्हणून वापरांत आहे. सदोष नोटा नसतात, असें नाहीं. पण त्यांना व्यवहारांत येण्याची संधि कधींच मिळत नाहीं. कारण कोणतीहि नोट फिरती होण्यापूर्वी टांकसाळींत व बँकांतून तिची पुन्हां पुन्हां तपासणी करण्यांत येते. सध्यांची ही शंभराची नोट चलनाच्या इतिहासांतील अशा प्रकारचें पहिलेंच उदाहरण आहे असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. कानपूर येथील एका व्यापाऱ्यानें ती जतन करून ठेवली आहे. त्याला ती कानपूरमधील एका कापडाच्या गिरणीकडून मिळाली. गिरणीला ती एका प्रसिद्ध बँकेच्या स्थानिक शाखेकडून मिळाली. सिरिअल नंबराप्रमाणें लावलेल्या नोटांच्या पुडक्यांतूनच ती गिरणीकडे आली. नोटेच्या पुढील बाजूला रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची (श्री. बी. रामराव ह्यांची) सही आहे. मागील बाजूच्या डाव्या बाजूला निरनिराळ्या भाषेंतील नोट शंभराची असल्याचा मजकूर आहे. पण, डाव्या बाजूचा खालचा कोपरा कोरा आहे. कांहीं भाषांतील मजकूर अर्धवट छापला गेला आहे. डाव्या कोपऱ्यांतील अक्षरी शंभर रुपये ह्या इंग्रजी मजकुरापैकीं शेवटचीं दोन अक्षरें मात्र वाचतां येत आहेत.

**कण आणि क्षण**
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति] [किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**
(ગૃહજીવનનું માંગલ્ય)
લેખક:—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"
ગુજરાતી બીજી આવૃત્તિ] [કિંમત રૂ. ૧-૮-૦

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड
स्थापना— (शेड्यूल्ड बँक) —सन १९३६
हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २. प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग (फोन नं. २७६३)
मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट मुंबई-१ (फोन नं. २५३४०८)
—: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :—
श्री. ग. रा. साठे, (अध्यक्ष) श्री. सी. टी. चितळे, श्री. ल. रा. धडफळे, श्री. वि. ना. सरदेसाई,
श्री. द्या. ग. बापट, (उपाध्यक्ष) श्री. वा. पां. वैद्य, श्री. ग. उ. चितळे, श्री. वि. गो. गांगल
चालू खातें व्याज १ टका—सेव्हिंग्ज खातें व्याज २॥। टके. मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑनर्स), बी. कॉम. एलएल. बी.,
मॅनेजर.

फोन नंबर २३६ राजिस्टर नंबर १८३१८

# दि इचलकरंजी अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

इचलकरंजी ( हेड ऑफिस ) जिल्हा कोल्हापूर.

स्थापना १९३० शाखा — आजरें

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १,२७,३५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | २,२८,६६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ३०,२७,७१८ |
| ठेवी | रु. | २५,७०,७६० |
| डिव्हिडंड | शेकडा | ६.२५ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवींचे दर १ ते ४% कर्जाचे दर ६ ते ७½%

सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय

डी. आर. काळे, मॅनेजर. य. वि. दातार, चेअरमन.

ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखसमृद्धीचें जावो !



४४ वर्षांवर चाललेली कोल्हापुरांतील पहिली सहकारी बँक

# दि कोल्हापूर अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

कोल्हापूर.

स्थापना सन १९१३ इसवी.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | १,१२,९०० |
| रिझर्व फंड | रु. | ९१,५७० |
| इतर फंडस् | रु. | ६०,०९६ |

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

ए. ए. बोगार, मॅनेजर. दत्तात्रय नरहर कुलकर्णी, कणेरकर, प्रेसिडेंट.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे हितचिंतकांना आनंदाचें व भरभराटीचें जावो.



यंदाची दिपवाळी आमचे हितचिंतकांना सुखाची जावो !

*************************************

# दि कोल्हापूर मराठा

## को-ऑप. बँक लि.

कोल्हापूर.

( स्थापना सन १९११ इ० )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ३,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | १,०४,९१० |
| वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. | १,०४,७९० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. | ९७,९७२ |
| खेळतें भांडवल | रु. | ३,४८,०२१ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

डी. के. पाटील, मॅनेजर डी. ए. शिंदे, प्रेसिडेंट



बँकेच्या प्रगतीस हातभार लावणाऱ्या आमच्या सर्व भागदार, ठेवीदार नि हितचिंतकांना ही दिवाळी नि पुढील वर्ष सुखसमृद्धीचें जावो

# दि विटा मर्चंट्स्

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटें

( जि. द. सातारा )

स्थापना दि. १४-११-१९३६

सतत गेलीं १८ वर्षें ' अ ' वर्गांत असणारी

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | १,०९,५०० |
| निधि (सर्व प्रकारचे कायम निधि) | रु. | ९५,९०० |
| ठेवी | रु. | ८,३४,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ११ लाखांचेवर |

येथें चेक, हुंडी विक्री वा वसुली करणें, ठेवी स्वीकारणें, सभासदांना माफक व्याजानें कर्जें पुरविणें, इत्यादि सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

द. ना. गोसावी, बी. ए., एलूएल. बी., अध्यक्ष; रा. ब. दिवटे, चेअरमन; गो. रा. ब्रह्मनाळकर, एलूएल. बी., मॅनेजर

# दी बृहन्महाराष्ट्र

## शुगर सिंडिकेट लि., पुणें २

मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळी ।
तैं योगिया पाहे दिवाळी । निरंतर ।।

— श्रीज्ञानेश्वरी

## नवा हंगाम दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर चालू झाला

### डिस्टिलरी चालू आहे !

### मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात

| मुदत | १ वर्ष | ३ वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| व्याज द. सा. द. शें. | ६ | ७ | ७॥ |

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना
ही दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !

### संचालक मंडळ

दि. ब. एन्. सी. लिमये, B. A., LL. B., C. B. E., अध्यक्ष.
श्री. आ. पां. कोंडे देशमुख, जमीनदार व व्यापारी
श्री. शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., वकील
श्री. भ. ग. भाटुले, B. Sc., LL. B., वकील
श्री. श. भ. कोंडे देशमुख, व्यापारी.
श्री. ग. ह. सबनीस

रा. ब. अ. गुं. गोखले, M. A., B. Sc., F. R. I. C., A. I. I. Sc.
श्री. दा. वा. पोतदार, B. E. (Mech.), B. E. (Elec), A. M. I. E.
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. रामराव देशमुख, M. A., LL. B. (Cant.) Bar-at-Law, M.P.
श्री. शं. ल. किर्लोस्कर, B. Sc. (Mit.), U. S. A.

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी-पथ, पुणें २

के. व्यं. चांफेकर, B. E., A. M. I. E.
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.